IRBK-0100116

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र ११६

IRBK-0100116

IRBK-0100116

( फक्त शाहूनगरवासी नाटकमंडळीकरितां. )

# पन्नारत्न

अथवा

# दिव्य राजनिष्ठा.

(ऐतिहासिक नाटक)


वासुदेव रंगनाथ शिरवळकर

असिस्टंट मास्तर पुना नेटिव्ह इन्स्टिटयूशन,
"श्रीतुकाराम", "श्रीनामदेव", "श्रीएकनाथ", "पानिपतचा मुकाबला" या नाटकांचे कर्ते


यांनीं रचिलें

तें


पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत रा. नटेश अप्पाजी द्रविड
यांनीं छापिलें

व

रा. वासुदेव रंगनाथ शिरवळकर यांनीं पुणें, कसबा पेठ,
घ. नं. २१० येथें प्रसिद्ध केलें.

१९१३.

किंमत १२ आणे.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या अॅक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक
छापविण्याचा, रंगभूमीवर प्रयोग करण्याचा, संगीत व
भाषांतर करण्याचा वगैरे सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें
आपल्याकडे ठेविले आहेत.

शाखा
९९६
नाट्य

IRBK-0100116

# अर्पणपत्रिका.

हा ग्रंथ

सुप्रसिद्ध नाट्याचार्य

**रा. रा. गणेश कृष्ण जोशी**

शाहूनगरवासीसारख्या नाट्यकलाविशारद

नाटक मंडळीचे मालक व चालक

**यांचे**

असामान्य अभिनयकौशल्य, नाट्यकलानैपुण्य, यथोचित अभि-
नयानें प्रेक्षकांची मनोवृत्ति तल्लीन करून सोडणारी भाषण-
शैली व ज्यांनीं सुंदर गद्य नाटकें रंगभूमीवर आणून
आज सतत तीस वर्षें आपल्या ललित वाङ्मय-
गंगेच्या दिव्य ओघानें महाराष्ट्रीयांस पुनीत
केलें, इतकेंच नव्हे पण ज्यांच्यासारखा
नट आजपावेतों महाराष्ट्र रंगभूमीवर
आलेला नाहीं इत्यादि अनेक
सद्गुणावर लुब्ध होऊन
त्यांच्या सेवेशीं

अर्पण केला आहे.

ग्रंथकर्ता.

( रावबहादुर दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनीं लिहिलेली )

# प्रस्तावना.

पन्नारत्न किंवा दिव्य राजनिष्ठा:—हें नवीन नाटक लिहिणारे ग्रंथकार रा. रा. वासुदेव रंगनाथ शिरवळकर हे महाराष्ट्रवाचकांच्या पूर्ण परिचयाचे आहेत. ह्यांचें भक्तिरसप्रधान "श्रीतुकाराम" नाटक हें शाहूनगरवासी नाटकमंडळीनें जनसमाजापुढें आणून रा. शिरवळकर यांची कृति किती सरस व मनोरम आहे तें सर्वश्रुत केलेंच आहे. त्याच ग्रंथकाराची ही नूतन कृति आहे, तेव्हां तीमध्यें कांहीं विशिष्ट गुण असतील अशी वाचकांची सकृद्दर्शनींच कल्पना होईल व ती पुष्कळ अंशीं खरी ठरल्यावांचून राहणार नाहीं.

सांप्रतकाळीं आपल्या देशामध्यें राजनिष्ठा या गुणाचें उद्दीपन करण्यासारखें एखादें नवीन नाटक रंगभूमीवर येणें जरूर आहे. अशा प्रसंगीं हें "पन्नारत्न किंवा दिव्य राजनिष्ठा" हें नाटक रा. शिरवळकर ह्यांनीं तयार केलें आहे. तें महाराष्ट्रजनसमूहापुढें दिव्य राजनिष्ठेचा एक उत्कृष्ट मासला दाखवून लोकादरास पात्र होईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

ह्या नाटकांतील कथानक हें राजस्थानांतील सुप्रसिद्ध मेवाड-संस्थानच्या इतिहासापैकीं असून तें नाटकरूपानें रा. शिरवळकर ह्यांनीं प्रथमच महाराष्ट्रवाचकांपुढें आणिलें आहे. हें कथानक फार हृदयद्रावक असून तें सहृदय वाचकांच्या अंतःकरणांत करुण-रसाच्या लहरी उत्पन्न केल्यावांचून राहत नाहीं. ह्या नाटकाचे अंक तीन असून त्यांतील प्रत्येक अंक एकापेक्षां एक सरस असा झाला आहे.

निस्सीम राजभक्त महाबलसिंह व त्याची पत्नी पन्नादेवी ह्यांच्या भूमिका प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत राजनिष्ठेसंबंधीं अतिशय उदात्त व उच्च विचार प्रेरित करणाऱ्या असून, त्यांचा प्रेक्षकांच्या अंतः-करणावर फार इष्ट परिणाम झाल्यावांचुन राहणार नाहीं. त्याच-प्रमाणें बनवीर व त्याची स्त्री निहालकुवर ह्यांच्या भूमिका नीच

मनोवृत्तींचें प्रदर्शन करणाऱ्या असून, त्याही चांगल्या साधल्या आहेत.

नाटकाची भाषा एकंदरींत रसभरित व जोरदार असून मधून मधून हिंदुस्थानी भाषेंतील शब्दांचा उपयोग केलेला आहे, तोही समयोचित व रसपरिपोषक असाच झालेला आहे. पन्नारत्न अथवा दिव्य राजनिष्ठा हें नाटक मनोरंजक, बोधपर आणि आदरार्ह असें झालें असून अशा प्रकारचीं नाटकें रंगभूमीवर आलीं, तर तीं लोकादरास पात्र होऊन, "नाटक हें संसाराचें चित्र आहे." ह्या प्रमेयाची सत्यता सिद्ध केल्यावांचून कधींही राहणार नाहींत.

रा. रा. शिरवळकर ह्यांच्या हातून अशींच नवीन नवीन, विविध रस निर्माण करणारीं सुंदर नाटकें महाराष्ट्रभाषेंत अधिक निर्माण होतील व तीं महाराष्ट्र नाट्यवाङ्मयाची योग्यता अधिक वाढवून लोकाभिरुचीस चांगलें वळण लावतील, तर एक मोठें उपयुक्त समाजकार्य केल्यासारखें होईल ह्यांत संशय नाहीं.

---

## अभिप्राय.

हें नाटक मनोरंजक झालें आहे. पात्रांचीं भाषणें जोरदार आहेत आणि ज्या पात्राचा जो स्वभाव त्यास शोभणारीं अशीं आहेत. एकंदरींत ग्रंथ वाचकवर्गास माह्य असा झाला आहे.

Dr. R. G. Bhandarkar,

M. A. LL. D., PH. D., C. I. E., &c., &c.

---

या नाटकापासून राजनिष्ठेच्या भावनेस पोषक असाच परिणाम घडेल असें मला वाटतें.

Prof. A. B. Latthe, M. A.,
Educational Inspector,
Kolhapur.

# उपोद्घात.

यथां नरांमाजि राजा । तो विभूतिविशेष माझा ॥
जयातें सकळ लोक प्रजा । होऊनि सेविती ॥ १ ॥

—श्रीज्ञानेश्वर.

शिक्रीच्या दारुण युद्धांत महाराणा संग पराजित होऊन त्याचा अरवली डोंगरांत अंत झाल्याचें पाहून गुजराथ देशाधिपतीनें चितोडावर स्वारी केली. अशा दारुण प्रसंगीं महाराणा संग याची राणी कर्णावती इनें जोहारांत जाळून घेतलें. परंतु जोहारांत जाळून घेण्याचे अगोदर आपला कनिष्ठ पुत्र उदयसिंग, आपली परम विश्वासू व महाराजनिष्ठ उदयसिंगाची उपमाता पन्ना, इच्या ओटींत घालून, त्याला आपल्या जिवाच्या पलीकडे जपण्यास सांगितलें.

संग राण्याचा ज्येष्ठ पुत्र विक्रमाजित आपल्या बापाच्या मागें चितोडच्या गादीवर बसला परंतु बनबीरानें ( संग राण्याचा भाऊ पृथ्वीराज ह्याचा दासीपुत्र ) त्याचा घात करून आपण चितोडचें सिंहासन बळकाविलें.

ह्याच्या पुढच्या कथाभागावर नाटकाची रचना केली आहे. आपल्या मार्गांत पुढें हा उदयसिंग येणार हें सहन न होऊन त्याला ठार करण्याचा त्यानें अनेक वेळां प्रयत्न केला. अशा बिकट प्रसंगीं पन्नारत्नानें आपला पुत्र संग्रामसिंह, राजपुत्र उदयसिंगाबद्दल बनबीराच्या दारुण महत्वाकांक्षेला बळी देऊन आपली दिव्य राजनिष्ठा प्रगट करून आपलें नांव ह्या भरतखंडांतच काय, परंतु अलम् दुनियेंत अजरामर केलें. गादीचा खरा मालक राजपुत्र उदयसिंग ह्यास कुमळमेरच्या सुभेदाराच्या साहाय्यानें तिनें चितोडच्या गादीवर बसविलें.

हा प्रसंग ह्या नाटकांत गोंवला असून, ह्यांत करुणरस विशेष असून, शृंगार, वीर, हास्य व भयानक रसांची छटा ठिकठिकाणीं ग्रथित केली आहे, व मुख्यतः राजनिष्ठेची खरी कसोटी कशी असावी हें पन्नारत्नाच्या उदाहरणानें जगास निदर्शित केलें आहे.

हें नाटक आम्हीं केवळ नाट्यकलाभिज्ञ जी शाहूनगरवासी नाटक मंडळी यांच्या गुणांवर लुब्ध होऊन त्यांच्याचकरितां रचिलें आहे.

आह्मीं केलेल्या कृतीचा त्यांनीं प्रेमभावानें स्वीकार केला व देश-भाषेची आणखी सेवा आमचे हातून घडावी ह्मणून उत्तेजनार्थ त्यांनीं आह्मांस अनेक प्रकारें मदत केली, याबद्दल आह्मी आभार प्रदर्शित करतों. आर्यभूषण छापखान्याचे मालकांनीं आमचें नाटक विशेष काळजी घेऊन फारच लवकर व मनाप्रमाणें छापून दिलें याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहोंत.

ग्रंथ शेवटास जाणें हें ईश्वरकृपेचें फळ आहे. ग्रंथकर्तृत्वाचा मीपणा मिरविणें व्यर्थ होय. शेवटीं सुज्ञ वाचकांपुढें एवढेंच ह्मणणें आहे कीः—

तरि नेणतें जऱ्ही होये । तऱ्ही देखोनि बापकीं माये ।
हर्ष केंही न समाये । चोज करिती ॥ १ ॥
तैसे संत माहेर माझें । तुह्मीं मिनलिया मी लाडें जें ।
तेंचि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी ॥ २ ॥

—श्रीज्ञानेश्वर.

पुणें, पेठ कसबा, नं. २१०,
ता. १० माहे एप्रिल
सन १९१३ इ.

वासुदेव रंगनाथ शिरवळकर,
ग्रंथकर्ता.

## पात्रांची यादी.

ब्रह्मानंद— संगराण्याचा गुरु.
उदयसिंग— संगराण्याचा कनिष्ठ पुत्र ( चितोडच्या तख्ताचा खरा वारस ).
महाबलसिंह— मेवाडांतील एक सरदार.
पन्ना— महाबलसिंहाची पत्नी—उदयसिंगाची उपमाता.
संग्रामसिंह— महाबलसिंह व पन्ना यांचा पुत्र.
असासह— कुमळमेरचा सुभेदार.
बनवीर— संगराण्याचा भाऊ पृथ्वीराज ह्याचा दासीपुत्र.
निहालकुंवर— बनवीराची बायको.
जालीमसिंग— बनवीराचा मुदपाकखान्यावरील कामगार.

कांहीं भिल्ल लोक, शिकारी लोक, बनवीराचे व महाबलसिंहाचे रिसालदार, ब्रह्मानंदस्वामीचे शिष्य वगैरे.

# पन्नारत्न

## अथवा

# दिव्य राजनिष्ठा.

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला.

**स्थळ**—अरवली डोंगरांतील गुहा.

( ब्रह्मानंदस्वामी व त्यांचे शिष्य बसले आहेत. )

ब्रह्मानंदः—सर्व रजपूत घराण्यांत मेवाडचें घराणें श्रेष्ठ मानिलें आहे. कारण अयोध्येचा सूर्यवंशी राजा रामचंद्र याच्यापासून या घराण्याची उत्पत्ति. अयोध्येस त्रेसष्ट पिढया झाल्यानंतर कनकसेन नांवाचा राजा अयोध्येहून निघून सौराष्ट्रांत गेला. तेथील परमार राजास जिंकून त्यानें वीरनगर नांवाच्या राजधानीची स्थापना केली. बाप्पा रावळ, ज्यानें चितोडची स्थापना केली, तो श्रीरामचंद्रापासून ऐंशीवा पुरुष. समरसिंह बाप्पारावळापासून अठरावा पुरुष याची बायको पृथा ही पृथ्वीराज चव्हाणाची बहीण. समरसिंह महंमद घोरीबरोबर स्थानेश्वराच्या घोर संग्रामांत पडला. या सिसोदे वंशांतील सहा राजांनीं तर यवनांच्या तडाक्यांतून गया येथील पवित्र स्थळाचें संरक्षण करण्याकरितां आपले देह धारातीर्थी अर्पण केले आहेत. राणा भीमसेन आणि पद्मिनी यांची गोष्ट तर जगजाहीर आहेच. मीराबाई—सौंदर्य, औदार्य इत्यादि गुणांनीं संपन्न, महा

पतिव्रता आणि महा विष्णुभक्त, हीं सर्व ह्याच शिसोदे वंशांतील रत्नें होत. प्रस्तुत मोठा भयंकर प्रसंग गुदरला आहे! सेनाधुरंधर राणासंग, ज्यानें माळवा आणि दिल्ली येथील मोगल घराण्यांवर अठरा लढायांत फत्ते मिळविली, त्याचा आज वंशच्छेद होण्याचा प्रसंग आला आहे. बाबराशीं रणकंदन करीत असतां शिक्रीच्या दारुण संग्रामांत त्याची पीछेहाट झाली. युद्धांतून तो निघून गेला. बाबराचा सूड उगविण्याचा मनसुबा करीत असतां बिचारा जगलांत मरण पावला. सांप्रत संगराण्याच्या भावाचा दासीपुत्र बनवीर यानें चितोडचें तख्त बळकाविलें असून चोहींकडेस हाहाःकार उडवून दिला आहे. या नीचानें प्रत्यक्ष संगराण्याचा पुत्र विक्रमाजित याला जहर चारून खून केल्याची बातमी आहे. आतां तख्ताचा खरा मालक म्हटला तर विक्रमाजिताचा धाकटा भाऊ, ह्मणजे संगराण्याचा छोटा बच्चा उदयसिंग, पण तो पडला पोर. त्याची आई कर्णावती इनें गुजराथ देशाचा बादशहा बहादुरशहा यानें चितोड सही केलें त्या वेळीं जोहारांत जाळून खाक करून घेतलें. तेरा हजार औरत आणखी एकोणीस हजार मर्द रजपूत यांनीं आपले देह अग्नीला अर्पण केले. अलम लोक सांगतात कीं, बनवीर उदयसिंगाचा घात करील. आतां पेंगम कसा बांधावा! मला वाटतें पन्नेला नाहीं तर तिचा नवरा महाबलसिंह यांना बोलावून आणून हजार हुन्नर लढवून बलकुबल प्रसंगाला न डगमगतां, उदयसिंगाशीं निमकहराम न होतां, त्याचें संरक्षण केलें पाहिजे. माझ्या दर्शनाला येण्याची वेळ उभयतांची झाली असून अद्याप कां बरें ते आले नाहींत? (लांब पाहिल्यासें करून) हें कोण बरें येत आहे? मला वाटतें पन्नाच आहे. पण आज सडी कशी? तो शूर नरवीर महाबलसिंह कां नाहीं आला! (पन्ना–प्रवेश करिते.)

पन्नाः–महाराज, रोजच्यापेक्षां मला थोडा उशीर झाला. विक्रमाजिताच्या खुनाची खबर मीं आपल्याला कळविली होती. राणावंशांतला कल्होळ अद्याप थंड झाला नाहीं. महाराज, सूर्यवंशांतलें शेवटचें पुष्प कोमेजून जाईल कीं काय याची मला धास्ती वाटते आहे. उदयसींगाचे प्राण कसे वांचतील!

ब्रह्मानंदः-सूर्यवंशाचें शेवटचें फळ नष्ट होईल काय ? मग आपण तरी जगून काय करावयाचें आहे ! जोंपावेतों तुझ्या कुडींत प्राण आहे.—

पन्नाः—मी आपला स्वतःचा प्राण बळी देण्याला एका पाया- वर तयार आहें. चितोडच्या परमपूज्य वंशाकरितां मीं आ- णखी काय करावें ? कुमाराच्या मातेनें, राणी कर्णावतीनें जेव्हां जोहारांत उडी घातली, त्या वेळीं तिनें आपला पोटचा गोळा माझ्या ओटींत घातला. तो माझ्या स्वुपूर्द केला. तो मला आई म्हणून हाक मारतो. मी त्याला माझ्या संग्रामसिंहापेक्षां—माझ्या प्रत्यक्ष पुत्रापेक्षां जीव कीं प्राण करितें, हें आपल्यास माहीत आहेच.

ब्रह्मानंदः—पन्ना, तुझें नांवच पन्ना—म्हणजे बिनमोल रत्न, असें आहे. तुझी कृति तुझ्या नांवाप्रमाणेंच आहे. तूं त्याची उपमाता आहेस. तूं आपल्या अंगावर त्याला पाजून वाढविलें आहेस. आपल्या राजाकरितां, आपल्या देशाधिपतीकरितां, आपल्या अन्न- दात्याकरितां, आपला स्वतःचा प्राण देण्यास ज्या अर्थी तूं तयार आहेस, त्या अर्थी भगवान् शंकर उदयसिंगाचे प्राण तुझ्या हातूनच वांचवील. तुझा पति जवान मर्द आहे. मोगल बादशाहा जहि- रुद्दीन बाबर त्याला रुस्तूम म्हणत असे. आम्ही त्याला भीमबहादुर महाबलसिंह म्हणतों. संगराण्याबरोबर लढत असतां तुझ्या खाविंदानें कैक वेळां गनीमांची कत्तल केली आहे, त्याचें सहाय्य घे, आणखी या बनवीराचा नायनाट करून टाक. तूं रजपूत खीचींवंशांतील महिताप, म्हणजे चंद्रज्योत आहेस. हा सर्वत्र अंधार पडला आहे. आपल्या तेजानें चोहोंकडे दिव्य प्रकाश पाड.

पन्नाः—महाराजांच्या आशीर्वादानें सर्व कांहीं होणार आहे. पण गुरुमहाराज, बनवीरानें चौगर्दा कसा कोंडमारा केला आहे. त्याला पायबंद कसा लावावा ? किल्ल्याचे बाहेर पडण्याला मार्ग नाहीं. ज्या वाटेनें आम्ही आपल्या दर्शनाकरितां, सल्लामसलत घेण्याकरितां येतों, तो रस्ता सुद्धां बेलाग होत चालला आहे. सर्व वाटा रोखून टाकल्या आहेत.

ब्रह्मानंदः–मी त्याचा हिसाब ठेवीत नाहीं. बस्स, आपला निश्चय मुस्तकीम असला म्हणजे कांहीं बिघाड होत नाहीं. आपलें कार्य शुद्ध आहे. आपण आपल्या अस्सल राजपुत्राचा जीव बचावेण्याकरितां खरता खात आहों. स्वतःचे प्राण राजपुत्राकरितां अर्पण करण्यास तयार आहों. ही आपली स्वामिभक्ति, ही राजनिष्ठा, हें राजाचे ठिकाणीं असलेलें निस्सीम प्रेम, परमेश्वराला रुजू असलेंच पाहिजे, अशी बालंबाल खातरजमा असूं द्या. सत्यमेवजयते.

पन्नाः–आमच्यावर बिकट प्रसंग प्राप्त झाला तर आम्ही आपल्यास येऊन इशारत देत जाऊं. कुमाराला चितोडाहून दुसरीकडे पळवून नेला तर कसें ? आपली सल्ला असल्यास—

ब्रह्मानंदः–या गोष्टीला माझी राय नाहीं. चितोड सोडूं नका. नाहीं तर तुम्ही त्याला फंदफिसाद करून नाहींसा केला, असा गिल्ला होऊन बनवीराला अंदेसा येईल. तुम्हाला तो गिरफतार करील. तुमची गर्दन मारील. तुम्ही हयात असाल तर त्याची म्हणजे, उदयसिंगाची जान बचेल. तुम्ही येथेंच राहून आपली शाहामत लढविली पाहिजे.

पन्नाः–गुरुजी, खुरतपाक उदयसिंगाचा कोमल चेहरा पाहिला म्हणजे फुलाचा झेला वाटतो. बनवीराची घोर कल्पना मनांत एकदम आली म्हणजे माझें पोटांत भडभडून येतें. कुमार किती गुणवान् आहे म्हणून सांगूं ! त्यांतून मी आपल्या संग्रामबाळाबरोबर त्याला अंगावर वाढविला, त्यामुळें त्याला माझा लळा इतका लागला आहे कीं, जराशी मी दृष्टीआड झालें कीं, तो दिवाणा बनतो. साऱ्या वाड्यांत एकच गुल मचावतो. मला पाहिलें कीं, दवडत येतो. कंबरेला मिठी मारतो.

ब्रह्मानंदः–पन्ना, तूं नांवाची उपमाता, परंतु या समयीं तूं त्याची आईच आहेस. मी ह्मणतों कीं, राजपुत्रानें तुला आईममाणेंच लेखिलें पाहिजे. कारण आईपेक्षां त्यांची मिजास दायाच जास्त ठेवितात. आईबापापासून पैदास्त; आईबाप जन्म देऊन

मोकळे होतात; परंतु दाईला सर्व प्रकारें संगोपन करावें लागतें. माझी वृत्ति संन्याशाची, मला या तुमच्या संसारीकांच्या उठाठेवी कशाला पाहिजेत ! परंतु केवळ राणासंग माझा चेला होता, मजवर त्याचा पूर्ण विश्वास-तो माझ्या अर्ध्या वचनांत, म्हणूनच त्याच्या पुत्राकडे माझा दिल ओढतो. त्याची खुष खबर ऐकली, ह्मणजे माझ्या जिवाला समाधान वाटतें.

**पन्ना:**–आतां मी महाराजांची रजा घेतें. जशी जशी हकीकत घडून येईल तशी तशी आह्मी उभयतां आपल्या कानावर घालीत जाऊं, आणखी आपला मनसुबा घेत जाऊं. ( जाते. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**–महाबलसिंहाचा वाडा.

( राजपुत्र उदयसिंग व संग्रामसिंह प्रवेश करितात. )

**संग्राम०:**–आज सकाळपासून आई गेली तरी कोठें ! कांहीं समजत नाहीं. महाराज, आपल्याला तरी माहीत आहे का !

**उदयसिंग:**–संग्रामसिंहा, आई कांहीं विनाकारण बाहेर गेली नाहीं. रात्रंदिवस तिचा दिल फिकीरींत गिरफ्तार आहे. कोणत्या वेळीं कसा गहजब गुजरेल, याचा नेम नाहीं. बनबीरदादा, बरायखुद सैतानाप्रमाणें दिवाणा बनला आहे. रोज दहा पांच रजपूत कत्तल कमी झाले नाहींत, असा दिवस नाहीं. मनसबदार असो, दरकदार असो, नाहीं तर खासदार असो, कोणालाही तकसीर माफ होत नाहीं. तो दुस्मानाच्या बाजूचा असला कीं मार गर्दन (गार्हिवरून) माझा भाऊ–आतां कशाचा आला आहे माझा भाऊ ! विक्रमाजिताला विषप्रयोग याच्या सल्ल्याशिवाय झाला नाहीं.

**संग्राम०:**–हा इतका अहेमूक आहे म्हणतात कीं, एका रात्रीचे दरम्यान सात वेळ पथारी बदलतो. त्याला भास होतो म्हणतात कीं,

विक्रमाजित पलंगाखालून पिशाचाच्या रूपानें डोकावतो, असें बाबा एकदां म्हणत होते. त्याला मरून महिनासुद्धां झाला नसेल. पण कायहो महाराज, माणूस हक्क झाल्यापासून महिन्याचे आंत सैतान होतो ?

उदयसिंगः—संग्राम, मी तरी काय सांगूं ? पण माझा भाऊ विक्रमाजित, जर मला एकवार दिसेल तर मी धांवत जाऊन त्याच्या गळ्याला मिठी मारल्याशिवाय कधीं कधीं राहणार नाहीं. ( महाबल सिंह प्रवेश करितो. संग्रामसिंह तो आल्याचें बोटानें दाखवितो. उदयसिंग त्याच्या कंबरेस मिठी मारतो. )

महाबलः—महाराज, अलम लोक काय म्हणतील ? मी आपल्या पायाचा बंदा नौकर, कंबरबस्ता करून खडा आहें. त्यांत लटकाविलेली ही फिरंग आपल्याकरितां मौजूद आहे. कंबरेला आपण मिठी कशी मारतां महाराज ?

उदयसिंगः—बाबा, मी तुमचें लेकरूं आहें, मी महाराज नाहीं, कोणी नाहीं. मी स्वतः बाबाला कधीं पाहिल्याचें आठवत नाहीं. आई मात्र बहादुरशहानें मुलूख मारून धुंदी केली, त्या गर्दींत जोहारांत खाक झाल्याचें स्मरत आहे.

महाबलः—( एकीकडे ) कुमार उदयसिंग मला बाबा म्हणतात. तो हुकमतपन्हा सफेजंग बहादर महाराणासंग कोणीकडे, आणखी मी बाराहजारी कोणीकडे ! यानें मला बाबा म्हटलें कीं, माझे अंगांत बिलकुल कजाखी नाहीं, जवामर्दी नाहीं, असें मला वाटतें. दासीपुत्र—बटकीचा कारटा, मी म्हणतों, राणासंगाचा भाऊ जो पृथ्वीराज त्याच्या नाटकशाळेचा कारटा, मुलूख मारून प्रत्यक्ष राणासंगाचा औरस पुत्र विक्रमाजित याला ठार करून आपण एखत्यारी करितो. सिंहासन भ्रष्ट करतो. त्याचा बदनकशा झालाच पाहिजे. त्याचा मुलाहिजा बिलकुल धरितां कामा नये. ( उघड ) महाराज, बोला काय हुकूम आहे ना. आतांचें आतां मी आपली शिबंदी गोळा करितों. फौजेची कलमजारी करितों. पलट्याच्या जरबा गोळा करितों. मोर्चेबंदी करून बहुत कजाखीची लढाई करून शर्त करितों.

बनवीराच्या वाड्याखालीं भुयारें खोदून सुरुंग ठासतों. तोफांची मारगिरी करितों. जातीनें मोर्च्यांत जाऊन मोर्चे चालवितों.

**उदयसिंगः**–बाबा, इतके गरम होऊं नका. तुमचें हें भाषण मीं ऐकलें म्हणजे मला वाटतें तुम्ही प्रत्यक्ष रुद्राचे अवतारच आहांत. तुम्ही एका लहेजांत त्या बांदीच्या कारट्याला नेस्तनाबूत कराल. पण बाबा, अद्याप तसा वख्त आला नाहीं.

**महाबलः**–आणखी म्हणूनच मी गम खात आहे. खामोश बसला आहें. बेलाग त्याच्यावर तुटून जाऊन मीं हमला केला असता, परंतु फत्तेमंदेची खामखा खातरी नाहीं. आणखी मीं जर गनीमावर मात केली नाहीं, तर माझी फौज गारत झाली म्हणूनच समजा. मग सरकाराची, या छोट्या खुरतपाक सरकाराची कोण सरबराइ करील ? मग महाराजाला तख्तनसीन कोण करील ?

**उदयसिंगः**–मला अमिरी नको, मी फकीर बरा. पण बाबा, मला तुम्ही तीळभर सोडून जाऊं नका. आईला तरी मी हेंच सांगतों. आज सकाळपासून आई कोठें गेली आहे बाबा ?

**संग्राम०ः**–( एकीकडे ) उदयसिंग जवळ असला, म्हणजे बाबा मजकडे पाहातसुद्धां नाहींत. मग माझ्याशीं भाषण कशाचें ? मी सुद्धां उदयसिंगावरून हा जीव कुरबान् करीन. ( उघड ) बाबा, बनवीराला पलंगाखालीं भूत दिसतें होय ?

**महाबलः**–बेटा, मला तरी काय माहीत ? लोक म्हणतात म्हणून मी म्हणतों. ज्याचें मन त्याला खात असतें. ज्याचीं कृत्यें सैतानासारखीं असतात, त्यालाच सैतान दिसतें. त्याला सुखानें झोंप कशी येणार ? या सैतानाच्या कामांत बनवीरानें हाबक खाल्ली आहे, एवढें मात्र खास. सारे रात्र त्याला झोंप नसते. ( पन्ना प्रवेश करते. उदयसिंग तिचे कमरेस मिठी मारतो. )

**उदयसिंगः**–आई, आई, तूं आह्मांला सोडून आज कोणीकडे गेली होतीस ? आह्मी सारखी तुझी रहा पहात आहों.

**पन्नाः**–( एकीकडे ) कुंतीचें लक्ष जसें धर्म, भीम, अर्जुन, यांच्यापेक्षां सहदेवावर फार, तसें माझें झालें आहे. माझ्या पोटचा गोळा माझा संग्राम, पण मला त्याच्यापेक्षां उदयसिंग जास्त वाटतो. ( उघड ) अहो पाहिलेंत का हें प्रेम ? ही दुसऱ्याची ठेव आहे. नीट जपून ठेविली पाहिजे. कांहीं तरी याच्या पोटांत कपट आहे का ? महाराज, मी कांहीं जरूरीच्या कामाकरितां बाहेर गेलें होतें.

**उदयसिंगः**–पण आई, आमचा रोजचा तार्टे टाकण्याचा वख्त नाहीं का होऊन गेला ? तूं मुदपाकखान्यांत नसलीस म्हणजे मला भय वाटतें.

**महाबलः**–कशाचें भय वाटतें महाराज ?

**उदयसिंगः**–चाचा, माझ्या अन्नांत कोणीं जहर कालविलें तर मला कसें समजणार ? शागिर्दपेशा सगळा बनबीरदादाच्या जाप-त्यांतला. तुमच्या शिवाय माझा कोण पाठिंबा आहे ?

**महाबलः**–छे, छे. सरकार, भगवान् रामचंद्र आपले वाली आहेत. त्यांच्या आज्ञेशिवाय एक पान हलावयाचें नाहीं. आज-पासून तूं आपल्या हातांनीं मुदपाकखान्यांत पक्वान्नें तयार करीत जा. आणखी महाराजांना खाऊं घाल. समजलीस ? हे दिवस कोणावर इतबार ठेवण्याचे नाहींत.

**उदयसिंगः**–आई मला वाईट वाटतें. मी तरी काय करूं ? मी राजपुत्र, पण तुमचे उपकार माझ्या हातून कसे फिटणार ? सारी सलतनत माझी, पण एक छदाम मी कोणास धर्म करीन ह्मटलें तर माझा हक्क नाहीं. सर्व मुरब्बी कर्ते धुरंधर, बनबीरदादा आहेत. आई, चाचा, माझ्यामुळें तुम्हांला काचणी झाली आहे.

**महाबलः**–महाराज, काचणी कशाची ? स्वामिभक्तीची कसोटी पाहण्याची वेळ वारंवार येत नसते. या वेळीं आमच्या उभयतांच्या सत्वपरीक्षेची वेळ आहे. आह्मीं आपल्या राजाकरितां–तळहातावर शिर घेतलें आहे. सतीचें वाण घेतलें आहे. जोंपर्यंत आमच्या कुडींत प्राण आहे, तोंपर्यंत आम्ही आपल्या राजाकरितां या

आमच्या कलीजाकरितां कायावाचामनेंकरून वाटेल ती हाल-अपेष्टा सहन करूं. आमच्या राजाकरितां आम्हांस कोणीं सुळावर दिलें तर आह्मी खुषीनें जाऊं. कोणीं आमचा कडेलोट केला, जहर पिण्यास दिलें, पेटलेल्या मडाग्नींत लोटून दिलें, हत्तीच्या पायीं ठार केलें अथवा अथाक पाण्यांत समाधि दिली तरी हरकत नाहीं. पण या उदयसिंगमहाराजांच्या केंसाला धक्का लावून देणार नाहीं. सरकारांनीं बिलकुल फिकीर करूं नये. राजा आमचा भगवान्, आमचा अन्नदाता, आमचा राजा रामचंद्राचा अवतार, असें आह्मी समजतों. पन्ना, तुझें ह्मणणें काय आहे ?

पन्ना:–या माझ्या संग्रामा शपथ मी महाराजाकरितां स्वतःचा देह करवतीं घालीन. शरीराला गळ टोंचून घेईन. सुया टोंचून घेईन. डोंह. घरीं हरिश्चंद्रानें पाणी भरलें, पण सत्व सोडलें नाहीं. तसेंतोस ! उदयसिंगाकरितां–या राजपुत्राकरितां कैदखान्यांत पडादेमतीला सक्तमजुरीचीं कामें करीन. सत्वभंग होऊं देणार नाहीं. आहे तसें

संग्राम०:–आई, बाबा, तुमची शपथ घेऊन सांगतों का यांना बीराचा जरी जिकडे तिकडे जल्लोष चालला आहे तरी त कमी. राजाकरितां, या माझ्या भावाकरितां, मी आपले स्वत न. ईश्वर-क:पदार्थ समजतों. माझे तिळा–तिळाएवढे तुकडे होईप। महाराजांचे पाय सोडणार नाहीं. अगोदर या प्राणाची आहुति, न महाराजावर कोणीं खंजीर चालवावा.

उदयसिंग:–( एकीकडे ) हे प्रभो, कोदंडधारी भगवान् रामचंद्रा, तूं आमचा पूर्वज आहेस. या चितोडच्या सूर्यवंशांत माझा जन्म झाला आहे. तुझा अंगचें शुद्ध आणि सात्विक रक्त जर माझ्या या नसांतून खेळत असेल, तर तूं ज्याप्रमाणें दशकंठाला ठार केल्यावर बिभीषणाला सुवर्णाची लंका देऊन चिरंजीव केलेंस, तशी उदार-पणाची देणगी या माझ्या राजनिष्ठ सेवकांना माझ्या हस्तें देऊन, मला यांचे उतराई कर. ( उघड ) आई, बाबा, संग्रामसिंहा, प्रभु-रामचंद्राच्या कृपेनें जर आपण सर्व हयात राहिलों, कांहीं अस्मानी सुलतानी घडून आली नाहीं, आणखी मी जर प्रत्येकाच्या आशीर्वा-

दानें तख्तनसीन झालों, तर तुम्हांला काय देणार? पण ही मसनत तुमची स्वतःचीच आहे असें समजा. यापेक्षां मी जास्त काय बोलूं. श्रीरामचंद्रांनीं जसा अंगदाचा प्रतिपाळ केला, अथवा भगवान् श्रीकृष्णानें जसा अर्जुनाचा प्रतिपाळ केला, तसा तुम्ही माझा प्रतिपाळ करा. ( बनबीर व लालसिंग येत आहेत असें पाहून ) खामोश, विगरइत्तला बनबीरदादा व लालसिंग आपल्या मुलाखतीकरितां येत आहेत. ( बनबीर व लालसिंग प्रवेश करितात. )

बनबीरः-( एकीकडे ) हा कांटा काढूनच टाकला पाहिजे. माझ्या काळजांत शल्याप्रमाणें सलतो आहे. याचा नायनाट झाला कीं, मी निर्धास्त झालोंच. विक्रमाजिताचा जसा दग्यानें घात ..., तसाच याला गारद केला पाहिजे. बलके स्वदस्तूर खंजीर उदय... त्याचा मौका आला, तरी घाव केलाच पाहिजे. मी दासी-
मला कसें रु...
त्यांतला. तुम... चा बेटा ह्मणजे कमअस्सल, आणि हा म्हणे औरस पुत्र, अवकात पहा, सुरत पहा; पण आम्ही दोघे पुत्रच ना!
महाबलः चुलत भाई, दायाद. हा सुवर्णपात्र, आणि मी मृत्तिका-
आहेत. त्यां... दोन्हींतही पाण्याची मजा एकच ना! मग रयत
पासून तूं अ...णें मजवर फिदा कां नाहीं? ( उघड ) लालसिंग, येथें
जा. आप... मी दयेचा प्रत्यक्ष पुतळाच आहें असें दाखवावयाचें बरें का?
कोण... माळ लालसिंग.

लालसिंगः-मग मी महाराज आल्याचा इत्तला उदयसिंगमहाराजांला देतों. ( पुढें होऊन ) बनबीरमहाराजांची स्वारी मुद्दाम राजपुत्र उदयसिंगमहाराज, यांच्या मुलाखतीकरितां आली आहे.

उदयसिंगः-( एकीकडे ) हत्ती माजलेला जरी झाला, तरी तो सिंहापुढें येण्याला जसा कच खातो, तसा हा बनबीर बाबांच्यापुढें येण्याला कच खातो. बहुतेक मला जियाफतीला घेऊन जाण्याकरितां आला असेल. विक्रमाजिताचा जसा गफलतीनें अन्नांत विष कालवून घात केला, तीच तरकीब आमच्याबद्दल असेल. पण एकच युक्ति, सर्वत्र सारखी लागू पडत नाहीं.

बनबीरः-( प्रवेश करून ) बेटा उदयसिंग, तुझा मिजास कसा काय आहे ? काय महाबलसिंह, आपल्याला हा चाचा म्हणतो म्हणतात ? आणखी पन्नेला, आई म्हणतो ? अगदींच वेडा !

महाबलः-लहानपणापासून इच्या अंगावर वाढलें असल्यानें साहजिकच ते अशा नांवानें हाक मारितात. बाकी, आह्मी आपला दर्जा कांहीं विसरलों नाहीं. आह्मी त्यांची बरदास्त त्यांच्या इभ्रतीप्रमाणें राखतों. नाहींतर आमच्यावर मोठा इलजाम् आला असता.

बनबीरः-याचे आईबाप पंचत्व पावले; तेव्हां हा बेवारसी माल झाल्याप्रमाणेंच झाला आहे. वाटेल त्यानें त्याच्यावर आपली सत्ता सांगावी. ( एकीकडे ) बाकी हें कारटें अव्वल दर्जाचें इबलिस आहे. ( उघड ) बेटा उदयसिंगा, तूं आतां यांच्या काबूंत कां रहातोस ? आमच्य कृपाछत्राखालीं कां रहात नाहींस ? तुझ्या दिमतीला शेंकडों दास, दासी, देण्याचें सामर्थ्य जसें आमच्यांत आहे तसें यांच्यांत नाहीं. मला तूं जितका प्यारा आहेस तितका यांना होणार नाहींस. बोलून चालुन हे परके. तुला समजूत कमी. अकलमंद असतास तर आमच्याकडे दौडत आला असतास. ईश्वरसाक्ष तुझ्याकरितां माझा कलीजा तीळ तीळ तुटतो आहे रे !

महाबलः-( एकीकडे ) हरामखोर ! दुसऱ्याचे दौलतीवर डल्ला मारून, महाराज विक्रमाजिताला पार गारद करून पुनः साव तो साव. ( उघड ) महाराजांचें म्हणणें खरें आहे. परंतु राजपुत्र उदयसिंग यांची मोहबत अगदीं तान्हे होते तेव्हांपासून आमच्यावर जडलेली आहे. त्यांना आईबापाची संवय मुळींच नाहीं. ते आमच्या संग्रामसिंहाबरोबर वाढले. आम्ही त्यांचे सर्व लाड पुरवितों.

बनबीरः-महाबलसिंह, तुमची स्वामिभक्ति महशूर आहे. दिगंत कीर्ति गाजविणारा ( स्वगत ) मी सुद्धां दिगंतकीर्ति गाजवीन, पण आणखी कांहीं दिवस अवकाश पाहिजे. ( उघड ) संगराण यानें अनेक वेळां तुमच्या मर्दुमकीची, तुमच्या स्वामिभक्तीची तारीफच केली आहे. पण आतां संभाळा हो ! फार खराब, फार

खराब, फार मुष्किलीचा वक्त आला आहे. या कुमाराला एखादा दगाफटका व्हावयाचा म्हणून म्हणतों, यानें आतां आमच्या दस्त-पंज्याखालीं दिवस काढावे म्हणजे बेफिकीर राहील.

उदयसिंगः–( एकीकडे ) याला पाहिला म्हणजे माझें मस्तक एक-दम गरम होऊन मी संतापानें अगदीं बेहोष होतों. वाटतें एकदम याच्या छातींत पेषकब्ज् खुपसून याचा प्राण घ्यावा. याचे हात, पाय छाटून टाकावे. याची जबान खेचून बाहेर काढावी. याचे डोळे तापलेल्या सांडसानें फोडून टाकावे. याच्या दस्तपंज्याखालीं म्हणजे सिंहाच्याच पंज्याखालीं दिवस काढावयाचे. ( उघड ) मला माझ्या पन्ना आईनें आपल्या संग्रामाबरोबर अंगावर दूध पाजून लहानाचें मोठें केलें. आम्ही तिचीं आवळींजावळीं लेंकरेंच आहोंत. आईला सोडून मी तुमच्या दस्तपंज्याखालीं आलों तर सिंहाच्या पंज्याखालीं जसा हत्तीचा बिचवा जगणें कठीण तसें मला होईल.

पन्नाः–माझा उदयसिंग क्षणभर दृष्टीआड झाला, तर मासा जसा पाण्याशिवाय तडफडतो, तसें मला होतें. नाहींग बाई, मी आपला पंचप्राण लोकांचें कबजांत देणार. घटकाभरसुद्धां देणार नाहीं. याच्यावरून मी आपला देह कुरबान करीन.

बनबीरः–तुम्ही त्याची उपमाताच आहांत, परंतु मला हा तुम-च्यापेक्षां हजारपटीनें जास्त प्यारा आहे. हा वयांत आल्याबरोबर याला मी तख्तनशीन करणार. मी स्वतः सर्वसंगपरित्याग करून हिमाचलावर घोर तपश्चर्येला जाणार. याचा दर्जा, याचा मानमरा-तब, याचा इतमाम तुमच्या घरीं रहाणार कसा! याला मी राज-कारस्थानांत असा पटाईत करीन, घोडयावर बसण्यांत असा वाकब-गार करीन, पटाईत वाघाच्या शिकारींत असा तरबेज करीन कीं प्रत्यक्ष स्वतःच्या मुलापेक्षां जास्त!

संग्राम०ः–सरकार म्हणतात, त्या सर्व मर्दुमकीच्या खेळांत उदय-सिंगमहाराज सगाईत आहेत. दौडत जाऊन भरधांव घोड्यावर स्वार होणें, चौपाई धांवत्या घोड्यावरून भाल्याची फेंक करून अचा-

नक लिंबू उडविणें, शिकारींत वाघाला चिरडीला नेऊन अंगावर घेऊन ठार करणें, इत्यादि जवामर्दीच्या गोष्टी तर महाराज उदयसिंग आतांच करितात. आमच्या बाबांनीं आपल्या गोष्टींत वाकबगार केलें आहे.

**पन्नाः**–बेटा संग्राम, तुला मध्यें बोलण्याचें कारण नाहीं. सरकाराबरोबर आह्मी बोलूं.

**संग्रामः**–( एकीकडे ) सरकार महाराज खाविंद हुजूर सर्व आह्मी एक उदयसिंगाला समजतों. ( उघड ) अरवली डोंगराच्या खोऱ्यांत एक भयंकर वाघीण पिसाळल्याचें हेरांनीं येऊन सांगितलें आहे. महाराजांची मर्जी असल्यास शिकारीला जाऊं.

**बनवीरः**–(एकीकडे) हा दुसरा कारटा, उसेबी जादा ! शिकारीची गोष्ट यानेंच होऊन काढली आहे. मी म्हणतों देवानें मला हा एक रस्ताच दाखविला. ( उघड ) ठीक आहे. तूं म्हणतोस त्याप्रमाणें आमची तयारी आहे. महाबलसिंह, या दोघांना बरोबर घेऊन उदईक आह्मी शिकारीला जातों. तुमची येण्याची कांहीं जरूरी नाहीं. आह्मी ती शिकार पार पाडतों. ( एकीकडे ) आणखी तिच्याबरोबर ह्यांचीही शिकार पार पाडतों. ( उघड ) चला राजवाड्यांत, जियाफतीला ताटें टाकलीं आहेत. भोजन करून घेऊन उदईक हा फैसला. ( उभयतां मुलांस हातीं धरून घेऊन जातो. )

**पन्नाः**–हें तुह्मी काय केलेंत ? कुमाराला तुह्मीं जाऊं कसा दिलांत!? कांहीं तरी सबब पुढें आणायची. आतां त्यांच्या जिवाला कांहीं अपाय झाला तर ?

**महाबलः**–राजाज्ञेपुढें मी तरी नाहीं कसा म्हणूं ! राजाज्ञा मोडतों म्हणून एकदम त्यानें आपल्या वाड्याभोंवतीं चौगर्दा गराडा दिला आणखी आपणां सर्वांस एकदम गिरफतार केलें तर? अनेक शुभा माझे मनांत उभ्या राहिल्या. मी कांहीं शक्कल लढविणार, तोंच तो गेला उभयतांना घेऊन. मला नुस्ती दावतसुद्धां नाहीं.

**पन्नाः**–हमखास त्याच्या मनांत दगा आहे. कोणत्या नाहीं कोणत्या मिसलीनें त्याच्या दिलांत राजपुत्राचा घात करायचा आहे.

उघड उघड बोलण्यांत कसा मिठ्ठास आहे! पण अंतर्यामीं या मांगाच्या मनांत जहर भरलें आहे हो! केवढा हा घात! हायरे देवा, आतां काय करूं! माझ्या लेंकराचे प्राण वांचतात कसे? मीं तुम्हाला दहा वेळ सांगितलें कीं, आपण कुमाराला घेऊन देवळा येथील सिंगराव यांजकडे आश्रय मागण्यास जाऊं. त्यानें आश्रय दिला नाहीं तर, डोंगरपूर येथील यशकर्ण, चितोडच्या राजवंशीय शाखें-तील आहे, त्याजकडे जाऊं. ईडर प्रांतांतून अरवली डोंगराच्या खोऱ्यांतून भिल्ल लोकांच्या आश्रयानें कुमळमेरास जाऊं. तेथील अधिकारी सुभेदार जरी श्रावक आहे, तरी खास खास आपला पुस्तपना करील. त्याच्या मांडीवर राजपुत्राला ठेविला असता. त्याच्यापुढें पदर पसरून एवढी जोड मागितली असती. त्यानें नाहीं ह्मटलें नसतें. कारण त्याच्या आईचा मजवर लेकीप्रमाणें लोभ आहे. आणखी तो स्वतः रामचंद्राप्रमाणें मातृभक्त आहे.

महाबलः-( एकीकडे ) इला तर अगदीं देहभान नाहींसें झालें आहे. आतां इला आवरूं कीं त्यांना जाऊन संभाळूं? ( उघड ) पण पन्ना, आतां काय त्याचें? राजपुत्र निघून गेला. त्याचे प्राण वांच-विण्याची तरकीब काढायची टाकून तूंही नामावळी कसली सांगत बसलीस? घोर प्रसंग प्राप्त झाला आहे. यांतून आपण राजपुत्राचे प्राण कसे वांचवायचे याचा मनसुबा करूं. मी स्वतःचे दिमतीला कांहीं खासे खासे मर्दांना शूर रजपूत जवान, जिवाला जीव देणारे दोस्त बरोबर घेऊन जियाफतीचे थोरले दालनांत, 'शिकार लवकर साधा, भोजन लवकर आटपा' या निमित्तानें जातों. कांहींतरी सबब काढून राजपुत्राजवळ उभा राहतों. कांहीं दगा दिसला कीं, बनबीराच्या छाताडांत खंजीर खुपसून त्याचा प्राण घेतों. मग नतीजा काय होईल तो होवो.

पन्नाः—ते दोघे गेले आणखी इकडून खासा स्वारी जाणार. मग हा तिसरा घात! देवा नारायणा, धांव आतां! माझ्या चुडेदानावर घाला पडण्याची वेळ आली. मीं त्या जोहरांत उडी घातली नाहीं त्याचें मला हें फळ प्राप्त झालें. महाराज, मी खात्रीनें सांगतें कीं,

तुम्हांला राजवाड्यांत मज्जाव होईल. अगोदरच त्यानें कडेकोट तयारी केलेली आहे. सुरुंग खोदून दारू भरून ठेविली आहे. आतां फक्त बत्ती देण्याचा अवकाश. तुम्हांला सुद्धां तो त्या आगींत खाक करील. नको नको, तो प्रसंग नको ! मी स्वतः आतां मुदपाकखान्यांत जातें. प्रत्येक पदार्थ राजपुत्राच्या ताटांतला खाऊन पाहतें. मी मेलें तर मेलें. पण कुमाराचे प्राण तुह्मी वांचवा.

महाबलः—अगदीं दिवाणी झालीत. ह्या अशा तुमच्या कल्पनांनीं विनाकारण भलतीच तोहमत उत्पन्न होईल. मी जातों, ऐक तूं माझें. त्या मुडद्याराचा हिसाब काय ? हड्डी नरम करून टाकीन. मी बनवीराचे पुढचें ताट उचलून राजपुत्रापुढें ठेवीन. असें करण्याला चुकणार नाहीं. तूं जाणतेस कीं, मला तो वचकून आहे. ज्या रजपूत राष्ट्रानें संगराण्याच्या वेळेस एक वेळां कीर्तिपर्वताच्या शिखरावर आरोहण केलें, वैभवसुखसमुद्रांत अवगाहन केलें, तें राष्ट्र ह्या बनवीरानें—राखेच्या पोरानें विटाळलेलें पाहून कोणता अस्सल रजपूत आपल्या प्रखर शस्त्रास हात घालणार नाहीं ? आज बनवीराला मारीन किंवा मी तरी मरेन, पण चितोडच्या गादीचा खरा वारस जिवंत परत आणीन. तूं अगदीं स्वस्थ अस. ( ब्रह्मानंदस्वामी वेषांतर करून प्रवेश करितो. ) हा कोण ! दुष्मन कीं दोस्त ? दुष्मन असलास तर या माझ्या खांड्याला बळी पडलास म्हणून समज. एक पाऊल पुढें कीं भरलींच तुझीं शंभर वर्षें. दोस्त असलास तर शिरस्त्राण वर कर. मला तुझा चेहरा पाहूं दे.

पन्नाः—दगा, दगा. मी खात्रीनें सांगतें कीं, दगा आहे. ज्याअर्थी हा कांहींच बोलत नाहीं, शिरस्त्राणही वर करीत नाहीं. त्याअर्थी हा कोणी तरी दुष्मन असून दगलबाजी करण्याकरितां आला आहे.

ब्रह्मानंदः—( एकीकडे ) महाबलसिंह आणि त्याची पन्ना उभयतां माझी पुरशीस न करितां मला एकदम कत्तल करतील, इतके बेफाम हे कां बरें झाले आहेत ? ह्यांच्यावर कांहीं तरी चिकट प्रसंग

प्रोष झाला आहे. (उघड) कायरे महाबलसिंहा, तुझें मस्तक इतकें भेणाणून कशानें गेलें आहे ! राजपुत्र उदयसिंग कोठें आहे ?

पन्नाः–आपण यांना ओळखिलें नाहीं. आपले गुरुमहाराज स्वामी ब्रह्मानंद नव्हेत का ? महाराज, आह्मी आपल्यास शरण आहों. या दासांना क्षमा असावी. कुमार उदयसिंगाला बनवीर भोजनाकरितां घेऊन गेला.

ब्रह्मानंदः–आणखी तुह्मीं त्याला जाऊं कसें दिलें ? काळसर्पाच्या जबड्यांत आपण होऊन हात घातलांत ! अगदीं गैरशिस्त गोष्ट केलीत. तो हरामजादा त्याच्या अन्नांत जहर कालवील, याची तुह्माला शंका कशी आली नाहीं ! एखाद्या जहराचा असा जालीम परिणाम असतो कीं, तें पोटांत गेल्याबरोबर पानाला चुना लावून देत नाहीं. मनुष्य तत्काळ ठार होतो. एखाद्या कृष्णसर्पाची गरळ त्यानें अगोदरच पैदा करून ठेविली असेल. आज सकाळीं कांहीं गारुडी माझ्या गुहेच्या आसपास डोंगरांत एक भला मोठा सर्प धरितांना मीं पाहिलें होतें. मला वाटतें तो याच कामाकरितां असेल. बरें झालें, मला बुद्धि झाली, आणखी या समयीं मी येथें आलों.

महाबलः–आपल्याला ईश्वरानेंच पाठविलें. महाराज, आतां राजपुत्राचे प्राण वांचविण्याचा उपाय सांगा. मीं आपलें शिर तळहातावर घेतलें आहे. मला माझा जीव कःपदार्थ वाटतो. स्वामिभक्तीकरितां मी वाटेल तीं संकटें सोशीन. मला अथाक समुद्रांत फेंकून द्या. अग्नींत जाळून खाक करा. नाहीं तर माझा कडेलोट करा. पण राजनिष्ठेपासून–स्वामिभक्तीपासून पराङ्मुख होणार नाहीं.

पन्नाः–याप्रमाणेंच मीं सुद्धां आपले प्राण राजकुमाराला अर्पण केले आहेत. स्वामीमहाराजांनीं वाटेल ते दारुण उपाय सांगावे, आह्मी उभयतां ते करण्यास क्षणभरसुद्धां कचरणार नाहीं. पण स्वामीमहाराज, या समयीं उदयसिंगाचे अमोल्य प्राण त्या मांगाचे हातून वांचवा हो वांचवा !

ब्रह्मानंदः–धन्य आहांत तुह्मी ! तुझ्यासारखीं आणि या पन्नेसारखीं उदार अंतःकरणाचीं स्वामिभक्त रत्नें ज्या देशांत निर्माण

२५

झाली तो देश, अथवा ज्या भाग्यदास राजाच्या पदरीं अशीं चिह्नें असतील तो राजा अत्यंत धन्य होय. तुमची निष्ठा व स्वामिभक्ति पाहून मला अत्यंत समाधान वाटत आहे. तुह्मी आतां असें करा. एकदम मुदपाकखान्यांत जाऊन सर्वांवर, सर्वप्रकारच्या अन्नांवर कडक जाचता ठेवा. कांहीं हिल्ला हरकत केल्यास तसें करणाराला अगोदर गिरफतार करा. चमयफौज तुमची तयारी असूंद्या. त्या गर्दीत उदयसिंगाला एकदम मजकडे पाठऊन द्या. असें साधलें नाहीं, तर निदान जो शागिर्द किंवा वाढपी त्याचें ताट वाढून आणील त्याजवर सक्त नजर ठेवून तेंच अन्न प्रथम त्याला खाव-यास लावा. कच खाल्ली कीं, लाथ मारून खालीं पाडा. मानेवर सुरा ठेवा. कबूल झाला म्हणून समजा. बनवीराचें त्यानें नांव घेतलें कीं—

पन्ना:–ही युक्ति मला पसंत आहे. असें केल्यानें उदयसिंगाचे प्राण खात्रीनें वांचतील.

महाबल:–स्वामीनीं उदयसिंगाला प्राणदान केल्याचा डंका त्रिभु-वनांत गाजेल. माझ्या मर्दुमकीची मी शर्त करीन पण उदयसिंगाचे प्राण वांचवीन. बनवीरानें सर्वत्र मलई माजविलेली आहे. त्याचा कसूर दिसला कीं, त्याला या गर्दीत गारद करून टाकतों.

ब्रह्मानंद:–जातों मी आतां. अरवली डोंगराचे गुहेंत मी तुमची रहा पहात बसतों. या कामीं बिलकुल अवकाश उपयोगा नाहीं. ( उभयतां पायां पडतात. ) जियाफतीच्या दालनांत जर तुम्हांला मज्जाव झाला आणखी तो होणारच, तर तटाच्या भिंती वाटेल त्या उपायांनीं चढून जाऊन काम फत्ते करून या. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—राजवाड्याच्या गच्चीखालील भव्य पटांगण.

( बनबीर वेष पालटून प्रवेश करतो. )

**बनबीरः**—काय होईल तें होवो. या कारट्याला नेस्तनाबूद करून संगराण्याचें नांवनिशाण नाहींसें केलेंच पाहिजे. असें केल्याशिवाय माझा रुबाब रयतेवर पडणार कसा ! आजपावेतों या कामांत ढिलाई झाली. हें अगदीं बेजा काम झालें. आजचें आज हें काम फत्ते झालें तर बहुत बेहतर, नाहीं तर दुसरी शक्कल लढविली पाहिजे. वाघाची शिकार. सर्व शिकारी लोकांना आंतून मोठमोठीं इनामें देण्याची तजवीज करतों. वाघ त्याच्याच अंगावर किरण साधून झडप घालील असें करतों. वाघानें त्याच्या नरडीचा घोंट घ्यावा, पंजानें त्याच्या अंगाच्या चिंध्या कराव्या अशी तजवीज करतों, तीही मात्रा लागू न पडली, तर तिसरी मात्रा—मारेकरी घालतों. स्वतः मारेकरी बनतों. एक, दोन, तीन, हरतजवजि करून दुनयेंतून त्याला पार करीन तरच नांवाचा बनबीर. कांहीं तरी खुसपट काढून या महाबलसिंहाला कैदखान्यांत टाकला पाहिजे. हा राक्षस एकदां पिंजऱ्यांत अडकला कीं, मग त्याची ती पन्ना एकटी काय करणार ? राजपुत्राचे प्राण कसे वांचविते तें पहातों. ( विषानें भरलेली एक कुपी बाहेर काढतो. ) हें जालीम जहर, ही भयंकर कृष्ण भुजंगाची विखारी गरळ, मला पैदा करण्याला कोण तखलीफ पडली ! याचा एक बुंद पोटांत गेला कीं, तेथल्या तेथें अदमी नेस्तनाबूद. असें मला खुदाची कसम घेऊन त्या गारोड्यानें आश्वासन दिलें आहे. फतेमंदी झाल्याबरोबर हजार मोहरा त्या गारोड्याला बक्षीस देण्याचा एकरार मीं त्याच्याशीं केला आहे. ( जालीमसिंग अन्नाचें ताट घेऊन प्रवेश करतो. ) कोण तो ? जालीमसिंग, जालीमसिंग, चाललास कोठें ? मला पछानतोस काय ?

**जालीमसिंगः**—महाराज, सरकार, मी अगदीं भिऊन गेलों. आपला लिबाज पाहून कोणीही—प्रत्यक्ष महाराणी निहालकुवर-

बाईसाहेबसुद्धां आपल्याला पछानणार नाहींत. मग इतरांची बिशाद काय ? हां, सरकार आपण आवाज मात्र बदलला पाहिजे. मीं आतां आवाजावरून ताडलें कीं, ही सरकारस्वारी.

बनबीरः-तें असो. पण हें तूं काय घेऊन जात आहेस ?

जालीम०ः-महाराज, हेंच तें ताट सरकारांनीं सांगितल्यावरून मुद्दाम तयार करून सर्वांची नजर चुकवून या रस्त्यानें मी आलों. मी अगदीं घाबरून गेलों आहें सरकार. माझ्या अंगाचा पसीना, पसीना झाला आहे. हें असलें घोर कर्म मला जन्मापासून, माझ्या बापजाद्यापासून आज तागाईत पैशाकरितां किंवा जहागिरीकरितां-

बनबीरः-चूप, बकवा मत कर. जर कोणापाशीं ब्र काढलास, तर जबान छाटून टाकीन, सुळावर चढवीन, हत्तीच्या पायांशीं बांधून ठार करीन. अंगाची चामडी सोलून काढीन, खबरदारी ठेव.

जालीम०ः-नाहीं सरकार, पण हें घोर घोर पातक ! याचा हिस्सेदार मी होत आहें ! संगराण्याचा पुत्र-चितोडनगरीची शोभा, तिचा कुंकुमतिलक ! त्याचा आज खून होणार ! हें पंचमहापातकांतलें पहिलें पातक आपल्या माथ्यावर कां घेतां ?

बनबीरः-तुला वाढण्याला इतकी पंचाईत कशाला पाहिजे ? संन्याशाला लग्नाची उठाठेव कशाला ? आण इकडे तें ताट. बघूं काय काय पदार्थ केले आहेत ? सरपोस बाजूला कर. ( पहातो ) हां बहोत बेहतर. रेलचेल-पदार्थांची एकच गर्दी करून दिलेली आहे. खुष झालों. पण अव्वल हाच पदार्थ तो खाणार-हाच तो ( विष ओततो ) बस्स, झालें काम. जालीमसिंग, मुदपाकखान्यांत जा. सर्व ताटांबरोबरच हें ताट घेऊन जा. आणखी नमूद केलेल्य जागीं जियाफतीच्या दिवाणखान्यांत नेऊन ठेव. गाफल राहूं नको नाहीं तर ताटांची गल्लत होऊन भलत्याला भलतें ताट जाईल. कदाचित् मलाच येईल. सगळीं ताटें सारखीं आहेत म्हणून म्हणतों.

जालीम०ः-( एकीकडे ) मला यापेक्षां मरण पत्करलें पण या नचिाचें मुखावलोकन नको. मीच कमनसीब ! ( जातो. )

**वनबीरः**–( एकीकडे ) उदयसिंगा, तूं अद्याप बच्चा आहेस. तुझ्या-कडे कांहीं तकसीर नाहीं. हें अगदीं खरें, पण मी तरी काय करूं? सापाचें पिलूं खिशांत बाळगून काय उपयोग? केव्हां दंश करील याचा काय भरंवसा! आतांच तुझा नायनाट केला, म्हणजे मला पुढें जाचक होणार नाहीं. माझ्या पुत्रांना बिनघोर रस्ता झाला. विक्रमाजिताला तरी असाच दग्यानें नाहींसा केला. आणखी तुलाही पण त्याच्या मुलाखतीला बिलकेल पाठविला कीं, माझा जल्लोष सुरूं झालाच. मग कंचन्यांचा नाच, इष्कबाजी, यांच्यांत गर्द. जे राजे ऐषआरामांत–चैनींत दिवस काढीत नाहींत, ते अगदीं कुचकामाचे असें मी समजतों. परमेश्वरानें जर आपल्याला राशद दिली आहे, तर आपण तिचा सुखोपभोगाकडे मनसोक्त उपयोग करून घेतलाच पाहिजे. हो पण आतां जियाफतीचे दालनांत लव-कर गेलें पाहिजे. तिकडे माझी अगदीं वाट पाहत असतील. ( जातो. महाबलसिंह व त्याचे लोक प्रवेश करितात. )

**महाबलः**–यारहो, आज तुमची जवामर्दी अजमावण्याचा मौका आला आहे. आपल्या राजाकरितां, आपल्या स्वामीकरितां, हा देह जरी धारातीर्थी पतन पावला, तरी कच खाऊन पलटा घेऊं नका. आपण श्रीशंकराची शपथ घेतली आहे, तिची याद ठेवा. आजच्या घोर प्रसंगांत बनबीरावर गुन्ह्याची शाबिती झाली तर तोखतम झालाच पाहिजे. निदान त्याला तो हयात राहील तोंपावेतों आपल्या घोर अपराधाबद्दल कायमची अद्दल घडेल अशी शिक्षा मिळाली पाहिजे. ( एक शिपाई प्रवेश करितो. ) काय अखबार आणलीस बोल.

**शिपाईः**–महाराज, सर्व तट फिरलों. तटावरून एक मजबूत रशी एका बुरुजाच्या कोंपऱ्याला लटकावून दिलेली नजरेस पडते आहे. हें काम संग्रामसिंहानें केलें असावें. मला आंत जाण्याला मज्जाव नाहीं, पण आपल्याला आहे. जियाफतीचें दल्लान अगदीं चिकार भरून गेलें आहे. मेहमान लोकांची एकच गर्दी उसळून गेली आहे. बिगर इतल्ला आपला प्रवेश थोरल्या दरवाज्यानें खामखां होणार नाहीं.

आणखी इतक्या देऊन जावें तर मज्जाव होणार. दरवाज्यावर रजपूत वीरांचा वेढा हत्यारचंद कंबरबस्ता केलेला, बंदुकीचे तोंडे सिलगावून खडा पाहरा करीत असून आंत जाण्याच्या सर्व वाटा रोखून धरल्या आहेत. कांहीं मुडदे पाडल्याशिवाय आपला प्रवेश होणार नाहीं.

महाबलः–ही गोष्ट तर आपल्याला कर्तव्य नाहीं. आपले जवान थोडे असून आपल्याला त्यांचे प्राग घ्याच्यापेक्षां बेहेत्तर मुकाबल्याकरितां राखणें जरूर आहे. राजवाड्याच्या तटाची संगीन चिरेबंदी भिंत, दांतांत तलवार धरून मी, लटकत सोडलेल्या रशीच्या आधारानें चढून जातों. नंतर दरवाज्यावरील रखवालदारांना भूलथाप देऊन गाफल करतों आणखी तुम्हां सर्वांस आंत घेतों. मग अलाहिदा तजवीज वक्त पडेल तशी करूं. माझ्या संग्रामसिंहानें, बनवीराची नजर चुकवून अगोदरच ज्या अर्थी तटावरून रशी सोडून ठेविली आहे, त्या अर्थी अलबत दगा तर आहेच आहे. पण त्यांतल्या त्यांत माझा संग्राम बिलंदर खरा. आज रशीचें काम त्यानें लाख रुपयांचें केलें आहे. तटावर चढून जाऊन मी शीळ घालतांच तुह्मी सर्व दौडत या. खानगी कामगार मुदपाकखान्यावरील आचारी तो जालीमसिंग, गिरफदार करूं. जालीम जहर मिसळलेलें अन्न त्याच्या तोंडांत कोंबूं. जर त्यानें खुषीनें खाल्लें तर बनवीराचा दिल उदयसिंगाबद्दल पाक आहे असें समजूं. आणखी त्याला बजावून सांगूं कीं, राजपुत्राच्या अमोल्य प्राणाकरितां आम्हांला असें धाडस, अशी कारेगारी करावी लागली, यांत आमचा कसूर काय आहे ! तुझा दिल उदयसिंगाबद्दल सफा, तर आमचाही तुझ्याबद्दल सफा. बस रुखसत मागतों.

शिपाईः–आह्मी सर्व शिपाई मर्द, दांतांत फिरंगाणा धरून तटाच्या भिंती सरासर चढण्यांत तरबेज आहोंत. आह्मी सर्व आपला पुस्तपना करूं. आपला एकट्याचा जीव आम्ही धोक्यांत घालणार नाहीं. या आमच्या मारुजाकडे महाराजाचें लक्ष असावें. आह्मी आपलीं शिरें राजाच्या चरणांवर स्वतःची स्वामिभक्ति दाखविण्याकरितां अर्पण करण्यास तयार आहोंत. आपण अव्वल

तटावर चढून जा. आमच्याकरितां दहावीस सुताच्या मजबूत रशा खालीं सोडून द्या. आम्ही मग तटाच्या पौळीवर आलोंच म्हणून समजा.

महाबलः–शाबास ! शाबास ! दिलदार रजपूत दोस्तांनो, शाबास ! चितोड नगरींत या आपल्या सिसोदिया म्हणजे सूर्यवंशी घराण्यांत राजा रामचंद्र, राजा हरिश्चंद्र, राजा दशरथ, महापराक्रमी बाप्पा रावळ इत्यादि अनेक राजे आणि महाराणे होऊन गेले. त्यांच्या शौर्याचा यशोदुंदुभि दिगंत गाजत आहे–यावच्चंद्रदिवाकरौ पृथ्वीच्या प्रलयकालापावेतों गाजेल. त्याच सत्वधीर वंशांत राणासंग ऊर्फ संग्रामसिंह याच्या पोटीं कुमार उदयसिंग जन्मला आहे. तोच आपला खरा स्वामी, खरा राजा असून त्याचा या महासंकटांतून मोठ्या हिफाजतीनें प्राण वांचविला पाहिजे. आपल्या दयाळू राजाशीं जो निमकहराम होतो तो अधःपाताला जातो. असें आपलीं व्यासप्रणीत महापुराणें दांडोरा पिटीत आहेत. याजकडे तुमचें लक्ष असलें पाहिजे. राजा म्हणजे विष्णूचा अवतार, त्याचा आपण योग्य मानमरातब ठेविला पाहिजे. या आपल्या स्वामिभक्तीनें आपल्यास स्वर्गप्राप्ति होऊन आपली कीर्ति अजरामर होईल. हा जुळून आलेला मोका गफलतीनें जो गमावील त्याला मी निमकहराम म्हणेन. हे चितोडनगरी, तुझीं आह्मी लाडकीं लेंकरें आहोंत. आपल्या कडेखांद्यावर घेऊन तूं आपलें जोमदार दुग्ध पाजून आह्मां रजपूत पठ्यांना शौर्याचें बाळकडू पाजलें आहेस. या प्रसंगीं तुझ्या दृष्टीसमोर घोर अनाचार घडून येत आहेत. दुष्ट बनवीर राजपुत्राशीं हरामखोरी करीत आहे, याची लाज तुला आहे. हे माते, चितोडनगरी, तुला वंदन करून तुझी चरणधूलि तुझा प्रसाद म्हणून आम्ही आपल्या ललाटपटलावर त्रिपुंड्राकार लावून तुझ्या उदरांत प्रवेश करीत आहोंत. चला, चढाव करा ! दौड करा ! हिमायत धरा, हिम्मत मर्दा तो मदत खुदा ( धांवत जातात. पडदा वर जातो. मेजवानीचा देखावा बनवीर, उदयसिंग, संग्रामसिंह व अनेक सरदार भोजनास बसले आहेत असा देखावा नजरेस पडतो. )

बनबीरः–( एकीकडे ) सुरुंगानें पेटसुद्धां घेतला आहे. आतां एक धूमधडाका उडाला कीं, हवेली जमीनदोस्त झालीच ह्मणून समजा. बिलकुल अवकाश राहिला नाहीं. हा काळपावेतों आमचीं कृष्णकारस्थानें कशीं बिनबोभाट बेतकार अहिस्ते अहिस्ते चाललीं आहेत. तो सैतान राक्षस महाबलसिंह या बड्या जियाफतींत नाहीं म्हणून बरें, नाहीं तर त्यानें शेंकडों शुभा काढकाढून आमचा डाव बाहेर फोडला असता. दरवाज्यावर कडक जवानांचा सक्त पहारा एकसा ठेवून दिला असल्यामुळें मी अगदीं बिनघोर झालों आहें. ( उघड ) सरदारहो, माझ्या राज्यारोहणाची तुम्हांला आज ही पहिलीच जियाफत आहे. अशा या आनंदाच्या प्रसंगीं आपले छोटे सरकार उदयसिंग हजर असल्यानें या दावतीला फारच शोभा आली आहे. सरदारहो ! हे छोटे सरकार मोठे झाल्यावर तख्तनशीन होतील, त्या वेळीं असाच आनंदाचा दिवस उगवेल. तो सोन्याचा दिवस पाहण्याला उदयसिंगाचे वडील राणासंग आणि त्यांची मातोश्री करणदेवी नाहीं याबद्दल तुह्मां सर्वांना जसें वाईट वाटेल, तसें मलाही वाटेल. भगवदिच्छा बलीयसी ! उदयसिंग आपल्या ज्वानींत आल्यावर त्याला मी सिंहासनावर अधिष्ठित करून बद्रिकेदाराकडे घोर तपाचरण करण्याकरितां जाणार. पुनः वापस येणार नाहीं. केवळ हे अल्पवयस्क आणखी राज्यांत चौफेर विक्रमाजित मरण पावल्यानें बखेडा माजलेला असल्यानें स्थीरस्थावर होईपावेतों मला राज्यसूत्रें हातीं घेणें भाग पडलें आहे. आणखी हें माझें कर्तव्यच आहे असें मी समजतों. राजपुत्राचे सांप्रतचे पालनकर्ते ज्यांचे सुपूर्द यांचे आईबापांनीं यांना केले आहे ते महाबलसिंह बाराहजारी, त्यांना मीं अनेक वेळां यांना आतां माझ्या हवालीं करा म्हणून गळ घातली, परंतु ते या कामीं माझा हुकूम मानीत नाहींत. ( एकीकडे ) या बेवकूब सरदारांना अशीच भुरळ पाडून आपला मतलब सही केला पाहिजे. दुनिया झुकती है झुकानेवाला चाहीये. एकदां माझा हक्क गादीवर शाबीद झाला, ह्मणजे मी यांच्या बापाला गादी सोडून जाईन ह्मणतां ! नांव कशाला ! मी मेलों तर माझा मुलगा तख्तावर

बसेल. जालीमसिंगानें ताटाची व्यवस्था काय केली आहे, ती एकदां पाहिली पाहिजे. ( जातो. )

**उदयसिंगः**–( एकीकडे ) नदीचे पाण्यांत बगळा जसा डोळे झांकून बसतो, पण मासा आला कीं, गट्ट, तसा यानें वरून वरून बोके-संन्याशाचा रंग आणला आहे. कडू भोपळ्याला बाहेरून कितीही जरी साखरेच्या पाकाचें मर्दन केलें तरी अंतर्यामीं तो मिष्टांस थोडाच होणार आहे ! ( उघड. संग्रामसिंहास उद्देशून ) जहर, जहर, जालीम जहर ! अरे राम ! राम ! ! या माझ्या अन्नांत मला सर्वत्र जहर नजरेस पडत आहे. यांतला एक घास माझ्या पोटांत जाण्याचा उशीर, कीं माझा प्राण माशाप्रमाणें तडफडून जाऊन मी ठार होणार. आज माझ्या सर्व पूर्वजांचें पुण्य लयाला गेलें. मी सूर्यवंशांतील अस्सल राजपुत्र नाहीं हेंच खास ! जर महाप्रतापी वैभवशाली राणासंग माझा जन्मदाता असता तर या प्रसंगीं हजारों कडवे रजपूत मजकरितां बळी पडले असते. राजस्थान देशांतील हा चितोडचा किल्ला, रजपूत वीरांचा केवळ प्राण–त्यांची ही समरभूमि–चितोड नगरींतील सर्व सुंदर गोपुरें आणखी पवित्र देवालयें, या सर्वांना माझा वीट आला नसता. सर्व माझे प्राणावर उठले नसते. हेंच खास. संग्रामसिंहा, तूं माझा जिवलग दोस्त, माझा भाऊना रे ! माझा बाळपणचा खेळगडीना रे ! माझ्या ताटांतील अन्नांत आणखी तुझ्या ताटांतील अन्नांत तुला बिलकुल तफावत नजरेस पडत नाहीं !

**संग्राम०**:–तफावत ! हमखास तफावत नजरेस पडत आहे. महाराज, तुमच्या ताटांतील अन्न मला हिरवेंचार दिसत आहे. खात्रीनें त्यांत जहर कालविलें आहे. सर्व पंक्तीचा बदरंग करण्यापेक्षां, सर्व सरदारांचा हिरमोड करण्यापेक्षां, आणा तें ताट माझ्यापुढें. हें माझें स्वच्छ अन्नाचें ताट मी तुमच्यापुढें ठेवितों. या समयीं बिलकुल इनकार दाखवूं नका. या वेळीं तुम्हीं माझ्या विनंतीला मान दिलाच पाहिजे. मी तें अन्न, तें विषमिश्रित अन्न, मी आपल्या राजाकरितां, मी आपल्या स्वामींचे प्राण वांचविण्याकरितां मोठ्या आनंदानें खाणार. ( ताटांची अदलाबदल करितो. )

उदयसिंगः–( गहिंवरून ) संग्रामसिंहा! तूं विषप्रयोगाला बळी पडलास, हें पाहून उदार अंतःकरणाच्या तुझ्या आईबापांना मोठा पुत्रशोक होईल! बिचारे संग्राम! संग्राम! म्हणून तुझ्या नांवानें टाहो फोडून प्राण सोडतील. मला कोण आहे? आई ना बाप! या अलम् दुनियेंत माझ्याकरितां कोण शोकग्रस्त होणार? सर्व रजपूत सरदारांनीं, रणशूर शिपाई मर्दांनीं, या हत-भागी पोरक्या पोराचा त्याग केला आहे. मेजवानीस जुळलेले हे सर्व सरदार बनवीरदादाची बाजू उचलून धरतील. तूंच मला कव-टाळून कां धरतोस? आण तें विषानें भरलेलें ताट इकडे. ( ताट परत घेण्याचा प्रयत्न करितो. )

संग्राम०:–( गहिंवरून ) नाहीं सरकार, नाहीं. हें तुमचें भाषण ऐकून प्रत्यक्ष पाषाणालासुद्धां पाझर फुटतील. मग मी तर तुमचा प्रत्यक्ष भाऊ. मी तें ताट परत करणार नाहीं. माझी आई, माझे बाबा, अधमाधम नाहींत. मीं आपला जीव तुमचा जीव वांच-विण्याकरितां खर्ची घातलेला पाहून त्यांना पुत्रशोक कधींही होणार नाहीं. योग्य कामीं माझा देह खर्ची पडला, हें पाहून राज-स्थानांतील सर्व रजपूत लोकांना समाधानच वाटेल. ( महाबलसिंह व त्याचे लोक गुप्तपणें प्रवेश करितात. )

उदेसिंगः–( गहिंवरून ) प्रत्यक्ष तुझा बाप ज्यांना मी बाबा म्हणतों! ज्यांनीं पोटच्या मुलाप्रमाणें माझा सांभाळ केला, आपल्या तोंडांतील गोड घास थुंकून टाकून कैक वेळां माझे ताटांतील अन्न, प्रसाद म्हणून मोठ्या आवडीनें खाल्लें, एवढें ज्यांचें मजवर प्रेम, त्यांच्या भेटीकरित माझा प्राण अडकून राहील. त्यांनीं ऐन वेळीं माझा त्याग कसा केला! यावरून प्रभु रामचंद्र मजवर दारुण कोपला आहे यांत शंका नाहीं. माझी उपमाता पन्ना–जिच्या दुधाचा हा पिंड, आणखी जिला मी आई म्हणून हांक मारतों, तिनें सुद्धां या समयीं मला दर्शन दिलें नाहीं. ती सुद्धां मजवर रुष्ट झाली. त्या उभयतांना माझे प्रणिपात सांगून शेवटचा संदेश हाच सांग कीं,

बसेल. जालीमसिंगानें ताटाची व्यवस्था काय केली आहे, ती एकदां पाहिली पाहिजे. ( जातो. )

**उदयसिंग:**–(एकीकडे) नदीचे पाण्यांत बगळा जरा डोळे झांकून बसतो, पण मासा आला कीं, गट्ट, तसा यानें वरून वरून बोके-संन्याशाचा रंग आणला आहे. कडू भोपळ्याला बाहेरून कितीही जरी साखरेच्या पाकाचें मर्दन केलें तरी अंतर्यामीं तो मिष्ठास थोडाच होणार आहे ? ( उघड. संग्रामसिंहास उद्देशून ) जहर, जहर, जालीम जहर ! अरे राम ! राम ! ! या माझ्या अन्नांत मला सर्वत्र जहर नजरेस पडत आहे. यांतला एक घास माझ्या पोटांत जाण्याचा उशीर, कीं माझा प्राण माशाप्रमाणें तडफडून जाऊन मी ठार होणार. आज माझ्या सर्व पूर्वजांचें पुण्य लयाला गेलें. मी सूर्यवंशांतील अस्सल राजपुत्र नाहीं हेंच खास ! जर महाप्रतापी वैभवशाली राणासंग माझा जन्मदाता असता तर या प्रसंगीं हजारों कडवे रजपूत मजकरितां बळी पडले असते. राजस्थान देशांतील हा चितोडचा किल्ला, रजपूत वीरांचा केवळ प्राण–त्यांची ही समरभूमि–चितोड नगरींतील सर्व सुंदर गोपुरें आणखी पवित्र देवालयें, या सर्वांना माझा वीट आला नसता. सर्व माझे प्राणावर उठले नसते. हेंच खास. संग्रामसिंहा, तूं माझा जिवलग दोस्त, माझा भाऊना रे ! माझा बाळपणचा खेळगडीना रे ! माझ्या ताटांतील अन्नांत आणखी तुझ्या ताटांतील अन्नांत तुला बिलकुल तफावत नजरेस पडत नाहीं ?

**संग्राम०:**–तफावत ? हमखास तफावत नजरेस पडत आहे. महाराज, तुमच्या ताटांतील अन्न मला हिरवेंचार दिसत आहे. खात्रीनें त्यांत जहर कालविलें आहे. सर्व पंक्तीचा बदरंग करण्यापेक्षां, सर्व सरदारांचा हिरमोड करण्यापेक्षां, आणा तें ताट माझ्यापुढें. हें माझें स्वच्छ अन्नाचें ताट मी तुमच्यापुढें ठेवितों. या समयीं बिलकुल इनकार दाखवूं नका. या वेळीं तुम्हीं माझ्या विनंतीला मान दिलाच पाहिजे. मी तें अन्न, तें विषमिश्रित अन्न, मी आपल्या राजाकरितां, मी आपल्या स्वामींचे प्राण वांचविण्याकरितां मोठ्या आनंदानें खाणार. ( ताटांची अदलाबदल करितो. )

उदयसिंगः–( गाहिंवरून ) संग्रामसिंहा! तूं विषप्रयोगाला बळी पडलास, हें पाहून उदार अंतःकरणाच्या तुझ्या आईबापांना मोठा पुत्रशोक होईल! बिचारे संग्राम! संग्राम! म्हणून तुझ्या नांवानें टाहो फोडून प्राण सोडतील. मला कोण आहे? आई ना बाप! या अलम् दुनियेंत माझ्याकरितां कोण शोकग्रस्त होणार? सर्व रजपूत सरदारांनीं, रणशूर शिपाई मर्दांनीं, या हत-भागी पोरक्या पोराचा त्याग केला आहे. मेजवानीस जुळलेले हे सर्व सरदार बनवीरदादाची बाजू उचलून धरतील. तूंच मला कव-टाळून कां धरतोस? आण तें विषानें भरलेलें ताट इकडे. ( ताट परत घेण्याचा प्रयत्न करितो. )

संग्राम०:–( गाहिंवरून ) नाहीं सरकार, नाहीं. हें तुमचें भाषण ऐकून प्रत्यक्ष पाषाणालासुद्धां पाझर फुटतील. मग मी तर तुमचा प्रत्यक्ष भाऊ. मी तें ताट परत करणार नाहीं. माझी आई, माझे बाबा, अधमाधम नाहींत. मीं आपला जीव तुमचा जीव वांच-विण्याकरितां खर्चीं घातलेला पाहून त्यांना पुत्रशोक कधींही होणार नाहीं. योग्य कामीं माझा देह खर्चीं पडला, हें पाहून राज-स्थानांतील सर्व रजपूत लोकांना समाधानच वाटेल. ( महाबलसिंह व त्याचे लोक गुप्तपणें प्रवेश करितात. )

उदेसिंगः–( गाहिंवरून ) प्रत्यक्ष तुझा बाप ज्यांना मी बाबा म्हणतों! ज्यांनीं पोटच्या मुलाप्रमाणें माझा सांभाळ केला, आपल्या तोंडांतील गोड घास थुंकून टाकून कैक वेळां माझे ताटांतील अन्न, प्रसाद म्हणून मोठ्या आवडीनें खाल्लें, एवढें ज्यांचें मजवर प्रेम, त्यांच्या भेटीकरितां माझा प्राण अडकून राहील. त्यांनीं ऐन वेळीं माझा त्याग कसा केला! यावरून प्रभु रामचंद्र मजवर दारुण कोपला आहे यांत शंका नाहीं. माझी उपमाता पन्ना–जिच्या दुधाचा हा पिंड, आणखी जिला मी आई म्हणून हांक मारतों, तिनें सुद्धां या समयीं मला दर्शन दिलें नाहीं. ती सुद्धां मजवर रुष्ट झाली. त्या उभयतांना माझे प्रणिपात सांगून शेवटचा संदेश हाच सांग कीं,

हा तुमचा धर्मपुत्र तुमचा उदयसिंग—अधर्मानें वागला असेल, तर त्याची या बालकाला क्षमा करा.

**महाबलः**–( एकीकडे ) राजपुत्राचें हें करुणास्पद भाषण कोणाचें अंतःकरण विदीर्ण करणार नाहीं ! उदयसिंगा, तुझ्या जिवाला अपाय झाला तर, तो करणाराचीं पाळेंमुळें खणून काढून त्याला सफा उडवून देईन. कंबरबस्ता करून तुझ्या मदतीकरितां आह्मी हत्यारबंद तयार आहोंत. जहर कालविलेलें अन्न ! ज्यानें हें कर्म केलें असेल, त्याला त्याचा नतीजा भोगायला लावीन, त्याशिवाय ही समशेर म्यान करणार नाहीं. (उघड) माझ्या दोस्तांनो ! आपण एकदम जाऊन राजपुत्राला घेरा देऊं. आपल्याला पाहतांच त्याला हिम्मत चढेल. ( तसें करितात. बनबीर प्रवेश करतो. )

**बनबीरः**–अरे बापरे ! हा राक्षस येथें कसा आला ? आतां धडगत दिसत नाहीं. सर्व व्यूह ढांसळला. हा विजेचा लोळ कोणाचे टाळक्यांत पडून त्याला खाक करील याचा नेम नाहीं. हत्तीदरवाज्यावरील रखवालदारांना कैफ चढून ते घोरत पडले होते कीं काय ?

**उदयसिंगः**–( दुःखानें ) बनबीरदादानें मला जिफायतीला आणलें, मी आणखी संग्राम ऐन खुषीनें आलों. तुह्मींही आपली रजामंदी दिली. पण बाबा, या माझ्या ताटांत जहर कोणीं कालविलें हो !

**महाबलः**–काय जहर ? कोणीं जहर कालविलें ? कोणीं हें नामर्दपणाचें, नीचपणाचें कृत्य केलें ? असें घोर कर्म करणाऱ्याचा आत्तांचे आत्तां तालास लावून या माझ्या तेज तलवारीनें त्याचे खंडतिलप्राय तुकडे तुकडे करीन. ( बनबीरास उद्देशून ) महाराज, राजवाड्यांत आपल्या रूबरू आपल्या अव्वल अमदानींत, जर अशीं अंगावर शहारे येणारीं काळीकुट्ट कृत्यें होऊं लागलीं, तर राजपुत्राप्रमाणें आपल्याही आयुष्याची मर्यादा संपलीच म्हणायची. आणा तें ताट इकडे. (बनबीराकडे ताट करून) या अन्नाकडे पहा. यांतील बहुतेक पदार्थांत विष कालविल्यानें त्यांचे रंग पालटले आहेत.

**वनवीरः**--खरोखर विषप्रयोग ! आणखी तोही माझ्या राजवाड्यांत ! कोण ही दुष्ट बुद्धि ! ज्यानें हें षंढत्वाचें काम केलें असेल तो जरी प्रत्यक्ष माझा लाडका एकुलताएक पुत्र असेल, तरी त्याचे सुद्धां मी सळईनें डोळे फोडीन, त्याचे हात कलम करीन. अशा नीच मनुष्याचा तलास तुह्मी आह्मी मिळाफानें बिलफेल आतांचे आतां लावूं. मुदपाकखान्यावरील दारोग्याला तलफ करा. माझ्यापुढें गिरफतार करून आणा ? कोण आहे पाहऱ्यावर ? जा आतांचे आतां. ( कांहीं शिपाई जातात. ) ( एकीकडे ) आतां यांच्या तंत्रानेंच घेतलें पाहिजे. नाहीं तर हें सारेंच गाडें उलटेल. कर्म करण्याचें सोपें असतें, पण पचवून पुनः आपले साधु ते साधु हें दाखविण्याचें काम कठीण असतें. लोकांत आपली वागणूक चोख, सचोटीची अशीच दिसली पाहिजे. ( दारोग्याच्या मुसक्या बांधून आणितात. ) कायरे पागल, बदमाष हरामजादा, या ताटांतील अन्नांत जहर कोणीं मिळाफ केलें ?

**दारोगाः**–काय जहर ! कोण म्हणतो जहर ? या ताटांत जर जहर असेल तर सर्व ताटांतून जहर असलें पाहिजे. आपल्यासुद्धां ताटांत जहर असलें पाहिजे. यांत जहर मुळींच नाहीं. सरकारची खातरतसलीम करून देईन.

**महाबलः**–बेवकूफ, गद्धा, पाजी ! तुझे डोळे फुटून त्यांच्या खांचा झाल्या काय ? हें अन्न तुला कसें दिसतें ? या ताटांतील अन्नांत आणखी या ताटांतील अन्नांत तुला कांहींच फरक दिसत नाहीं ? जर तफावत् नाहीं असें याचें म्हणणें असेल, आणखी जर यांत विष नाहीं असें हा म्हणत असेल, तर यानेंच हें अन्न खावें.

**वनवीरः**–बस बस हाच फैसला. यानेंच हें अन्न आमचे समक्ष खाल्लें पाहिजे. ( एकीकडे ) हा मेला म्हणजे मीं हें काम केलें आहे असा बोभाटाच होणार नाहीं. ( उघड ) तूं जर हें अन्न खाण्याला इनकार केलास तर आतांचे आतां तुझी गर्दन या तुझ्या धडापासून सफा अलग झाली म्हणून समज.

दारोगाः-( एकीकडे ) वाहवारे फैसला! न्यायदेवता अंध झाली. बनवीराचें प्रेम आपल्यावर आहेच, असा कोणीं भरंवसा धरूं नये. सकाळीं सौभाग्यवती आणखी संध्याकाळसुद्धां नक्की, दुपारीं नाहीं तर भोवल्यावरच गंगाभागीरथी. मला म्हणतो, तूं अन्न खाल्लें नाहींस तर तुझी गर्दन छाटून टाकीन, हें स्वप्न मला अगोदरच पडलें होतें. या नीच कृत्यास मी मुळींच कबूल नव्हतों. पण सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं. ( उघड ) आणा तें अन्न आतां खाऊन दाखवितों. मग तर मजकडे कांहीं नाहीं ? ( अन्न खातो. ) ( एकीकडे. ) एवढ्याशा विषानें मला काय होणार ? भांग, गांजा, माजूम, याकुती, गुलकंद, कुसुंबा, शराफ इत्यादि पोरकट आणि हलक्या व्यवसायांनीं माझ्यापुढें हात टेंकले त्यांनीं मला मुळींच कैफ चढत नाहीं. म्हणून बचनाग, कुचला, चंडोल, मदत इत्यादि जालीम जहरें घेतलीं. तरी अस्सल नशा म्हणून जो रंग असतो, तो कांहीं चढत नाहीं. तोळा तोळा अफीणीची नागीण करून सांज-सकाळ मी अल्लाद घशांत सोडतों. आणखी खिशांत बाळगलेल्या या विखारी नागिणीनें ( नागीण बाहेर काढतो. ) जिभेला दंश करून घेतों. अफीणाचा अर्क रोम रोम भिनला गेल्यानें सर्पांच्या विषाची बाधा मला मुळींच होत नाहीं. मला बडी फिकीर वाटते कीं, माझेंच विष या बिचाऱ्या नागिणीला बाधून ती मरेल कीं काय ? मग माझें कसें होईल ? शंकरानीं हलाहल प्राशन केलें तें सुद्धां याच अभ्यास-क्रमानें त्यांनीं पचविलें. अभ्यास काय करणार नाहीं ? या अन्नांतल्या जहरानें माल काय धाड होणार आहे ? ( उघड ) महाराज, झाली का आपली खातरजमा ? आतां बक्षिसादाखल मला एक गांव इनाम दिला पाहिजे. आपल्याला, उदयसिंग राजकुमाराला, महाबलसिंहाला विषाचा उगाच भास झाला.

बनवीरः-बस्स खतम. उदयसिंगाची, तुमची, आमची दिलजमाई झाली. ही आफत जर का मजवर आली असती, तर खरोखर मीं स्वतः छातींत खंजीर खुपसून प्राण दिला असता. भगवान् शंकरानीं याचा इनसाफ केला ही फार आनंदाची गोष्ट झाली. हा मुदपाक-

खान्यावरील दारोगा जर आतां मयत झाला असता तर मजवर जास्तच वहीम आला असता. जास्त जास्त शंका फैलावत गेल्या असत्या. मला आतां असें वाटतें कीं, यांत विश नसून विषाचा भास झाला. दोरीचा साप होऊन तो चावल्याचा जबरदस्त ग्रह होऊन लहरीसुद्धां येऊं लागल्या. पण दोरी ती दोरी आणखी साप तो साप. जियाफतीचा बदरंग झाला याचें मला वाईट वाटतें. सरदारहो, पुनः जियाफतीचा समारंभ थोडक्याच दिवसांत आपल्या राजवाड्यांत करण्यांत येईल. असो. उद्यां सर्व मिळून अरवली डोंगराचे खोऱ्यांत वाघीण पिसाळलेली आहे तिच्या आपण शिकारीला जाऊं. तेथें गेल्यावर कुमार उदयसिंगाला शिकार साधल्यावर आपली दिलखुषी जादा होणार आहे. मग आजची गमगीनीची मिसल आपण विसरून जाऊं.

महाबलः–उद्यांच नको. कारण आजच्या त्रासानें राजपुत्राचे चित्ताला फार दिलगिरी वाटत असेल. आपण हेका धरला तर त्यांना सतावल्यामार्णे वाटेल. मोठी तखलीफ वाटेल. त्यांचा मिजास जरा खुषींत असला म्हणजे आणखी एखाद्या दिवशीं आपण बेत करूं असा माझा मारुजा आहे. वाघिणीचे पंडे पकडून आणले आहेत. ते तिला दिसेपावेतों ती अशीच पिसाळणार.

बनबीरः–तुमची सल्ला आम्हाला मंजूर आहे. जशी कुमाराची मर्जी असेल तसेंच चालायचें. आजच्या जियाफतीचें काम आटोपलें. आतां आपण सर्वांनीं विश्रांति घ्यावी असें मला वाटतें. ( पडदा पडतो. जालीमसिंगाशिवाय सर्व जातात. )

जालीमः–आज या जालीम जहरानें जर ठार झालों असतों, तर कुमार उदयसिंगाच्या अन्नांत जालीम जहराचा मिलाफ या जालीमसिंगानेंच केला, असें बनबीरानें सर्व राजस्थानांत जाहीर केलें असतें. माझ्या नांवाला काळोखी लागली असती. मी अगोदरच मयत झाल्यानें खरा प्रकार काय घडून आलेला आहे, उदयसिंगाला स्वहस्तानें जहर कोणीं चारलें, याबद्दल मी जसा अफीणीच्या आणखी चंडोलाच्या कैफांत हा असा चांचपडत चांचपडत

जातों, तसें हें जग अंधारांत चांचपडून ठेंचाळलें असतें. माझ्यामागें माझ्या पोराबाळांचें कोणीं मुखावलोकनसुद्धां केलें नसतें. आजपासून या घोर पातक करणाऱ्या बनवीराच्यामागें मी हात धुऊन लागेन. उदयसिंगाचे प्राण याच्या तडाख्यांतून वांचवीन. या कामांत माझा नायनाट झाला तरी हरकत नाहीं. ईश्वराच्या मनांत माझ्या हातून उदयसिंगाला मदत व्हावी असेंच आहे. नाहीं तर असें घडूनच आलें नसतें. आतां वरवर नौकरी बनवीराची पण खरा दिल राजपुत्राकडे. परमेश्वरा, कुमार उदयसिंगाच्या पायाची नोकरी या बंदा गुलामाच्या हातून कांहीं तरी घडूं दे. हेंच तुझ्याजवळ मागणें आहे.

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**–निहालकुवर राणीचा रंगमहाल.

( बनवीर सचिंत बसला आहे. )

**बनवीरः**–माझ्या छातींतील धडकी अद्याप कमी झाली नाहीं. महालांत एकटा बसलों कीं मला त्या विक्रमाजिताची आठवण होते. हरहुन्नर लढवून मीं त्याला या जगांतून अकलखात नाहींसें केलें खरें, पण आतां तो जिद्द होऊन माझ्यामागें हात धुऊन लागला आहे. याला गाडून टाकण्याची तरकीब काय काढावी ! मला तो मूर्तिमंत नजरेस पडतो. असें झालें म्हणजे माझ्या हातापायांला कंप सुटतो. जबान कोरडी पडते. बोबडी वळते. मी एकटा असलों कीं तो आपला दत्त मजपुढें उभाच. माझें डोकें अगदीं भणभणून गेलें आहे. रात्रंदिवस हेच विचार मनांत घोळतात. वाटतें कीं, ह्या पडद्यांतून डोकें काढील, का त्या पडद्यांतून डोकें काढील, का पलंगाखालून वर डोकें काढील ! अरे बापरे ! आला ! आला ! आतां काय करूं ! आज तर अमावास्या आहे. आज तो माझी त्रेधा त्रेधा करणार ! माझी मुरकुंडी वळविणार ! मागल्या अमावास्येला अशीच यानें भीति दाखविली होती. माझ्या अंगांत तर

नाहींना संचार करणार ! ( किंकाळ्या मारतो. ) अरे धांवा धांवा. मला भुतानें पछाडलें. ह्यानें वाघाचें रूप धारण केलें आहे ! आतां मला तो फाडून फाडून खाणार ! माझे नरडीचा घोट घेणार ! मारला, मारला, मला पंजा मारला ! हें पहा सर्व शरीर रक्तबंबाळ झालें. इकडून पाहिलें तर आतां अस्वल नजर पडतो आहे. काळा-काभिन्न केवढा भयंकर हा प्राणी ! याच्या सर्व अंगावर वीत वीत लांब काळेभोर केंस आहेत. नखें किती लांब लांब ! केवढा हा भयंकर जबडा ! इकडून पहावें, तर रानडुक्कर ! तो पहा त्याचा दांत ! वीतभर पुढें आलेला आहे. आली, आली, त्याची मुसंडी माझ्या अंगावर. इकडून पहावें, तर माजलेला रेडा ! अबब काय ही गर्दन ! कोण भयंकर शिंगें ! केवढाले हे डोळे ! काय महालांत कोणीच नाहीं काय ? पहारेवाले काय झाले ? मेले कीं जिवंत आहेत; का भुतानें त्यांना खाऊन टाकलें ? माझी निहालकुवर कोठें आहे ? अद्याप ती महालांत कशी नाहीं आली ? ( हांका मारतो. ) निहाल-कुवर, निहालकुवर ये कुवर ( निहालकुवर प्रवेश करते. ) पण खरोखर हीच ना ती ? नाहीं तर या समंधानें तिचें रूप धारण केलें असेल. नसेल कशावरून ? ( वेड्यासारखें करतो. )

निहालः–काय महाराज, आपण असें वेड्यासारखें काय करतां ? आपल्याला झोंप लागली होती म्हणून मी जागें केलें नाहीं. तोंड किती सुकून गेलें आहे ! सर्वांगाला डवडवून घाम किती आला आहे ! ( घाम पुसते. ) पंख्यानें वारा घालतें, म्हणजे आपल्याला बरें वाटेल.

बनबीरः–प्रिये, तूं आलीस म्हणून बरें झालें, नाहीं तर मला त्या भुतानें खाऊन टाकिलें असतें. तो वाघ झाला, अस्वल झाला, रानडुक्कर झाला, रेडा झाला, त्यानें अनेक रूपें घेतलीं. मी भीतीनें अगदीं अर्धमेला झालों. आतां एकटा म्हणून कधीं कधीं महालांत बसणार नाहीं.

निहालः–पण आतां कांहीं आपल्या नजरेस पडतें का ?

बनबीरः–आतां कांहीं नाहीं. सर्व सामसूम आहे. तूं आणखी

मी. मागच्या अमावास्येला इतकें भय वाटलें नव्हतें. फक्त झोंपेंत भ्यालों होतों. पण तो प्रत्यक्ष माझ्यापुढें येऊन उभा राहतो. लाखों रुपयांची खैरात करतों पण हा जिद्द कोणीं तरी गाडून टाकला पाहिजे.

निहाल:–बरें तें विसरा आतां. हा आपला विनाकारणें ग्रह झाला आहे. यांत कांहीं अर्थ नाहीं. मनीं वसे तें स्वप्नीं दिसे. तसें आपलें झालें आहे. त्या विक्रमाचे खुनाबद्दल वारंवार आठवण करीत जाऊं नये. आपल्याला काय माहीत तो कसा मेला आणि काय मेला. तें असो. पण हें एक बरें झालें बाई कीं, त्या मेल्या दारोग्यानें तें अन्न खाऊन दाखविलें. नाहींतर आपणच त्याला विषप्रयोग केला म्हणून जिकडे तिकडे आपल्या नांवानें डंका वाजून बदलौकिक झाला असता. राणिवशांत सगळ्या बायकांनीं इकडच्या नांवानें खडे फोडले असते. बाकी झाली ही गोष्ट कांहीं माझ्या मनाप्रमाणें झाली नाहीं. अन्न जर निराळ्या रंगाचें दिसलें नसतें तर कामच झालें असतें. पण तें कार्टें किती गुलाम! त्यानें तेव्हांच बभ्रा केला. आतां बोलून काय उपयोग! हा डाव फसला खरा! त्याबद्दल इतकी दिलगिरी वाटण्याचें कारण नाहीं. (वारा घालते.)

बनबीर:–खजिन्यांत शिल्लक नसेल तर राजाला चिंता. येथें जर युक्त्यांची पेटी भरलेली आहे तर मी कशाला दिलगीर होऊं? तें असो, पण ह्या वारा घालण्यानें श्रम नाहीं का होत? हें काम दासीजनाचें आहे. आपण कशाला असलीं श्रमांचीं कामें करावीं? उभी किती वेळ राहणार? (जवळ घेऊन) पहिली गोळी हुकली, आतां दुसरी कांहींतरी अजब तरकीब निघाली पाहिजे. आमच्यापेक्षां तुमची अक्कल या कामीं जादा चालते.

निहाल:–आमची अक्कल चुलीपाशीं. राजदरबारांतल्या उलाढाली आमच्यानें होणार नाहींत, त्या पुरुषांनींच उरकाव्या.

बनबीर:–तें कांहीं नाहीं. आमचें सगळें अवसान तुमच्या मद-तीवर. बंदूक उडवणारा मी, पण बार भरलेला नसला तर आवाज कसा होणार? गोळी कशी मर्मीं लागणार? बार भरणार तुह्मी.

निहाल:–उगच मला कांहीं चढवूं नका. बाकी विचारणें होतें आहे म्हणून ह्मणतें, कीं, त्या मेल्या दैत्याला–महाबलासिंहाला कैदखान्यांत घातलें पाहिजे. मेल्याला सक्त मेहनतीचीं कामें–फत्तर फोडण्याचीं, पाठीवर कमचे उडवून करावयास लाविलें पाहिजे. त्याचप्रमाणें त्या पन्नेला–त्या जखिणीलाही पण कोठें तरी अडकवून ठेवून मीठ दळावयास लाविलें पाहिजे. असें झाल्याविना ह्या कारस्थाचा कांटा कांहीं निघावयाचा नाहीं. तो राक्षस कैदखान्यांत पडला म्हणजे मग याचा पुस्तपन्हा कोण करणार ? चाला पाठिंबा कोण ?

बनबीर:–बांधा, हवेंत किल्ले बांधा. उचलली जीभ लाविली टाळ्याला. त्या खविसाला कैदेंत घालण्याचें काम कांहीं सहज आहे वाटतें ? हा पैजेचा विडा उचलणार कोण ?

निहाल:–कोण म्हणजे ? आपण दोघांनींच यांचा निकाल लाविला पाहिजे. मी पन्नेचा निकाल लावितें. वाटेल तशा भूलथापी तिला देत्यें, आणखी आपलेंसें तरी करून घेतें नाहीं तर कायमचें नाहींसें करून तरी टाकतें. इकडून महाबलाचा समाचार घेण्याचें व्हावें. मी आपल्या कानावर घालून ठेवितें. तो कधीं कधीं एकटा त्या अरवली डोंगरांत ब्रह्मानंदस्वामीकडे जात असतो. त्या वेळीं संधि साधून कांहीं तरी निमित्तानें त्याला पकडावें. अनेक युक्त्या लढवाव्या, आपखुषीनें त्यानें उदयसिंगाला आमच्या ताब्यांत दिलें तर बरें, नाहीं तर नानाप्रकारें त्याचे हाल करून त्याला ठार करावें, मग उदयसिंग आपल्या काबूंत पक्का सांपडला. का ? कशी आहे तोड !

बनबीर:–हा सगळा धोक्याचा सट्टा आहे. त्याला कैद करण्यांत आपली स्वतःची कदाचित् आहुति पडावयाची. हा पैगम आतां सोडूनच द्यावा. सिंहाच्या दरींतून एक वेळ बैल चरून आला. सिंहानें त्याला पाहिलेंच नव्हतें, म्हणून जगला, पण बैलानें पुनः त्या बाजूला जाऊं नये यांतच बरेपणा आहे. नाहींतर बैलाचा निकाल लागेल. कुमाराला जियाफतीला घेऊन आलों. तुझ्या सांगण्याप्रमाणें जालीम जहर पैदा करून तें त्याच्या अन्नांत सामील केलें. पण

अखेर परिणाम काय झाला ? मला वाटतें आतां हा बदमामला सोडून द्यावा.

निहालः—उत्तम पुरुष कामाला हात घातला म्हणजे मग कशींही संकटें येवोत माघार म्हणून घेत नाहींत. ज्यांना धैर्य कमी तीं माणसें अर्धवट कामें टाकून हताश होऊन रडत बसतात. या दुर्ज्यांत आपली मोजदाद झालेली पहाण्यापेक्षां मला मरण पतकरलें. आतां वरून वरून ढोंग करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपलीं त्यांचीं मनें एकमेकांबद्दल शुद्ध नाहींत हें सर्व चितोड जाणत आहे.

बनबीरः—विक्रमाजिताला तुझ्या सांगण्याप्रमाणें जगांतून नाहींसें केलें. संगराण्याचें आतां हें शेवटचें फळ राहिलें आहे. जशीं आपलीं चार मुलेंबाळें तसाच तो एक. तो लहान आहे तों पावेतों मी तख्तनशीन आहेंच. तो उमरींत आल्यावर त्याला गादीवर बसवन आपण दिवाणगिरी करावी म्हणजे झालें.

निहालः—खा. मेलेलें अन्न खा. असें करायचें होतें मग अगोदरच सर्पाच्या शेंपटीवर पाय द्यायचा नव्हता. त्याला तर तुह्मी जखमी सुद्धां करून चुकलां आहांत. आतां तो तुह्मांस कडकडून डासा घेतल्याशिवाय सोडणार आहे होय ? एकतर त्याचा निकाल करा. नाहीं तर आपण स्वतः विषाचा घोंट घ्या.

बनबीरः—घोर कल्पना. तुझी बुद्धि सर्वस्वी आपल्या कुळाला अंगार लावील. माझा घात करील. तुझी सल्ला मला नको. झालेल्या कृष्णकारस्थानाबद्दल मी परमेश्वराची करुणा भाकीन. त्याची क्षमा मागेन.

निहालः—माझ्यानें हीं नामर्दपणाचीं, हीं लाचारीचीं भाषणें ऐकवत सुद्धां नाहींत. मी इथून चालती होतें. पुनः महालांत पाय घालीन तर शपथ. ( निघून जाऊं लागते. बनबीर तिला ओढून आणतो. ) सोडा मला. माझ्यापेक्षां तो कार्टा तुह्मांला जास्त प्यारा आहे. त्याला आपल्या मांडीवर घ्या. त्याचे लाड करा. त्याचे पाय धरा. काय वाटेल तें करा.

बनबीरः—हें काय बरें असें ? इतकी आमच्यावर खप्पा मर्जी काय म्हणून ? आजपावेतों तुझ्या मर्जीचा कल पाहून मी वागत नाहीं कीं आलों ? मग आतांच तूं अशी मजविषयीं निष्ठुर कशी झालीस ? माझ्या हृदयाची तूं अधिष्ठात्री देवता. तुझ्या कोमल शब्दांच्या प्रोत्साहनाचा एवढा प्रभाव आहे कीं, चितोडच्या तख्तावर वाटेल त्याला तो अधिपति करील. आज मी जें राजवैभव भोगीत आहें याला कारणीभूत कोण ? वेळोवेळीं तुझी मसलत घेऊन त्याप्रमाणें वागलों म्हणूनच हे दिवस पाहिले. महाबलसिंहाला कैद करण्याबद्दलची तुझी तोड खरोखरच बिनतोड आहे. एवढ्याकरितां अव्वलच मीं म्हटलें होतें कीं, अशा कामीं आमच्यापेक्षां तुमची अक्कल जास्त चालते. बरें असो. ह्या सर्व गोष्टी आपण सोयी-सोयीनें पार पाडूं. पण आतां आमच्या मनाप्रमाणें एक गोष्ट घडून आली पाहिजे. त्याप्रमाणें करण्याचें तुझें वचन आहे.

निहालः—कसलं बाई वचन ? मला नाहीं कांहीं स्मरत. मी अगोदर कधीं कोणाला वचन देतच नाहीं. ही सगळी थट्टा आहे. मी समजलें, कांहींतरी युक्ति काढून आपण दिलेलें वचन आतां पुरें करण्याची वेळ आली आहे असें पाहून माझ्याच गळ्यांत घोरपड अडकावयाची.

बनबीरः—मला दिलेल्या वचनाचें मी आतां तुला स्मरण देतों कान कर इकडे. एक खुणेचा शब्द कानांत सांगतों, कीं हृदयांत प्रकाश पडलाच म्हणून समजा.

निहालः—कान कशाला करायला पाहिजे ? कानाच्या निमित्तानें—तोंडाला कुलूप घालायचें असेल—नाहींतर गालावर—

बनबीरः—कानाचे निमित्तानें तोंडाला कुलूप घालीत नाहीं. गालावर ठसा उमटवीत नाहीं. एवढा का माझ्या बोलण्यावर भरंवसा नाहीं !

निहालः—आतां इथें कोणी तिसरें का आहे ! कानांत सांगण्यासारखी गुप्त गोष्ट कांहीं नाहीं. खुशाल मोठ्यानें सांगावी. मला कांहीं त्याचा राग नाहीं. मीं कांहीं वचन दिलल नाहा.

वनवीरः—पहा मग मोठ्यानें बोललों तर राग येईल. असल्या गोष्टी हळू हळू कानांत सांगितलेल्याच चांगल्या. (तिची मान वळवून कानांत कांहीं सांगतो.) गालावर शिक्का उमटवून दिलास अथवा संपुष्ट चुंबनानें तोंडास कुलूप मारून दिलेंस, म्हणजे दिलेल्या वचनांतून आपली सुटका झाली असें मात्र समजूं नको. झालें का आतां वचनाचें स्मरण ? मग आतां या कामाला केव्हां आरंभ करायचा ? आज मध्यरात्रीं उत्तम मुहूर्त आहे असें देवीच्या पुजाऱ्यांनीं सांगितलें आहे. आपण दोघांनीं जोडप्यांनीं श्रीकालीमातेच्या मंदिरांत जावयाचें. तेथें कालीमातेचा प्रसाद ग्रहण करून नंतर आपल्या महालांत यावयाचें.

निहालः—पण मला जन्मांत कधीं संवय नाहीं. या माझ्या जिव्हेला त्या प्रसादाची लजत मुळींच माहीत नाहीं. मला तें मानवणार नाहीं. माझें मस्तक फिरेल, भोंड येईल. नका गडे भलत्याच गोष्टीचा आग्रह धरूं. असें केल्यानें आपल्याला आपल्या कामांत यश येणार नाहीं, बाबरानें मद्य पिण्याचीं आपलीं सुवर्णाचीं सर्व पात्रें फोडून टाकून शपथ घेतली, तेव्हांच त्याला शिक्रीच्या लढाईत जय मिळाला. (वनवीर जास्त आग्रहाचें वर्तन दाखवितो.) आज नको आणखी एखादे दिवशीं.

वनवीरः—छे, छे, आजच झालें पाहिजे आज अमावास्या आहे. आजच्यासारखा योग पुनः येणार नाहीं. देवीचें मंदिर कांहीं लांब नाहीं. वाड्याच्या अगदीं नजीकच आहे. तथापि श्रम होत असतील, चालवत नसेल तर, मी कडेवर घेऊन जातों. कारण तुला दोन माणसांचें ओझें वाहून नेणें फार कठीण आहे.

निहालः-दोन माणसें कोण ?

वनवीरः—दोन ह्मणजे एक स्वतःचें ओझें आणखी दुसरें पोटांतल्या मनुष्याचें ओझें. बाकी पोटांतल्या मनुष्याचा पायगुण मात्र उत्तम आहे. गर्भसंभव झाला मात्र तोंच आईबापांची राज्यपदावर स्थापना. भाग्यवान्, दैवशाली कोणीतरी योगभ्रष्ट तुझ्या पोटीं येणार. कोण येणार बरें ! तूंच सांग.

निहाल:—पुरे झाली मेली थट्टा आतां. मला नाहीं ठाऊक. इकडू-नच सांगावयाचें व्हावें कोण येणार तो.

बनबीर:—सांगूं का ? पृथ्वीराज, आमचे बाबा, त्यांची आशा चितोडच्या तख्तावर बसावयाची तशीच दडपून राहिली. तींत त्यांचा अंत झाला.

निहाल:—तें कांहीं नाहीं. मला जें स्वप्न पडलें आहे, त्यावरून हा तर्क अगदींच खोटा ठरतो आहे. माझे आजोबा, माझ्या पोटीं येणार, असें अंतकाळीं माझ्या आजीला वचन देऊन गेले आहेत.

बनबीर:—स्वप्नावर कोणीं भरंवसा ठेवावा ? तथापि तूं म्हणतेस तसेंही होण्याचा संभव आहे. किंवा कदाचित् माझे बाबा आणि तुझे आजोबा, दोघेही असतील. तें असो. पण आतां मध्याह्नरात्र अतिक्रांत झाली आहे. या समयीं देवीचा तीर्थप्रसाद घेण्याला जाणार. हं, चला आपल्या दिलेल्या वचनाची पूर्तता करण्याला. नवऱ्याच्या आज्ञेंत जी वागते, तीच महा पतिव्रता. नवऱ्याला संतुष्ट करणें हें बायकोचें कर्तव्य आहे.

निहाल:—बरें मी आज्ञेप्रमाणें करितें, पण दिलेलें वचन अगो-दर पुरें झालें पाहिजे.

बनबीर:—बोलण्याचा उशीर कीं आतांचे आतां पुरें करितों. तुझ्या बाबाला प्रधानकीचीं वस्त्रें देण्याचा समारंभ उद्यांचे उद्यां उरकून घेतों. हेंच वचन कीं नाहीं ? येऊन जाऊन दरबारच्या मंडळीची आडकाठी येणार कीं नाहीं ? माझें लक्ष खानदानीकडे अथवा कुलवंताकडे कमी आहे, हें त्यांनीं म्हटलेलें आम्हांस चालतें. बोलून चालून मी जर दासीपुत्र, असें सगळ्या जगाला माहीत आहे, तर माझें लक्षही असेंच खानदान न पहाण्याकडेसच असावयाचें. माझी आणि तुझी खानदान एकाच दर्जाची आहे. तुमचें आमचें लग्न होण्याच्या अगोदर तुम्ही आम्ही काय करीत होतों ! या गोष्टींचा आपण राजे लोकांनीं आतां एकमेकांजवळ उल्लेखसुद्धां करूं नये. तुमच्या आमच्या पाठीवरचे कमचाचे वळ सुद्धां अद्याप बुजले

नसतील. आतां पराच्या गाद्या, छपरी पलंग, मच्छरदाण्या लागतात. अनेक वेळां आपण कामांत चुका केल्यामुळें राणी सरकाराकडून तुम्हीं आणि राजे सरकाराकडून आम्हीं येथच्छ चाबकानें फराळाचें खाल्लें आहे. दोघेंही आपण दासीजनांचीं म्हणजे बटकीचीं पोरें. आपली किंमत काय ? पण आपण आपल्या कर्तबगारीनें ह्या पदावर येऊन बसलोंना ! प्रयत्नावर सर्व गोष्टी अवलंबून असतात.

निहालः–पुरे पुरे आतां, मला नाहीं असलें बोलणें आवडत. काय ह्मणे बटकीचीं पोरें. असें बोललांत तर मी साफ देवीच्या मंदिरांत येणार नाहीं हो.

बनबीरः–मी नेल्याशिवाय रहाणार नाहीं हो. आज हें काम म्हणजे प्रसादतीर्थ सेवन करण्याचें काम झालेंच पाहिजे. ( तिला ओढतो. )

निहालः–येतें ना पण मी, सोडा माझ्या हाताला. हें काय बाई, एखाद्यानें पाहिलें तर काय म्हणेल ! पण वाघसंबंधीं दिलेलें वचन उद्यांचे उद्यां पुरें झालें पाहिजे हो !

बनबीरः–हो, हो, हो. उद्यांचे उद्यां मग झालें ना !

निहालः–पण उद्यां वाघाची शिकार करण्याकरितां स्वारी जाणार आहे ना ! या शिकारींत शिकाऱ्यांकडून ती पटाईत वाघीण त्याच्यावर घालवावी म्हणजे अनायासें काम होणार आहे. शिकाऱ्यांचे नाइकाकडे लालसिंगाला आतांचे आतां पाठवावा. शेर शेर सोन्याचें कडें बक्षीस म्हणून प्रत्येकाचे हातांत चढविलें जाईल असें त्याला वचन देऊन नाइकाकडून बेलभंडार उचलून घ्यावा. उदयसिंगाला वाघानें ठार केलें म्हणजे जनापवादाची आपल्याला भीति नको. ही युक्ति साधलीच पाहिजे. नाहींच साधली तर मग महाबलसिंहाला कैदेंत घालून कार्यभाग उरकूं. ( जातात. )

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ–जंगल किंवा डोंगर कठडा.

( कांहीं शिकारी प्रवेश करितात. )

पहिला शिकारी:–आतां याला काय करावें ? सरकार स्वारी अगदीं गरमागरम झाली आहे. फार खप्पा मर्जी झाली आहे. आम्ही पांच पन्नास जवान एकच कहीं करीत आहों, एकच गुल माजवितों,–मोठाले ढोल वाजवितों, करवंदीच्या जाळींतून, शेरण्याच्या बेटांतून, दाट गवतांतून, शिकारी कुत्र्यांच्या झुंडी घालतों, बाण शिलगावून ठिकठिकाणीं उडवितों, पण वाघीण किंवा तिचा बच्चा बाहेर पडत नाहीं. सरकारी हत्तींच्या ताफ्यांवर खासा स्वाऱ्या हौद्यांत बसून मौज पाहणार. वाघ हत्तीवर चालून जाईल तेव्हां हे गोळी मारणार.

दुसरा शिकारी:–हत्तींच्या बाजूला गेला तर या बाता, नाहीं तर आपल्याच बाजूला जर का त्यानें किरण साधलें, तर मग आपणच हत्ती–आणि आपणच–खासा स्वारी–आपणच हत्यार–सगळें आपणच. मग त्या खासा स्वाऱ्या मजा पहाणार.

तिसरा शिकारी:–ही वाघीण मोठी ढाण्या वाघाची जात आहे म्हणतात. घोड्याएवढी आहे म्हणतात. पहिले दिवशीं तिनें एक मारवाडी खाल्ला. दुसरे दिवशीं त्याचा मामा त्याचा छडा काढण्याकरितां जंगलांत गेला. तों तिनें अचानक मांजर जसें उंदीर नेतें तसें नेलें परवां तिनें गांवच्या पाटलाचा बळी घेतला. सगळा गांव त्याच्याबद्दल हळहळतो आहे. ( बनर्धार–दोन तलवारी, पाठीस ढाल, कमरेला चार पांच कट्यारी, तोड्याची बंदूक, तीरकमटा, भाला वगैरे घेऊन प्रवेश करितो. )

बनबीरः-( सर्व शिपायांचे मुजरे घेत ऐटीनें ) अबब ! आज पुष्कळच शिकारी आले आहेत. ( मिशीला पीळ देत देत ) आज हा रानांतला राजा-हा जंगलचा मालक ठार झालाच पाहिजे. आजपावेतों मीं कित्येक वाघांची शिकार साधली आहे. माझ्या तडाख्यांतून वाघ जिवंत सुटेल अशी तुह्मी शंकासुद्धां आणूं नका. फक्त मला तो दिसला मात्र पाहिजे, कीं अंगावर धांवलोंच. ( शिकारीच्या नाइकाला एकीकडे बोलावितो. ) नाईकसाहेब, आज तुह्मी आह्मांला एका कामांत मदत करणार आहांत. रात्रीं लालसिंगाला तुह्मीं बेलभंडार उचलून दिला आहे. आतां जर कां कसूर झाली, तर दूरवर आपला विचार करा.

नाईकः-सरकार, हें तोंड आहे का चांभाराचें कातडें धुण्याचें कुंड आहे? सरकाराकडून इशारत होण्याचा दिरंग झाला तरीसद्धां आमचे जवान काम बजावणार. खात्री ठेवावी सरकारांनीं. हा जंगलचा राजा हुकुमांत असणार कोणाच्या! एकदां हुसकावून त्याला डोंगराच्या गुहेच्या बाहेर पडूं द्या, कीं बघा त्याला कसा घुलकावण्या दाखवून नेमका त्या पोरांच्या अंगावर घालतों तो! पण सरकार, आह्मी बारा शिकारी, आम्हांला बारभाई ह्मणतात. शेरभर सोन्याचें कडें एकेकाच्या हातांत चढविलें पाहिजे. असें कबूल असेल, तर बारभाईचा पराक्रम पहा.

बनबीरः-तुह्मी बारभाई आहांत ह्मणूनच मला भय वाटतें. तुह्मी सर्व पांगून पांगून रहा. एकाच ठिकाणीं गिल्ला करूं नका, नाहीं तर सगळा उलटा प्रकार होईल. पण हें पहा, ते हत्तीवरून पायउतार होऊन इकडे आलेच. हा राक्षस कशाला यांच्याबरोबर आला कोण जाणे! याचासुद्धां जमल्यास निकाल लावून टाका. ( महाबल, उदयसिंग, संग्रामसिंह, प्रवेश करितात. ) महाबलसिंह, आपण कशाला तसदीप घेतलीत? कांहीं कारण नव्हतें. राजकुमाराच्या केंसाला येथें धक्का लागणार नाहीं. मला तुम्ही सामान्य समजलांत कीं काय? माझ्या या हत्यारांवर भिस्त ठेवून तुम्हीं स्वस्थ घोरत पडायचें होतें.

**महाबल**:-मी सुद्धां यांना हेंच म्हणत होतों. पण राजकुमाराची आज्ञा मला मोडतां येईना. चला आमच्याबरोबर-तुम्हाला घेतल्याशिवाय आम्ही शिकारीला जाणारच नाहीं. असा जेव्हां महाराजांचा कल पाहिला तेव्हां मलाही यावें लागलें. बाकी, यांची हिफाजत ठेवणें सर्व प्रकारें आपल्यावरच अवलंबून. आजची शिकार महाराज उदयसिंग यांच्या मनांत स्वत: करावयाची आहे. हत्तीवर बसून तिरंदाजी करून जनावर ठार करण्याबद्दल मीं त्यांना मारुजा केला, परंतु माझा मनसुबा त्यांना पसंत नाहीं.

**उदयसिंग**:-मर्दांनी मर्दांबरोबर सामन्याला दंड ठोकून मैदानांत उभें राहिलें पाहिजे. हत्तीवर हौद्यांत बसून तिरंदाजीनें नाहींतर शिलगावलेल्या तोड्याच्या बंदुकीनें वाघाचा माथा फोडणें यांत काय जवामर्दी. वाघाला अंगावर घेऊनच ठार करावयाला पाहिजे. कसें संग्रामसिंह ?

**संग्रामसिंह**:-आजपर्यंत लांडगे, अस्वल, डुकरें यांच्या शिकारी कैक झाल्या. शेरची शिकार सुद्धां आज कांहीं आपण पहिल्यानेंच करीत नाहीं. प्रत्येक वारीला बाबा आपले साथीदार असतातच आणि अखेर अखेर आपली दमछाट झाली, आपली शिकस्त झाली, म्हणजे मग बाबा वाघाला सामन्याला बोलावून एका हाताला कपडा लपेटून तो त्याच्या जबड्यांत देतात. दुसऱ्या हातानें वाघाच्या पोटांत तलवार भोसकून त्याला जमिनीवर लोळवितात. आजचा मौका कसा काय येतो तो पाहूं. पण वाघाला अंगावर घेऊन ठार करणें याचें नांव शेरची शिकार, नाहींतर कुत्र्याची शिकार.

**बनबीर**:-( एकीकडे ) तुमची तिघांची शिकार त्या वाघाकडून करवून तुमचा फैसला आतांचे आतां करतों. नखाएवढीं कारटीं नाहींत पण जीभ लांब करून बडबड कशी चालवितात. एकदां पराक्रमाच्या बाता छानायला लागले कीं दुसऱ्याला वाटावें कीं रामलक्ष्मणाचे हे अवतारच आहेत बेटे जसे कांहीं. दम धरा गुलामांनों, तुम्हांला त्याच्या जबड्यांत अडकावून टाकतों.

**महाबल:**–ही नशिबाची बात आहे. आपण पुष्कळांनीं जरी कंबरा खेचल्या आहेत तरी ज्याच्या नशिबांत असेल त्यालाच ही शिकारीची दौलत मिळणार आहे. वाघाची शिकार साधल्याचा आनंद त्या शिकाऱ्याला विचारावा पुत्रवतीच्या आनंदाची कल्पना वांझेला कशी येणार ! (बनवीरास उद्देशून) पण सरकार, आपण इतकीं हत्यारें घेऊन वाघानें आपल्यावरच चाल केली तर पळणार कसे ! मला वाटतें कांहीं खंजीर आणखी तलवारी आपण बाजूला ठेवाव्या. हत्यारांचा बोजा घेऊन पळण्याची पंचाईत पडते.

**बनवीर:**–मी पळणार म्हणतां, मग मी क्षत्रिय कसला ! सूर्यवंशीं माझी उत्पत्ति असून यःकश्चित् वाघाला डरून जर मीं पोबार केला तर माझ्यासारखा बेअक्कल या दुनयेंत कोण सांपडणार. हा बनवीर वाघाला कधीं पाठ दाखवील ह्मणतां ! नांव कशाला, येऊंद्या त्याला माझ्या टप्यांत आणखी मग या हत्यारांची करामत पहा. तुह्मी कोणी मला मदत करूं नका. माझ्या यशाला विनाकारण वांटेकरी नको आहेत. अवल त्याला मी या तिरानें, असा घायाळ करीन, तो घायाळ होऊन जमिनीवर पडला कीं अशी जाऊन त्याच्या पाठींत लाथ मारीन. (जमिनीवर लाथ मारितो.) त्याच्या अंगावर असा चालून जाईन. (तलवारी फिरवितो, इकडे तिकडे नाचतो.) वाघ मारणें म्हणजे मला पोरखेळ वाटतो. वाघाला मी कच्चा खाऊन टाकीन. माझ्या आड मात्र येऊं नका. मीं शिकाऱ्याला ताकीद केली आहे.

**महाबल:**–(उदयसिंग व संग्रामसिंह यांना उद्देशून) महाराज, याच्यांत मला कांहीं राम दिसत नाहीं. भित्रे लोक अव्वल अव्वल अशाच बाता मारून दुसऱ्याला गार करितात; पण शिकारींत कसलेले असल्या थापांनीं थोडेच फसणार आहेत ! तलवारी काय अंगाभोंवतीं फिरवितो आहे, नाचतो काय, कुदतो काय, त्याला वाटतें आम्ही सर्व बच्चे आहोंत वाघाचे सपाट्यांत सांपडला तर फुकट मेला जाईल.

**उदयसिंगः**–आणखी ईश्वर करील तर असेंच होणार आहे. त्या वाघिणीचे तडाख्यांत हा जर सांपडेल तर मोठी बहार होणार आहे.

**संग्राम०ः**–याची चटपट चटणीच करून टाकील. त्या पटाईत वाघिणीपुढें हा नुसता मेषपात्र दिसेल. त्याला मूर्च्छा येईल, याची दैना पहावणार नाहीं. ( पडदा वर जातो, वाघाच्या गुहेचा व जंगलाचा देखावा. माणसांचीं हाडें, फाटके कपडे व एक दोन माणसांचीं डोकीं पडलेलीं दृष्टीस पडतात. )

**बनवीरः**–( घाबरून ) वेताळ खेळवणारे जादूगार लोक मंत्राच्या जोरानें पटाईत वाघ होऊन फिरतात. त्यांना गोळीच लागत नाहीं म्हणतात.

**उदयसिंगः**–ते वाघ होतात असें आह्मी ऐकतों पण हा कांहीं वाघ नाहीं ही वाघीण आहे. अशा प्रकारचा एखादा वाघ सरकारांनीं कधीं पाहिला आहे काय ?

**बनवीरः**–हो ! हो ! पाहिला आहे म्हणजे ! ( मिशांला पीळ देत ) त्याचें डोकें घागरी एवढें असतें, दांत हातहात लांब पुढें आलेले असतात, डोळें जसे कांहीं खदिरांगार–काळोख्या रात्रीं मशाली पेटल्याप्रमाणें दिसतात. शिवाय त्याची दूम खची केलेली असते. ( वाघाची गर्जना ऐकूं येते. बनवीर घाबरतो. ) अरे बापरे, माझ्याकडे धांवत न येवो म्हणजे झालें.

**महाबलः**–ही पहा वाघीण आली. आपल्याकडे न येतां तिनें हत्तीच्या अंगावर चढाई केलेली आहे. हत्तीनें मोहरा फिरविला. सोंडा वर करून बाजूला होण्याचा प्रयत्न करीत आहेत पण त्यांना अंदू केल्यानें माघार होतां येत नाहीं. ती पहा ! परत आली ! इकडे न येतां त्या खडकाच्या कपरींत करवंदीच्या जाळींत घुसली. पाठवा सरकार शिकारी लोक, त्यांचे कुत्रे जाऊं द्या तिच्या अंगावर म्हणजे ती चातावून आपल्या सर्वांच्या अंगावर तुटून पडेल. ज्याच्या नशिबीं असेल तो शिकार करील. तिनें आपली शेपटी वर केलेली आहे तेव्हां ही कांहीं जादूची वाघीण नव्हे.

बनवीरः—चला शिकारी लोकांनो, आपण तिच्या अंगावर धांवून जाऊं, तिला हुसकून बाहेर काढूं. माझ्याजवळ हत्यारें पुष्कळ असून मी अशा कामांत दर्दी असल्यानें तुमच्यापुढें तुमचा म्होरक्या होतो. ( नायकाच्या कानाशीं लागून ) आतां तुह्मीं तिला हुसकून देऊन यांच्या अंगावर घालावयाची. एवढीच कामगिरी तुम्हीं करावयाची आहे. मी त्या पलीकडच्या झुडपांच्याजवळ उभा रहातों, म्हणजे त्या बाजूला जर आलीच तर मी तिला इकडे पिटाळून लावीन, नाहीं तर एक घाव दोन तुकडे करून टाकीन ( बनवीर व शिकारी आंत जातात. )

महाबलः—आपण तिघांनीं तीन टप्यांवर फांकून अवसानांत आणखी पवित्र्यांत उभें राहिलें पाहिजे. कदाचित् दोन चार फलंगांत ती आपल्या अंगावर चालून येईल.

उदयसिंगः—( मोठ्यानें हंसून ) पण बाबा, तो पहा बनवीरदादा लांब लांब जाऊन त्या झुडपांच्या आड लपून बसला आहे. आतां ही वाघिण जर येथून शिकाऱ्यांनीं हुसकावून दिली आणि ती जर त्या झुडपांकडे गेली तर याला कोण वांचविणार ?

संग्राम०ः—( मोठ्यानें हंसून ) या शेंदाडशिपायाची आपल्याला चिनपैशावांचून मौज पहावयाला सांपडेल, ही मला घरून निघण्याच्या अगोदर कल्पना सुद्धां नव्हती.

शिकारीः—( आंत मोठ्यानें ओरडून ) सर्व लोक सावध रहा. हुशार रहा. आम्ही हा बडा फत्तर कड्यावरून खालीं लोटतों आहों. वाघीण अंगावर चवताळून येईल, आपआपलीं हत्यारें तयार ठेवा. तोंडे शिलगावून तयार ठेवा.

महाबलः—घ्या रामाचें नांव. करा हर हर महादेव. ( धोंडा पडल्याचा मोठा आवज होतो, वाघिणीची गर्जना होते. बंदुकीचा आवाज होतो. ) वाघिणीचा बच्चा मारिला गेला. आतां तर ती भयंकर पिसाळेल. बेकाम होईल. वाघीण मारून बच्चा पकडावयाचा

होता. विनाकारण मारला गेला. असो, तुम्ही आपले नेम चुकूं नका. अगदीं तिच्या वर्मी जाऊन तीर लागले पाहिजेत म्हणजे येथ-पावेतों येऊनच पोंचणार नाहीं. शिकारी लोकांनो, आणखी एखादा बडा फत्तर ह्या वरून लोटून. म्हणजे वाघिण बाहेर पडलीच म्हणून समजा. फत्तर आदळून आदळून मोठा आवाज होऊन त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या म्हणजे तिच्या अंगाला ते कपरे लागणारच. ती बाहेर पडणार. रेटा. जोरानें रेटा. (दगड पडल्याचा आवाज होतो.)

**उदयसिंगः**—ती पहा, बाहेर पडली. पण स्वस्थ उभी आहे. किती उमदा प्राणी आहे. धन्य आहे विधात्याची !

**संग्राम०ः**—शेपूट कसें वर केलें आहे. शेपूट पिंजारलें आहे. आपल्याकडे आणि त्या सर्व शिकाऱ्यांकडे संतापून पहात आहे. आतां ती कोणावर तरी झांप घालणार. त्याचा फडशा पाडणार. (महाबल बंदूक झाडतो.) दचकली, वाघीण दचकली. बाबांची गोळी तिला लागली हेंच खास. ती आतां इकडे खास येत नाहीं. हळू हळू बनवीरमहाराजांकडेच आपला मोर्चा वळवीत आहे असें दिसतें. (महाबल पुन्हां बंदूक झाडतो.) तिनें दुसरी गोळी खाल्ली. ती पहा, मागें वळली. गुरकावून पहाते आहे. तोंडाचा जबडा केवढा वासला आहे ! गेली, गेली, बनवीरमहाराजांकडे गेली.

**महाबळः**—आतां काय करावें ? आतां बनवीर खास मारला जाणार. त्याला माहीत नाहीं कीं, आपण छपून बसलेल्या जाळी-कडेच वाघिणीनें चाल केली आहे. आतां हा वांचण्याला काय तोड करावी ! हाय, हाय, बिचारा फुटक्या नशिबाचा बनवीर. तिच्या-पुढें येऊन दोन्ही हात वर करून उभा राहिला आहे. तो अगदीं तिच्या फलंगीच्या टप्प्यांतच येऊन उभा राहिला आहे. भीतीनें अगदीं गांगरून गेला आहे. त्याच्यानें तलवारीचा वार सुद्धां कर-वत नाहीं. आतां ती बनवीरावर झडप घालणार. फाडून फाडून त्याच्या चिंधड्या करणार. भेदरून गेल्यामुळें एक पाऊल सुद्धां

त्याच्यानें टाकवत नाहीं. ( उदयसिंग तलवार पडताळून, वाघिणीच्या अंगावर धांवून जातो. ) उदयसिंगमहाराज, उदयसिंगमहाराज, माघारे फिरा, माघारे फिरा. अरे राम, आतां काय करावें ? ते माघारे फिरत नाहींत.

**संग्राम०**:–शाबास, शाबास, भले मर्द ! उदयसिंग महाराजांनीं आपल्या तलवारीनें वाघिणीच्या कंबरड्यावर जबर जखम केली. या वेळीं बनबीराला उदयसिंगमहाराजांनीं प्राणदान दिलें; नाहींतर तो बळी पडला असता. तो पहा बनबीर बेशुद्ध होऊन पडला. भीतीनेंच मेला म्हणावयाचा. बाबा, बाबा, सावध रहा, सावध रहा, वाघीण परतली. आली, आली. आपल्या दोघांकडे धांवत आली. वाटेंत शिकारी तिला सांपडला. घेतला पंजानें तिनें पोटाखालीं. त्वेषानें त्याचें शरीर फाडफाडून टाकिते आहे. मेला, मेला तो मात्र खास खास मेला. झापा टाकीत इकडे आली. बाबा, बाबा लांब व्हा. लांब व्हा. ( महाचल बंदूक झाडतो. ) चुकलें निशाण चुकलें. गोळी लागली नाहीं. ( वाघीण धांवत महाचलाचे अंगावर येते. तो तलवारीनें तिचें मस्तक जमिनीवर पाडतो. उदयसिंग परत येतो. संग्रामसिंह व उदयसिंग महाबलाचे कंबरेस मिठ्या मारतात. सर्व शिकारी भ्यालेल्या बनबीरास उचलून आणतात. )

**महाबल**:–( दोन्हीं मुलांचीं मुखें कुरवाळतो, चुंबन घेतो. ) कोण आनंदाचा दिवस उगवला ! असा आनंद ज्याला होत असेल तो पुरुष पृथ्वीतलावर धन्य होय. ज्या परमेश्वरानें आपल्याला हा सोन्याचा दिवस दाखविला त्याचे गुणानुवाद गावेत हें आपलें कर्तव्यच आहे. परंतु महाराज उदयसिंग, तुह्मीं आज केवढें धाडस केलेंत. तुह्मीं आपला प्राण धोक्यांत घातलांत. आज तुह्मी नसतां तर बनबीर सरकारची आशाच नव्हती. तुह्मीं आपल्या शौर्यानें आम्हां सर्वांस खालीं पाहावयास लावलेंत. आज देवानें खैर केली पण अशा प्रकारें आपले प्राण धोक्यांत घालीत जाऊं नका. धैर्यवान एकदांच मरतो. भित्रे लोक मात्र खरा मृत्यु येण्याचे अगोदर कैक वेळ मरतात.

( पडदा पडतो. )

# प्रवेश २ रा.

**स्थळ**-महाबलसिंहाचे वाड्यांतील दिवाणखाना.

( पन्ना आपल्या पतीची वाट पहात बसली आहे. )

**पन्नाः**-त्या दिवशीं रात्रीं ईश्वरानेंच प्राण वांचविले म्हणावयाचे, नाहींतर माझा उदयसिंग आज कांहीं माझ्या नजरेस पडला नसता. आतां मी आपल्या बाळाला त्या मेल्या मांगाकडे कद्धीं कद्धीं म्हणून जाऊं द्यायची नाहीं. त्याच्या अन्नांत जालीम जहर त्यानें खचीत कालविलें होतें. पण त्या मेल्या दारोग्याला कांहीं झालें नाहीं. त्यानें सर्व अन्न खाऊन टाकिलें. काय असेल तें असो. परमेश्वर जाणें. दिवसेंदिवस ही माझी चिंता जास्त जास्त वाढत चालली आहे. राजपुत्राचे प्राण कसे वांचतील या काळजीनें मला अहोरात्र डोळ्याला डोळा नाहीं. आह्मी दोघें जर त्याच्या पाठीवर नसतों, तर राजपुत्राचा त्यानें हर तजविजीनें आज प्राण सुद्धां घेतला असता. बरें याला घेऊन कोठें तरी आश्रय मागावयाला जावें तर, बनवीराच्या जरबेनें आम्हांस आश्रय तरी कोण देणार ! ( एक चाकर प्रवेश करतो. )

**चाकरः**-आईसाहेब,राणीसाहेब आपल्या भेटी करतां आल्या आहेत.

**पन्नाः**-काय, काय, म्हणतोस, राणीसाहेब ! राणी निहालकुंवर आणखी मजकडे ! काय चाई संबंध ! कांहीं तरी कपट असेल. पण आतां काय ! आपण बोलून चालून एक पक्ष स्वीकारला आहे खरा. कांहीं होवो. राजपुत्राला म्हणून आतां मी आपल्या गळ्यांत बांधणार, मी आपल्या काळजांत ठेवणार. जा, बाबा घेऊन ये राणीसरकाराला. आज घरीं नाहींत. ही बातमी बनवीराच्या कानावर कोणीतरी घातली असावी, ही संधि साधून हा कांहीं तरी कपटजाळ पसरणार. पोरांना माझ्या गाढ निद्रा लागली आहे. ( लांब पाहिल्यासें करून ) आलीच हडळ, जातकूळ पाहिलें तर मेली हीही पण चटकीचीच कारटी आहे. ( राणी कांहीं नोकर घेऊन प्रवेश करत. )

निहालः–मुद्दाम अशा अंधाऱ्या रात्रीं, बरसात झिमझिम पडत असतां मी तुझ्या घरीं कां आलें बरें? बाबांनीं मला हुकूम केला कीं, आतांचे आतां जा, आणखी पन्नेची एकांतांत भेट घेऊन तिला कळीव कीं, तुझ्या माहेराहून पत्र घेऊन सांडणीस्वार आला आहे. बाबांनीं तूं जशी असशील तशी मला एकदम घेऊन येण्याचा हुकूम केला आहे. मीं बाबांना म्हटलेंसुद्धां कीं, ही कांहीं बोलावण्याची तऱ्हा नव्हे. मी पाहिजे तर पदूरच्या शिलेदाराला नाहीं तर मानकरी पाग्याला पन्नेला बोलवायला धाडतें. पण ते गरम झाले. मला म्हणाले, गप्प बस पोरी. तूंच जाऊन तिला आतांचे आतां घेऊन ये. तिला आणल्याशिवाय येऊं नकोस. इतकें जरूरीचें काय काम आहे? सांडणीस्वारानें काय संदेश आणला आहे, माझा कांहीं तर्क चालत नाहीं. बाकी तुझे बाबा आणखी माझे बाबा एकमेकांचे जिवलग मित्र आहेत, ही गोष्ट जगजाहीर आहे. पन्ना, तुझ्या माहेरीं कोणी जबरदस्त बीमार आहे काय?

पन्नाः–माझे बाबा वयोवृद्ध झाले असून आज कित्येक महिने ते अगदीं अंथरुणाला खिळून आहेत. या समयीं ते कदाचित् अत्यंत हैराण असतील, म्हणून माझ्या भावानें म्हणजे जसवंतसिंगानें सांडःस्वार पत्र देऊन आपल्या बाबांकडे पाठविला असेल. आमच्या घरच्या माणसांचे नांवें मुद्दाम पाठविलें नसेल, याचें कारण पत्रांत कमजास्त मजकूर असेल, तो मला हळूहळू तुमच्या बाबांनीं माझी समजूत घालून कळवावा म्हणून. या समयीं आपल्याबरोबर मीं यावें हें खरें, परंतु घरांतून सांगणें झालें आहे कीं, मी परत येईपावेतों उदयसिंग महाराजांना सोडून बिलकुल जायचें नाहीं.

राणीः–हातूतिच्या इतकेंच ना? तूं जा बाबांकडे मी येथें राजपुत्राजवळ गोष्टी सांगत त्याची करमणूक करीत बसतें. त्यांतून त्याला झोंप लागली असेल तर फारच उत्तम. इतक्यावर तुझ्या मनांत कांहीं कृष्णकल्पना असेल तर त्याला आपल्या बरोबर घेऊनच आमच्या बाबांच्याकडे जा. जसें तुझें प्रेम त्या कुमारावर आहे त्याच्यापेक्षां शंभरपट माझें आहे. कसें झालें तरी तो माझा धाकटा

दीर आहे. देवाशपथ, मला कांहीं पोट फाडून दाखवितां येत नाहीं, नाहींतर सीतादेवीला जशी मारुतीनें पोट फाडून रामाची मूर्ति दाखविली, तशी मीं उदयासिंगाची मूर्ति तुला दाखविली असती. महिना पंधरा दिवस तूं त्याला माझ्या सुपूर्द करून तर पहा. मी त्याला इतकी जिवाचे पलीकडे जपेन, इतकी जीव कीं प्राण करीन, कीं पुनः तो मला सोडणारच नाहीं. मला तरी घरांत दुसरें कोण आहे? माझ्या घरच्या माणसांबद्दल तुला कांहीं शंका असल्यास आमच्या बाबांकडे त्याला राहूं दे. माझे बाबा कांहीं सामान्य नाहींत. मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें सरकारांतून त्यांना नुकतीच मिळालीं आहेत. तुला म्हणजे ह्या गोष्टी माहीत नाहींत असें कांहीं नाहीं.

**पन्नाः**–( एकीकडे ) हे रामचंद्रा! तूं दीनदयाळ कनवाळू दीनबंधु आहेस. हे करुणाघना भगवंता, आतां मी कसें करूं? या समयीं मला धैर्य दे. प्रल्हादासाठीं स्तंभ फोडून धांवलास. हिरण्यकश्यपु दैत्याचें उदर विदारण करून भक्ताला पोटाशीं धरिलेंस. सती द्रौपदीची दुष्टांच्या सभेंत लाज राखिलीस. गजेंद्रानें तुझा अंतकाळीं धांवा मांडला त्याला तूं विमानांत घालून वैकुंठाला नेलेंस. या समयीं मला अंतर देऊं नकोस. देवा, तूं कृपेची माउली आहेस. स्वामिभक्तीची कसोटी पाहण्याची ही वेळ आहे. या समयीं माझें सत्व तिळमात्र ढळूं देऊं नकोस. ( उघड ) बाबासाहेबांनीं मला जें इतकें निकडीनें आणखी अगत्यानें पाचारण केलें आहे, तें केवळ ममतेच्या पोटीं हो. आपण जर त्यांना समजावून सांगितलें तर ते ऐकणार का नाहींत? घरचीं माणसें आल्याबरोबर विचारून मी लागलीच येतें. माझी ना थोडीच आहे. उदयसिंगमहाराजांना मात्र मी कोणालाच हात लावून देणार नाहीं.

**राणीः**–( एकीकडे ) इला जरा यमस्वरूप दाखविल्याशिवाय ही बधणार नाहीं. ही बाई कठीण तर खरीच, पण मीही कांहीं कमी नाहीं. शिवाय राज्याचा अधिकार ही कांहीं अजब चीज आहे. ( उघड ) पन्ना, तूं बेफाम होत चालली आहेस याचा दूरवर विचार कर. बेकदर बेमरवत भाषणें कोणाबरोबर बोलतेस? माझा अधि-

कार केवढा, माझा दर्जा काय ? तुझी किंमत काय ? या गोष्टींचें तुला मस्तपणानें भान नाहीं. बऱ्याबोलानें आतांचे आतां माझ्याबरोबर येतेस कीं नाहीं ? बाबांना जाऊन मी काय जाब देऊं ? माझ्याच्यानें पन्ना आली नाहीं, असें म्हणूं ? उदयसिंगाचें पडप मजपुढें नाहीं चालायचें. त्याला येथें कोणीं खातें का आहे ? शेकडों रखवालदार आहेत. चल लौकर.

पन्नाः—राणीसाहेब आपण मला बोलायला लावीत आहां. आपली बेअदबी होत आहे याची मला माफी असावी. मीं आपल्यास पर्यायानें पुष्कळ सांगितलें, परंतु आपण कांहीं ऐकत नाहीं. आपला दर्जा, आपला मानमरातब, सर्व मी कांहीं जाणत आहें. आपली आज्ञा पाळावी हें माझें कर्तव्यच आहे. पण उदयसिंग महाराजांचें रक्षण करणें हें माझें त्यापेक्षां लाखपटीनें महत्वाचें कर्तव्य आहे. माझे बाबा प्रत्यक्ष स्वर्गाला जरी गेले असले, आणखी माझी वृद्ध माता, सती जाण्याकरितां जरी निघाली असली, तरी तो सोहळा पाहण्याकरितां सुद्धां उदयसिंगमहाराजांना सोडून मी जाणार नाहीं. माझे तुह्मी हातपाय तोडा, माझी जीभ कापा, माझ्या डोक्यांत धोंडा घाला, नाहींतर सांडसानें माझें मांस काढा, मीं स्वामिभक्तीला पराङ्मुख होणार नाहीं. माझी हात जोडून प्रार्थना आहे कीं, आपण बाबा साहेबांना हा निरोप कळवावा.

राणीः—आतांचे आतां मुसक्या बांधून तुझ्या झिंज्या धरून तुला वाटेल तिकडे खेंचीत घेऊन जाईन. माझा हुकूम तोडतेस ? तुझ्या बारा हजारांची तमा काय ? एकदिल पन्नास हजार घोडेस्वार आणखी लाख पायदळ आमच्या दिमतीला आहे. तुझ्या वाड्याला चौगर्दा गराडा देऊन तुझ्या हातांत जंजीर ठोकून तुला आणखी तुझ्या खाविंदाला कैदखान्यांत घेऊन जाईन. यःकश्चित् तूं उदयसिंगाची दाई. तुझी इतकी बडिजाव काय म्हणून ? राणासंग आणखी त्याची राणी करणावती यांचासुद्धां मी म्हणतें गैरसमज झाला. हो, म्हणूनच त्यांनीं अशा कसाब दाईच्या स्वाधीन आपलें बालक केलें. ( शिपायास उद्देशून ) कोण आहेत रजपूत जवान ?

बांधा रांडेच्या मुसक्या. इच्या पाठीवर जेरबंद उडवा. इच्या नाकांत वेसण टोंचून इची शहरांतून धिंड काढा. गमजा चाल विल्यात माझ्याशीं ! ( एक रजपूत येऊन राणीच्या कानाशीं लागतो. राणी सेवकजनांसह निघून जाते. )

पन्ना:-( एकीकडे ) हा चमत्कार काय बरें असेल ! एकदम जादू केल्याप्रमाणें ही अवदसा निघून कशी गेली ! याच्यापेक्षां घोर संकट आतांचे आतां उद्भवणार आहे. मोठा दगा आहे खास. कांहीं असो उदयसिंगाच्या शरीराला म्हणून मोठा ब्रह्मदेव आला तरी त्यालासुद्धां स्पर्श करून द्यायची नाहीं. कुमाराच्या शरीरावर हा देह टाकीन. माझ्या शरीराचीं खांडोळीं झालीं तरी हरकत नाहीं. कोण मायेच पूत येत आहे, त्याला म्हणावें खुशाल ये. दरवाजा बंद करून जंजीर लावून घेतें. तोफांची सरबत्ती लावून वाडा जमीनदोस्त करा. पुरुष घरीं नाहींत. ही संधि साधून मेल्यांनीं धुमाकूळ मांडला आहे. ( दरवाजा बंद करावयास जाते. छपून बसलेला बनबीर सशस्त्र प्रवेश करितो. )

बनबीर:-( एकीकडे ) निहालच्या हातून कामगिरी बजावली गेली नाहीं. मीच आतां हें काम फत्ते करतों. गुप्तपणें मी निहालच्या बरोबर होतोंच. सर्व जिकर कानांनीं मीं प्रत्यक्ष ऐकला. तो पागल कारटा या वेळीं घोरत पडला आहे. त्याच्या छातींत हा पेषकबज् खुपसून निजल्या जागीं त्याला ठार करून-उद्यां हें अघोर कृत्य याच अवदसेनें केलें म्हणून इची दरयाप्ती करून इला तोफेच्या तोंडीं उडवून देतों. इच्या खाविंदाला-त्या महाबलसिंहाला-इच्या मागें पाणी पिण्याला फुरसत देत नाहीं. खास तो इला सामील होता. दोघांनीं राजपुत्राचा खून केला म्हणून गिल्ला करून यांचा निकाल उद्यांचे उद्यां लावतों. ( लांब पाहिल्येसें करून ) दरवाजा बंद करून परत आली. चालली त्या कारट्याचा समाचार घेण्याला. बसली त्याच्या पलंगावर-नमस्कार करते. कर देवाला नमस्कार. हजारवेळां पायां

पड. या माझ्या कैचींतून कोणता देव तुला आणखी तुझ्या त्या कारस्थाला सोडवितो आहे, तें पहातों आतां. ( पन्ना प्रवेश करते. )

पन्नाः—आज मला झोंप कशाची येणार! माझ्या सर्वांगाचा भडका उडाला आहे। पहिल्याप्रथम भीति वाटत होती पण आतां देवानें एक प्रकारें माझ्या अंगांत स्फुरण उत्पन्न केलें आहे. कसाही भयंकर प्रसंग प्राप्त झाला तरी मी त्याला तोंड देणार. वाघीण जशी आपल्या पिलांकरितां झडप घालते तसी मी माझ्या बाळावर हात टाकणाऱ्यांच्यावर तुटून पडेन. आज घरीं येण्याला मेला किती तरी उशीर लागला आहे ! महाराज ब्रह्मानंद यांना देव बुद्धि देवो. आणखी तेही ह्यांच्याबरोबर या समयीं आमच्या घरीं येवोत. ( बनबीराकडे पाहून ) अग बाई हा कोण ? हा घरांत आला कसा ? माझ्या घरांतली चोरवाट याला कशी समजली ? हां! हा कांहीं चोर नाहीं. चोराच्या वरचा आहे. गळेकापू आहे. आतां मी समजलें. ती गेली, आणखी हा स्वतः वेष पालटून आला आहे. तोच नीच हेतु मनांत धरून हा आला आहे. ( उघड ) महाराजांचें आगमन अशा अपरात्रीं कां झालें ? घरांत नाहींत. कांहीं विशेष जरूरीच्य कामाकरितां बाहेर जाणें झालें आहे म्हणतें. आपल्या तैनातीला हार असते म्हणजे बरें झालें असतें. राणीसाहेब आतांच येऊन गेल्याजं

बनबीरः—( स्वगत ) हिनें आपणांस पाहिलें हें बरोबर झालें नाहीं. या कामांत माझें धोरण अगदीं चुकलें. हिला पक्की झोंप लागेपावेतों मीं छपून बसलें पाहिजे होतें. नंतर त्या कारस्थावर हमला करून त्याचें रक्त इच्या अंगावर शिंपडून आपण पसार व्हायचें. बरें कांहीं हरकत नाहीं. ( उघड ) ती दिवाणी आहे. तिच्या मागोमाग मी होतोंच. मीं तिला येथून एकदम चालती होण्याचा हुकूम केला. मोठ्या महत्वाचीं कामें गोड बोलून जशीं होतात तशीं हुंबरातुंबरीला येऊन होत नाहींत. तुम्हाला ती बेजाबात बोलली. पण तुम्ही तें कांहीं मनांत आणूं नका. ती जरा तापट स्वभावाची बायको आहे. हासल मतलबाची गोष्ट ही आहे कीं, आमचा भाऊ उदयसिंग आमचा

आम्हास आपखुषीनें वापस करावा. विनाकारण तेढ वाढविण्यांत काय किफायत आहे ? याबद्दल तुमची मर्जी असेल तर एखादी मोठी जहागीर आदा करूं. तुमचा दर्जा वढाऊ. अगदीं मुख्य दिवाणगिरीची मरातब महाबलसिंहाला देऊं. यांत तुमचा काय कमीपणा होणार आहे थोडाच ? तुह्मी आपला जाबता पाहिजे असल्यास त्याच्यावर ठेवा. बोला किती लाखांची जहागीर तुम्हांला तोडून देऊ. दहा, पंधरा, वीस, पंचवीस, वाटेल ती नमूद करा. उद्यांचे उद्यां सनदा करून देतों. तुमच्या संग्रामसिंहाला खाऊ करतां, दहा पांच गांव निराळे देतों. या कामांत तुह्मी माझा शब्द मोडूं नका.

पन्ना:–पण महाराज, याचा जबाब देणें मजकडे काय आहे ? स्वारी घरीं नाहीं. आल्यानंतर काय विनंति करायची ती करतील. मी बायको माणूस, मजकडे काय आहे ?

बनबीर:–हें पहा, हा जाबसाल केवळ उडवाउडवीचा आहे. तुमची जितकी उदयसिंगावर सत्ता आहे, तिचा चवथा हिस्सा महबलसिंहाचा नाहीं. तुह्मीं माझें म्हणणें मान्य करावें. मी गोडीनें तुम्हास सांगत आहें, यांजकडे लक्ष द्या. किती लाखांची जहागीर तुम्हाला पाहिजे ?

पन्ना:–( स्वगत ) आग लागो तुझ्या जहागिरीला. स्वामिभक्तीपुढें जहागिरीला मी लाथ मारतें समजलास ? ( उघड ) महाराज, आपण म्हणतां तशी गोष्ट कालत्रयीं होणार नाहीं. उदयसिंग महाराज, यांना आमच्यानें घटकाभरसुद्धां सोडून रहाणें होणार नाहीं.

बनबीर:–तो कांहीं तुमच्या पोटचा नाहीं. प्रत्यक्ष पोटचा एकुलता एक बालक जरी काळानें ओढून नेला तरी सुद्धां आईबाप त्याच्याकरितां प्राण सोडीत नाहींत. मग हा तर बोलून चालून दुसऱ्याचा. आमचा बंधु आमच्या स्वाधीन करण्याला काय हरकत आहे ? तुम्हाला अलाहिदा जहागीरही मिळते आहे.

पन्ना:–सरकारचें हें भाषणसुद्धां ऐकण्याची मला इच्छा नाहीं.

जहागीर म्हणतां ! फार काय पण आम्हांस सर्व पृथ्वीचें राज्य-प्रत्यक्ष इंद्रपद जरी कोणीं दिलें तरीसुद्धां आम्हांस नको. उदय-सिंग हाच आमचा देव ! हाच आमचा आत्मा ! त्याच्याकरितां आम्ही प्राण देऊं समजलांत ।

बनबीरः–सिंहाचा पराक्रम पाहिला नाहीं तों पावेतों जंबूक गर्जना करीत असतो. या बनबीराचा क्रोधाग्नि भडकवूं नकोस. तुझी बटकीची मिजास फार वाढत चालली. तुझी लांब जीभ आतां या कट्यारीनें छाटून टाकीन. तझे तुकडे तुकडे करीन. या घटकेला मी उदयसिंगाचा प्राण घेतों. तूं काय करणार ? हा मी त्याचे अंगा-वर धांवून जातों. मला कोण मज्जाव करीत आहे तें पहातों. बोल मुकाट्यानें माझी शर्त कबूल करतेस कीं नाहीं ?

पन्नाः–अरे जा, बटकीच्या कारट्या. तुझ्यासारखे शेंकडों बन-बीर मी रजपुतानी पन्ना कस्पटाप्रमाणें समजतें समजलास ! ही पहा माझी तलवार आतां तुझा एका घायासरसा निकाल लावते. एक पाऊल पुढें, कीं तुझी गर्दन धडापासून अलग झाली म्हणून समज. जय कालीमाते. जय महिषासुरमर्दिनी–जय चंडमुंड, दलिनी, तुझा क्रोध या पन्नेच्या रोमरंध्रीं बाणून स्वामिकार्यीं तूं मला यशाची माळ घाल. हारामखोरा तूं चोर आहेस. तख्ताचे खरे मालक उदयसिंगमहाराज आहेत. आतां तुला प्रायश्चित्त देतें.

बनबीरः–घे आपल्या बेजबाबाचा नतीजा. ( उभयतांची झटा-पट होते. पन्ना घायाळ होऊन पडते. बनबीर तिच्या हातची तल-वार हिसकावून घेऊन फेंकून देतो. बनबीर खोलींत शिरून उदय-सिंगाला बाहेर ओढून आणतो, ) उदयसिंगा, तुला या वेळीं कोण सोडविणार ? ती पहा, तुझी आई पन्ना घायाळ होऊन जमिनीवर बेहोष पडली आहे. तुला मी आतांचे आतां ह्या घटकेस ठार मारणार.

उदयसिंगः–कोण तूं ! ह्या जगांत मला ठार मारणारा एक बन-बीर नजर पडतो आहे. पण तो प्रत्यक्ष माझा घात स्वतः करणार नाहीं. त्याचा हात मजवर चालणार नाहीं. वाघाच्या शिकारींत त्याला

वाघिणीनें फाडफाडून खाल्ला असता पण त्याचा प्राण मीं वांचविला यामुळें तो माझा जन्माचा ऋणी होऊन बसला आहे. पशूसुद्धां त्यांच्यावर केलेले उपकार जाणून आपली कृतज्ञता प्रकट करितात, धन्याकरितां कुत्रासुद्धां आपला प्राण देतो, मग तो तर मनुष्यच आहे. अशा भयंकर काळोख्यारात्रीं एखाद्या निशाचराप्रमाणें ज्या अर्थीं तूं या ठिकाणीं आला आहेस त्या अर्थीं तूं खून करणारा मारेकरी मांग असला पाहिजेस. ही माझी आई येथें जखमी होऊन बेहोष पडली आहे. ह्या अबलेवर नीचा, ज्या हातानें प्रहार केलास तो तुझा हात हत्यारासुद्धां मी सफा उडवून देईन. अबलेवर हत्यार चालविणारा खरोखर नामर्दच असला पाहिजे. तुझ्या हातांत हत्यार मी बिनहत्यारी. तुला माझी मर्दुमकी पहावयाची असेल तर माझा दंड सोड, म्हणजे तला दाखवितों या मर्दाचा तडाका. बस्स तं मारेकरी आहेस खास. एखाद्या पाजी हलकट मनुष्यानें तुला पाठविला आहे.

बनबीरः-हा बनबीर पाजी आणखी तं गाजी. तुझा बाप संगराणा हाच काय तो तख्ताचा अस्सल वारस आणखी माझा बाप तुझ्या बापाच्या पाठीवर पाय देऊन आलेला प्रत्यक्ष त्याचा धाकटा भाऊ, कम अस्सल वारस होय ! संगराण्याचे मागें तुझा भाऊ विक्रमाजित आणखी तूं स्वतः हे औरस पुत्र गादीचे खरे मालक. आणखी मी दासीपुत्र म्हणून मुळीं मला वारसदारीचा हक्कच नाहीं. माझा हक्कच उडाला. हा तफावत काय म्हणून ? या तफावतीला कायमची फारकत देण्याकरितांच मी तुला ठार मारणार. तुझ्या हातांत हत्यार देऊन मग तुझ्या बरोबर द्वंद्व युद्ध करावें ही गोष्ट मला मळींच पसंत नाहीं. या वेळीं तूं माझ्या काबूंत पक्का सांपडला आहेस.

उदयसिंगः-संग्रामसिंहा, संग्रामसिंहा जागा हो, जागा हो हा बटकीचा कारटा कम अस्सल बनबीर मला ठार मारीत आहे. आण माझी तलवार, म्हणजे, याचे तुकडे तुकडे करतों. ह्या नीचानें

आपल्या आईला घायाळ केलें आहे. ( संग्रामसिंह गर्जना करून धांवत येऊन बनवीराचे कमरेला मिठी मारतो. )

**संग्राम०**:–उदयसिंगमहाराज, तलवार सांपडत नाहीं हो. आईनें घेतली असावी. माझी समशेरसुद्धां मीं निजतांना तिचेच हवालीं केली होती. पण तुम्ही भिऊं नका. मी तुम्हास मरूं देणार नाहीं. आपण दोघे विगर हत्यार याला खेंचीत असेंच दरवाजाबाहेर हांकून देऊं. ( तो आवरत नाहीं, असें पाहून गर्हिवरून ) बनवीरा, तुला पाहिजे तर उदेयासिंगाबद्दल मला ठार मार. अरे हा प्रत्यक्ष महाराणा संग याचा मुलगा–एवढाच खरा राजवंश. सूर्यवंशांत–या श्रीरामचंद्राच्या पवित्र वंशांत जिवंत राहिला आहे. त्याचा कंठनाळ तूं या तलवारीनें चिरूं नकोस. अशा घोर पातकांबद्दल तुला घोर यमयातना भोगाव्या लागतील. सोड माझ्या भावाला तुझ्या पायां पडतों. ही माजी मान मी तुझ्यापुढें करतों. प्रथम माझा बळी तूं आपल्या क्रोधानळाला घे. माझ्याच्यानें उदयसिंग महाराजांचें रक्त जमिनीवर सिंचन झालेलें पाहवणार नाहीं. मला ठार मार, पण उदयसिंग महाराजांला सोडून दे.

**बनवीर**:–बस्स, तें कांहीं नाहीं. अगोदर उदयसिंगाला ठार करीन. आजच्या रात्रीं उदयासिंगाला ठार करण्याची मीं प्रतिज्ञाच केलेली आहे.

**उदयसिंग**:–मी अस्सल रजपूत खरा क्षत्रिय आहें. मरणाला मी तृणप्राय समजतों. मी मरण्याला एका पायावर तयार आहें. पण मला माझ्या आईच्या पायावर–या पन्नारत्नाच्या चरणकमलावर मस्तक टेकूं दे. ( दुःखानें ) जन्म देणाऱ्या प्रत्यक्ष करणदेवी मातेपेक्षां हिचे मजवर अनंत उपकार आहेत. त्यांची फेड माझ्या हातून झाली नाहीं, याबद्दल मला अत्यंत वाईट वाटत आहे. एवढें तरी माझें मागणें तूं कबूल कर. आई आई, हा तुझा उदयसिंग तुझी सेवाचाकरी न करितां या बनवीराच्या तलवारीला विगरहत्य ी बळी पडला. एकवार डोळे उघडून मजकडे पहा.

बनवीरः–तिचा निकाल लागला. या जन्मीं तुला आतां आई दिसत नाहीं. तूंही तिच्या भेटीला चालता हो. तुला जिवंत ठेवून, मी आपल्या वस्त्रांत अग्नि गुंडाळून घेतल्याप्रमाणें होणार आहे. आतां तर तुला जिवंत सोडतां कामासच नये.

उदयसिंगः–माझे बाबा–आतां कशाचे माझे बाबा! घरीं आल्यावर या उदयसिंगाचे राई एवढाले तुकडे झालेले पाहून त्यांना दुःखाचा उमाळा येईल. त्यांचें सांत्वन संग्रामसिंहा तूंच क कारण त्यांचे चरण मला अभाग्याला–या त्यांच्या अत्यंत लाडक्या उदयसिंगाला पुनः दिसणार नाहींत. त्यांना माझा अखेरचा प्रणिपात सांगून असें सांग कीं, तुमचें नामस्मरण करीत करीत तुमच्या दर्शनसुखाची आशा धरून मीं आपला देह धारातीर्थीं ठेवला. बनवीरा–कुलाधमा, ही मीं आपली छाती तुझ्यापुढें केलेली आहे. खुपस ती तलवार या छातींत. घे अक्षय्य नरकाचें साधन करून. ( बनवीर तसें करणार तोंच ब्रह्मानंद, महाबलसिंह व कांहीं लष्करी लोक प्रवेश करितात. )

महाबलः–( वरचेवर तलवार हातची हिसकावून घेऊन फेंकून देतो व त्यास खालीं पाडतो. ) अरे लांडग्याच्या कारट्या, मी घरांत नाहीं असें पाहून तूं या गरीब कोंकरावर हल्ला केलास काय? वाघिणीच्या कमरेंत तलवारीनें घाव करून ज्यानें तुला प्राणदान दिलें त्याच्याच नरडीचा घोट घ्यावयाला धांवलास! तस्मात् तूं भस्मासूरच आहेस. भीमसेन घरांत नाहीं असें पाहून जयद्रथानें सती द्रौपदीवर घाला घालून तिला पळवून नेण्याचा बेत केला, अथवा करुणासिंधु श्रीरामचंद्र गुंफेंत नाहीं असें पाहून दुष्ट दशकंठानें गोसावड्याच्या वेषानें आदिजननी सीतादेवी चोरून नेली. तसा हा महाबल घरांत नाहीं असें पाहून माझ्या बायकामुलांची कत्तल करण्याचा, त्यांचे खून आपल्या हातानें पाडण्याचा मनसुबा केला होतास, पण तो दयामृतघन श्रीराम कांहीं लांब नाहीं. त्यानें मला सत्वर घरीं येण्याची बुद्धि दिली. राजपुत्रावर हत्यार उचलण्यास ज्या अर्थीं तुझा हात धांवला त्या अर्थीं तूं अधमाधम प्रत्यक्ष कसाब

आहेस. याला तख्तनशीन करून तूं बद्रीकेदाराकडे घोर तपाचरण करण्याला जाणार होतास तो तुझा बेत जागच्याजागीं गारठून गेला. ( गहिंवरून उदयसिंगास पोटाशीं धरून ) लहानपणीं ज्या अर्भकानें माझ्या मांडीवर बसून माझ्या कंठास घट्ट मिठी मारावी, आपलीं कोंवळीं हाताचीं बोटें माझ्या मुखांत घालावीं, आपल्या मुखांतील साखरेचा खडा माझ्या मुखांत घालावा त्या या सुकुमार राजबिंड्याची तूं आपल्या क्रोधानळाला आहुति देऊन विझविणार होतास ! माझी सहचारिणी पन्ना—असिलतेच्या तिखट धारेप्रमाणें जिनें राजनिष्ठेचें व्रत पाळलें, त्या बिचारीला विनाकारण घायाळ करण्याची तुला शरम कशी वाटली नाहीं ? या सर्व भयंकर पातकांबद्दल, या घोर अपराधाबद्दल तुला आतांचे आतां या माझ्या शस्त्रानें कृतांताच्या मुखांत बळी देतों. ( पन्ना उठून बसते ).

पन्नाः—थांबा, थांबा, इतक्या सोप्या रीतीनें त्याला मारूं नका. राजपुत्रावर ज्या हातानें तो शस्त्र चालविणार होता, तो हात अगोदर कलम करा. ज्या जिभेनें त्यानें राजपुत्राला गालिप्रदान केलें ती जिव्हा अगोदर उपटून काढा. नंतर याला ठार करा. नाहींतर आणा ती समशेर म्हणजे मी आपल्या हातांनींच तें काम अगोदर करतें. ( उदयसिंगाला पोटाशीं धरून गहिंवरून ) बाळा उदयसिंगा, तुझें दैव थोर म्हणूनच तूं या समयीं वांचलास. मला प्रबळ मूर्च्छा आली. माझ्या हातून तुला मदत कांहींच झाली नाहीं; याबद्दल मला अत्यंत वाईट वाटतें आहे. माझ्या बाळाला हे कितीतरी श्रम पडत आहेत ! मुख किती कोमेजून गेलें आहे ! मेल्यानें झोंपेंतून फरफर ओढून आणला.

उदयसिंगः—आई, बोलण्यानें तुला फार श्रम होतात. तूं स्वस्थ अस. आपल्याला हा आनंदाचा दिवस गुरुमहाराजांच्या कृपाप्रसादानें प्राप्त झाला आहे. या समयीं आपल्यास त्यांचें दर्शन झालें. ते आज्ञा करतील तसें आपण करावें. त्यांनीं याला देहांतप्रायश्चित्त देण्यास सांगितल्यास तसें करा, नाहींतर सोडून द्या. ( निहालकुवर प्रवेश करते. )

निहालः—महाबलसिंह, तुह्मांला मी आपल्या भावाप्रमाणें समजतें आणखी पन्नाला मीं आपली बहीण मानिलें आहे. जें झालें तें केवळ मद्याच्या अमलांत झालें हो. निच्या कैफांत आज दारुण ह्यांच्या नांवाला काळोखी आणणारें—अघोर कृत्य—म्हणजे प्रत्यक्ष महाराज उदयसिंग यांचा वध होणार होता, पण देवान खैर केली. असा नीच हेतु त्यांचा मुळींच नव्हता अशी मी तुमची अनेकवेळां शहानिशा करीन. पन्ना, माझ्या तोंडांतून तुला कमजास्त शब्द गेला असेल, त्याची क्षमा करून मला चुडेदान दे. माझ्या डोळ्यांदेखत माझ्या सौभाग्यमंदिरावर निखारे ओतं नको.

बनबीरः—महाबलसिंहा, मी भगवती महाकालीचा प्रसाद घेत असतों, हें तुह्मां सर्वांस महशूर आहे. त्या प्रसादाच्या धुंदींत माझ्या हातून फारच मोठा प्रमाद घडून आल्याबद्दल मला लाचारी वाटते आहे. आज माझ्या हातून पवित्र संगराण्याचा वंशच्छेद होण्याचा प्रसंग आला होता, पण संगराण्याच्या पुण्यप्रतापानें तसें घडून आलें नाही. ह्या माझ्या घोर पातकाबद्दल मी अनेक सत्कृत्यें करून तुह्मां सर्वांचें प्रेम पुनः संपादन करीन. या समयीं मला श्रीब्रह्मानंदस्वामींचें दर्शन झालें ही फारच आनंदाची गोष्ट झाली. त्यांचे दर्शनाचा असा प्रभाव आहे कीं, तो दुष्ट वासनेचें बीज जागच्या जागीं जाळून टाकतो. परमार्थाची आवड उत्पन्न करितो. संसार मृगजलाप्रमाणें आहे असें दर्शित करतो व राजतृष्णा व्यर्थ आहे, असें गृहीत धरावयास लावता, निदान माझ्या मनाची तरी यांच्या दर्शनानें अशी भावना झाली आहे.

ब्रह्मानंदः—बाळा महाबलसिंहा, पन्नादेवी, तुमची स्वामिभक्ति आज त्या त्रैलोक्यनिवासी रघुकलतिलकानें कसोटीला लावून पाहिली. तह्मीं आपल्या जन्माचें सार्थक केलेंत. या समयीं या बनबीरानें हें पापाचरण मदिरादेवीच्या धुंदींत केलें आहे, त्याचा त्याला आतां अत्यंत पश्चात्ताप वाटत आहे, असें तो म्हणतो. याचा वध करून निहालकवरला वैधव्यपंकांत लोटूं नका. त्यांतून ती गर्भवती आहे. याही गोष्टी आपण लक्षांत घेतल्या पाहिजेत. ह्या चितोड नगरीचें

पवित्र सिंहासन आपल्या अधिष्ठानानें यानें भ्रष्ट केलें आहे, याबद्दल परमेश्वर याला शिक्षा करील. आपल्याकडे कांहीं नाहीं. यासमयीं याजवर रहीमनजर करावी असें मला वाटतें. बनबीरा, या प्रसंगीं तुला या राजपुत्रानें दुसऱ्यांदा जीवदान केलें आहे. आतां तरी याच्याशीं हरामखोरी करूं नकोस. असो. झालें तें झालें. एकमेकांचीं अंतःकरणें एकमेकांला साक्षीभूत असतात. आह्मांला काय करायचें आहे ! तुह्मीं सर्वांनीं आतां विश्रांति घ्यावी, आह्मी आपल्या मठीकडे जातों. ( सर्व पायां पडतात. पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**–अरवली डोंगराचा पायथा.

(लालसिंग व त्याचे साथीदार तलवारी व तीरकमानी घेऊन प्रवेश करितात.)

**लालसिंगः**–जवानसिंग, सरदारसिंग, गुलाबसिंग, दयाळसिंग, माझ्या सर्व दोस्तांनो, हा पैजेचा विडा मीं तुमच्या हिमायतीवर उचलला आहे. या कामांत आपल्यास फत्ते झाली तर प्रत्येकाला लाख लाख रुपयांची जहागिरी आदा होईल असा बनबीरमहाराजांनीं कौल करून दिला आहे. या राजस्थानांत आपण इभ्रतदार सरदार बनून आपल्या वाड्यांच्या गच्च्यांवर रोज नगारखाने झडतील. घोड्यावर जीन चढवून रोज आपण फेरफटके करूं. सरकार आपले मुजरे घेतील. अंगांत बख्त्यारें चढवून, कंबरबस्ता करून, हत्यारबंद होऊन, बल्लमवाले शिकारी बरोबर घेऊन आपण या अरवली पहाडांत हमेष पटाईत वाघांच्या शिकारीला जाऊं. पण या सर्व गोष्टी तुमच्या मर्दुमकीवर अवलंबून आहेत.

**जवानसिंगः**–आह्मी रजपूत वीरांचे बच्चे, आमचे दोस्त सरदारसिंग, गुलाबसिंग, दयाळसिंग–हंबीर रणशूर–जवामर्दीची शर्थ करणारे असे आहेत. आपण पांचपन्नासाला भारी आहोंत. तिथें एकट्या महाबलसिंहाची तमा काय ! जिवंत धरा असा आपल्याला

हुकूम आहे. पण झटापटींत मारला गेला तरी हरकत नाहीं असेंही सरकारनीं आपल्याला सांगितलें आहे. आपण आपल्या गलोलाची दोरी कानापर्यंत खेंचून नेमका शाबूत तीर मारूं. पांच तीर एकदम मारावेत. एक जर वर्मीं लागला तरी काम झालें.

सरदारसिंगः–पांचजणांनीं पांच ठिकाणीं दबा धरून बसावें. गलोलांतून तीर सूं सूं करीत वर्मीं लागतांच सावजांवर जसा पंचानन झडप घालून, झडपेसरसा त्याला लोळवितो, तसें आपण करूं. मी म्हणतों, महाबल मोठा रणगाजी रणशूर असेल, पण तो आमच्यापुढें काय करणार ! त्यांतून रात्र अंधेरी, चोरवाटा आमच्या लोकांनीं रोंखलेल्या, मोठा झुंजार असला तरी करणार काय ?

गुलाबसिंगः–समजा, हा आपला वार फसला, तोफेनें रंजूक खाली, तरी माझ्याजवळ दुसरी शक्कल तयार आहे. ती अगदीं रामबाण आहे. तिचा उपयोग मी ऐन मोक्यावर करणार आहें. त्या माझ्या तर्कीचीनें तुमच्या तिरंदाजीपेक्षां हजारपटीनें जादा कारवाई होणार आहे.

दयाळसिंगः–आह्मांला नको तुझी तर्कीब. आमची ही पहिलीच युक्ति फत्तेमंदी करून देणार आहे. तीर कमानी घेऊन तुह्मी त्याचा रस्ता रोंखून बसा. मी शीळ घालीन त्यासरसा तुह्मी प्रथम तीर सोडा. लागलींच दौडत या. घायाळ घुमत पडलेला असेल त्याच्यावर घाव करा. बस खलास. गिरफदार करूं, नाहीं तर ठार करूं. सरकाराला जाऊन मुजरा करूं. आपआपल्या जहागिरीबद्दल सनदा करून घ्या.

लालसिंगः–मीं कितीएक दिवस जाग्रत्यावर राहून पाहून ठेविलें आहे कीं, महाबल आणखी पन्ना नेहमीं ह्याच चोररस्त्यानें ब्रह्मानंदस्वामीकडे जातात. आज जर दोघेच्यादोघे आपल्या हातीं जिवंत सांपडले तर केवढी बहार होणार आहे ! ( वनवीर वेषांतर करून चोरून प्रवेश करितो. )

बनबीरः–( एकीकडे ) केवढी बहार होणार आहे पण ! माझ्या आनंदाला पारावार राहणार नाहीं. पण इतके जोरावर माझें तखूदीर आहे कोठें ? हा चवथा मोका. प्रत्येक वेळीं मला हार खावी लागत आहे. ह्या प्रसंगीं मात्र हार घ्यावयाचीच नाहीं. मरेन पण महाबलाचा निकाल बरायखुद् लावीन. एवढ्याचकरितां मी चोरून यांच्या मागोमाग आलों आहें. हुकुमाची अंमलबजावणी कशी करितात, हें पहावयास सांपडेल. आणखी यांनीं जर कच खाल्ली तर आपण यांना दुमाला करावा. परभारें यांचेकडून मारला गेला तर मी आपला शाबुद् मोकळा. हेच मुडदा गाडून टाकतील. दर्याफ्तीचे वेळीं तंतरमंतर करून यांना सोडवून दिलें म्हणजे झालें. कसा मेला आणखी कोणीं मारला याचा तपास लावून देईल त्याला अमुक मोहोरा बक्षीस म्हणून आणखी इजहार लावण्यास तयार ! मी येथें आल्याचें यांना समजतां उपयोगी नाहीं. नाहींतर यांच्या देखत मीही यांच्यांत शरीक आहें असें महाबलाला समजून येईल. एकच गोंधळ होऊन जाईल. बस्. आज हा मारला तरी गेला पाहिजे, नाहींतर गिरफ्दार तरी झाला पाहिजे. गिरफ्दार झाला तर याला वाड्याच्या तळघरांत तहाहयात अंधार कोठडींत टाकून देतों. पुनः म्हणून सूर्यदर्शन नाहीं. हातांत जंजीर अडकवून द्यावी. म्हणजे जवळ जाऊन मीं त्याला वाटेल तसें गालिप्रदान केलें तरी तो माझें काय करणार ? हां. ( इकडे तिकडे पाहून ) तो आल्याची चाहूल लागते. आपण येथें एका टेंकाडाच्या आड छपून बसावें. ( सर्वजण छपून बसतात. महाबल प्रवेश करितो. )

महाबलः–चितोड नगरीची स्थापना करणारा बाप्पा रावळ, ठाणेश्वरच्या लढाईला देह अर्पण करणारा राणा समरसिंह, दिल्लीच्या सुलतानांचा पाडाव करणारा राणा हमीर, पोटच्या मुलाप्रमाणें प्रजाजनांचें पालन करणारा राणा सुजनसिंह–बत्तीस किल्ले बांधणारा–महाकुबल कुंभेरीचा किल्ला बांधणारा राणाकुंभ, आणखी महाराणासंग–राजपुत्राचा प्रत्यक्ष बाप–या सर्वांचा आशीर्वाद जर या उदयसिंगाला असेल, तर या बनबीराच्या तडाक्यांतून त्याचे

प्राण खास वांचतील. रक्तपात, देहांतशासन, हद्दपारी, कडेलोट आणखी तोफेच्या तोंडीं अस्मान उडविणें ह्यांचा ज्याच्या अमदानींत धुमाकूळ माजून राहिला आहे, त्याच्या वाऱ्यालासुद्धां उभें राहणें म्हणजे आपण होऊन प्रचंड पाषाण गळ्यांत बांधून अथाक महासागरांत तरून जाण्याप्रमाणें आहे. ( गाहिं-वरून ) ब्रह्मानंदस्वामींचें आजचें शेवटचें दर्शन. मला अभाग्याला त्यांची सेवा कांहींच घडून आली नाहीं. ज्यांच्या आशीर्वादानें राजपुत्राचा हा काळपावेतों सांभाळ झाला, त्यांच्याच सल्ल्यानें त्या राजकुमारासमवेत उद्यां वाट फुटेल तिकडे पन्ना आणखी संग्राम ह्या उभयतांना बरोबर घेऊन निघून जातों. माझी मातृभूमि माझी चितोडनगरी–माझी प्रिय वृद्ध माता–पण जिनें कठोर अंतःकरणानें परक्या पोराप्रमाणें माझा त्याग केला, तिला माझा शेवटचाच प्रणिपात. मातेनें आपल्या लहान बालकांवर कोप केला, अथवा महासागरानें जलचरांचा त्याग केला, तर त्यांनीं आश्रयाकरितां कोणापुढें तोंड वासावें ! असो, मर्जी भगवंताची, स्वामींचा आश्रम अगदीं जवळ येत चालला. सर्व दुःख मनांतल्या मनांत गिळून जातों. ( शीळ वाजते. लालसिंग व त्याचे साथीदार धांवत येतात. त्यांची व महाबलसिंहाची झटापट होते. महाबल पांचांनाही जखमी करतो. त्यांना तो आवरत नाहीं असें पाहून बनवीर हळूच महाबलाचे मागून येतो व त्याचे गळ्यासभोंवतीं दोरीचा फांस टाकतो. महाबल खालीं पडतो. ) माझ्या गळ्याला लावलेला फांस काढ. मला मोकळा कर. प्रत्येकजणाचा मी नक्षा उतरतों. एखाद्या नामर्दाप्रमाणें छपून असा घाला घालणाराला धिक्कार असो. चालीव, कट्यार चालीव. खुपस या छातींत म्हणजे तूं चालविलेले दारुण अनाचार–तुझ्या हातून घडून येणारी घोर राजहत्या–पहाण्याचा प्रसंग मला येणार नाहीं. ह्यांतून मी वांचेन असें मला वाटत नाहीं. माझी शेवटची आशा स्वामींच्या पायांचें दर्शन. त्यांत मला अंतर पडणार. दुसरी आशा माझी स्वामिभक्ति–माझी राजनिष्ठा–तिची कसोटी देवानें पूर्णपणें पाहिली नाहीं. बाळा उदयसिंगा, आतां तुझें कसें होणार ! या कृष्णसर्पाच्या वेढ्यांतून तुला आतां कोण सोडवील !

या पेटलेल्या होमकुंडांतून तुला आतां कोण बाहेर काढील? ( लाल-सिंग व त्याचे साथीदार महाबलास बांधतात. बनबीर महाबलाच्या छातींत खंजीर खुपसणार तोंच त्याचा हात ब्रह्मानंदस्वामी वरचेवर धरितो. ) महाराज, मी आपल्यास वंदन करितों. माझें पूर्वजन्मींचें पुण्य फळाला आलें. अंतकाळीं मला आपल्या चरणांचें दर्शन झालें. येतों मी आतां. या बालकावर दया असूं द्या. स्वामिभक्तीची पूर्तता माझ्या हातून झाली नाहीं याबद्दल मला अत्यंत वाईट वाटतें. हा गुपित बेजार मार माझ्यानें सहन होत नाहीं. माझें नरडें रस्सीनें करकचून आवळल्यामुळें माझे डोळे आणखी जिभेचा कांदा आतां बाहेर पडतात कीं काय असें मला वाटत आहे.

**बनबीरः**–सोडा माझा हात. हा पेषकब्ज याच्या छातींत मीं स्वतः भोंसकणार. माझा दुष्मान जो उदयसिंग त्याला यानें पाठीशीं घालून अनेक वेळां यानें माझा घात केला आहे. हा ठार झाल्याशिवाय उदयसिंग ठार होणार नाहीं. त्याला ठार करण्याची आज रोजीं मीं भयंकर शपथ घेतली आहे. घोर प्रतिज्ञा केली आहे. तींतून मला मुक्त झालें पाहिजे. महाराज, तुम्हीं संन्यासवृत्ति धारण केली आहे. तुम्हीं काषायवस्त्रें परिधान केलीं आहेत. या आमच्या झटापटींत गर्द झालां तर आमच्या बोडक्यावर पापाचा घडा फुटणार आहे. ब्रह्महत्येचें पातक मग आम्हीं कुठें फेडावें ?

**ब्रह्मानंदः**–बनबीरा, तुला पापपुण्याचा भेदाभेद समजतो का ? मी समजत होतों कीं, जनावरांना जसें पापपुण्य समजत नाहीं, तसें तुलाही समजत नाहीं. ह्या झटापटींत तुझ्या हातून अगर तुझ्या मारेकऱ्यांच्या हातून मी मारला गेलों तर तुझ्या टाळक्यावर पापाचें ओझें होणार आहे, असें तूं म्हणतोस, पण या महाबलसिंहावर गुपित घाला घालून त्याचे हात, पाय, गळा जखडून आंवळून त्याच्या छातींत चिचवा खुपसणें, हें कांहीं तुझ्या मतें पाप नाहीं. याला ठार करून नंतर तूं राजपुत्र उदयसिंग याला ठार करणार. ही राजहत्या ब्रह्महत्येपेक्षां शंभरपटीनें जास्त पापमूलक असून ही कल्पना तुझ्या मनाला शिवतसुद्धां नाहीं. धिक्कार असो अशा पाषाणहृदयी मनुष्याला !

**वनवीरः**—महाराज, याचा परिणाम चांगला होणार नाहीं. हा वेळपावेतों मीं मर्यादा ठेविली. पण आतां पहा काय करितों तें ! लालसिंग, जवानसिंग, सरदारसिंग, गुलाबसिंग, दयाळसिंग, पकडा या संन्याशाला. बांधा याच्या मुसक्या. पहातां काय ? दोघांनाही येथल्या येथें गारत करून यांचे मुडदे जमिनींत गाडून टाका. जर तुला आपल्या जिवाची तमा असेल, तर माझा हात सोड. आणखी त्या अरवली डोंगराच्या काळ्याकुट्ट गुहेंत तोंड खुपसून बैस. ( लालसिंग व त्याचे साथीदार हुकूम मान्य करीत नाहींत असें पाहून ) माझा हुकूम तोडतां ? अंमलबजावणी करीत नाहीं ? याबद्दल तुह्मांला जबर सजा दिली जाईल. दूरवर विचार करा.

**लालसिंगः**—महाराज, ब्रह्मानंदस्वामींच्या अंगावर आह्मी हात टाकणार नाहीं ! आह्मांला ते परमपूज्य वाटतात. संन्याशाची हत्या ! त्याची हत्या करण्याचें भय जसें आपल्यास वाटत आहे, त्याच्यापेक्षां शंभरपटीनें जास्त आह्मांला वाटत आहे. हें ब्रह्महत्येचें दारुण पातक आह्मी कसें फेडणार ? हा आपला हुकूम आह्मीं तोडला याची आह्मांला माफी असावी.

**वनवीरः**—सोडा माझा हात.

**ब्रह्मानंदः**—ज्यानें तुझा प्राण वांचविला त्याचा जीव घेण्याला तुझा हात वहातो तरी कसा ? तस्मात् तूं मोठा कृतघ्न आहेस. याबद्दल तुझ्या मनाला शरम वाटली पाहिजे. ह्याचा प्राण घेतलास तर तुझाही प्राण या घटकेंत जाईल. तूं गतप्राण होऊन जमिनीवर पडशील, हा माझा दारुण शाप आहे. माझा शाप खोटा होणार नाहीं. पाहिजे असल्यास अजमावून बघ. आतां शापाचा उच्चार करितों. जयजय वीरादिवीरा महावीरा, दुष्टदर्पदर्पी, खलबलसंहारका, असुरदलविध्वंसका, कौरवदलसंहारका, भगवंता, हा दुष्ट नीच, दासीपुत्र, रांडेचा कारटा, आतांच्या आतां या भूमीवर—मीं जर आजपर्यंत सत्याचरणानें, ब्रह्मचर्यव्रतानें वागून तुझी सद्भावानें भक्ति केली असेल तर—विक्रमाजिताचा खून ( वनवीरास पिशाच्च दिसतें. )

**बनबीरः**–( घाबरून ) आला ! आला ! समंध आला ! हा पहा विक्रमाजित ! भयंकर उग्रस्वरूप धारण करून मला भीति दाखवीत आहे. सोडा माझा हात. मी तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतों कीं, याला मी ठार मारीत नाहीं. याचा प्राण मी घेणार नाहीं. पण हें पिशाच्च माझ्या डोळ्यांसमोर नको. ह्याला पाहिलें कीं माझ्या छातींत, माझ्या काळजांत धडकी भरते. माझी जीभ कोरडी पडते. तो पहा, तो मजकडे हळू हळू पावलें टाकीत येत आहे. त्याचे नेत्र खदिरांगाराप्रमाणें लालबुंद दिसत आहेत. त्याचे केंस मस्तकावर ताठ उभे राहिले आहेत. चार चार बोटें बाहेर आलेले दांत तो करकरा खात आहे. त्याच्याकडे मला बघवत नाहीं. हा सारखा माझ्या जपणीला लागला आहे. काय करूं ? तो पहा गुप्त झाला !

**ब्रह्मानंदः**–मनांतला दुष्ट हेतु सोड म्हणजे हा समंध तुला सोडील, नाहींतर तुझीं पाळेंमुळें खणून काढील. हा उदयसिंगाचा भाऊ, ज्याचा तूं गुप्त घाला घालून घात घेतलास, तो रात्रीचा तुझ्या उरावर बसेल तुला सळोकापळो करील. ह्यावेळीं तुला मी शाप देत नाहीं. पण पुनः तुला बजावतों कीं, रातबेरात तूं उदयसिंगावर छापा घातलास, कीं हा समंध तुझ्यापुढें दत्त उभा आहे म्हणून समज. आतांचेआतां याला खुला कर.

**बनबीरः**–लालसिंग, याला मोकळा करा. यावेळीं महाराजांची आज्ञा मला शिरसामान्य आहे. तूं मला एक वेळ जीवदान दिलेंस. मीं तुला जीवदान दिलें. तूं माझा एहसानूमंद नाहींस. मी तुझा एहसानूमंद नाहीं. आपण दोघे दुस्मान होतों. आतां आपण दोस्त झालों. दोस्तानें दोस्ताला मदत करावी. तूं मागशील तें मी तुला आदा करितों. जामदारखाना, सराफखाना, शिकारखाना तोफखाना, आणखी पहाड्याच्या जरवा, सर्व तुझ्या सुपूर्द करतों. तुला बक्षिगिरीची जागा बहाल करतों. सरनौबद करतों. या ब्रह्मानंदस्वामीचे रूबरू तूं मला वचन दे कीं, जसा तूं उदय-

सिंगाचा कैवार घेतोस, त्याच्याकरितां आकाशपाताळ एक करितोस, त्याप्रमाणें माझ्याकरितां--

**महाबल**:-अरे जा. तो अस्सल राजपुत्र! संगराण्याचा-गजपतीचा प्रत्यक्ष छावा. तो राजहंस तूं कावळा, तो हिरा तूं गारगोटी, तो कस्तूरी तूं माती, त्याची बरोबरी कशाला करितोस? तूं दासीपुत्र, तुझी तरफदारी तुझ्यासारखे कमअस्सल बटकींचे बेटे असतील, तेच करतील. उदयसिंग राजा त्याची सेवा सरबराई म्हणजे अमृताचा पेला. ज्याला अमृताची चव लागली, तो कांजी पिणार आहे का? यांत कायतें समज. स्वामिकार्यीं हा देह पतन पावला तर मी आपल्यास महा भाग्यवान् समजेन. माझा प्रत्येक अवयव कायावाचामनेंकरून उदयसिंगाकरितां झटेल. ध्यानीं मनीं स्वप्नीं मला उदयसिंग आणखी राजनिष्ठा दिसत आहे. तूं, मला जहागिरीची, फौज बक्षीची लालूच कशाला दाखवितोस? इंद्राचें अमरत्वसुद्धां मला उदयसिंगापुढें तस्सदूक आहे. त्याला मी काडीची किंमत देत नाहीं. राजनिष्ठेला पराङ्मुख होणार? परीस टाकून खापरी पदरांत बांधणार? थूः तुझ्या तोंडावर. (महाबल व ब्रह्मानंद जातात.)

**बनबीर**:-या संन्याशानें ऐनवेळीं घात केला. कांहीं हरकत नाहीं. तुम्ही आतांचे आतां एक दस्ता म्हणजे बारार्शे रिसालदार ह्याच्या वाड्याला गराडा घालावयाला पाठवा. स्वतः जाऊन राजपुत्राचा समाचार घेतों. महाबलसिंहाची आणखी त्याची मुलाखत न झाली पाहिजे. याची गुरमाई जिरवून टाकतों. कम अस्सल कसा असतो, तें याला दाखवितों. कुलपी गोळ्यांच्या गरनाळा, सुतारनाळा, जंबुराख, याच्या वाड्यावर चालवितों. वाड्याचा सगान कोट जमीनदोस्त करतों. कम अस्सल! लालसिंग, सरदारसिंग, गुलाबसिंग, दयाळसिंग, तुम्ही आणखी शंभर पट्ट्याचे सळ फेंकणारे, बोथाटीबारदार, विटे बारदार. ढालाईत बरोबर घेऊन या अरवली डोंगराचे पायथ्याशीं, दबा धरून बसा. संन्याशाच्या झोंपडींतून महाबल बाहेर पडला, कीं गिरफदार करा. राजवाड्याच्या तळघरांत फेंकून द्या. आज सारेरात्र धुमाकूळ माजवून यांचा नायनाट करीन तरच नांवाचा बनबीर. (सर्व जातात.)

---

## प्रवेश ४ था.

स्थळ–महाबलसिंहाचा वाडा.

( उदयसिंग व संग्रामसिंह प्रवेश करितात. )

**संग्रामसिंहः**–महाराज, माझा एक पायांपाशीं मारुजा आहे.

**उदयसिंगः**–मला हे दरबारी शब्द नको आहेत. तुझें माझें नातें भावाभावाचें. तूं माझ्या पाठचा भाऊ. आपलें नातें बरोबरीचें आहे. ही गोष्ट तुला मान्य आहे कीं नाहीं ?

**संग्राम०:**–महाराज, मला पामराला आपण इतकें थोरपण देणें मुनासीब नाहीं. पाहिजेल तर मारुजा हा मोठा शब्द आपल्याबरोबर बोलत असतां उपयोगांत आणणार नाहीं. मग तर झालें ना ? दिवस मोठे विपरीत आले आहेत हें आपण जाणतच आहां.

**उदयसिंगः**–हें कांहीं नवीन नाहीं. माझ्या जन्मापासून मला एकेक दिवस म्हणजे काळाच्या जबड्यांतून ओढून काढल्याप्रमाणें जात आहे. या दुर्दैवाच्या फेऱ्यांत मला आणखी माझ्या संगतीनें तुम्हांला आणखी किती दिवस गोते खावे लागणार समजत नाहीं.

**संग्राम०:**–चढउतार प्रत्येक प्राणिमात्राला असतो, असें बाबा आपल्यास नेहमीं सांगत असतात. आपणापुढें ते अनेक दृष्टांत मांडतात. हरिश्चंद्र, पांडव, नळराजा यांच्या दुःखकारक कथा ते आपल्यास सांगून आपलें समाधान करितात. तें असो, पण महाराज, आज मला आपण एका बाबतींत संमति दिली पाहिजे. नाहीं म्हणूं नका.

**उदयसिंगः**–मला मोठा अचंबा वाटतो. तूं अगदीं एखाद्या परक्या अनोळखी मनुष्याप्रमाणें बोलत आहेस. आजतागाईत कोणत्याही बाबतींत मीं तुला आपली रजामंदी दिली नाहीं असें मला कांहीं आठवत नाहीं. आपण दोघे एकच आहोंत. माझी सल्ला, माझी रजामंदी सर्व कांहीं तुझ्या मर्जीबाहेर बिलकुल नाहीं.

संग्राम०:-पहा, मग हें भाषण जागच्याजागीं राहील.

उदयसिंग:-अबब ! मला अगदीं पकडींत धरण्याचा तुझा मनसुबा दिसत आहे. काय असेल तें खुल्या दिलानें एकदम बोल. हें माझें शरीर, हे माझे हातपाय, तुमच्या कामीं झिजावेत अशी माझी परमेश्वरापाशीं रात्रंदिवस प्रार्थना आहे. आणखी तुझी खातरजमा किती करूं ?

संग्राम०:-माझें म्हणणें कांहीं विशेष नाहीं. फक्त इतकेंच कीं, आजपासून मी आपल्यास संग्राम म्हणून हांक मारीत जाईन. आणखी आपण मला आपल्या नांवानें हांक मारीत जावें. आपण खलबतखान्यांत बसलों, कीं मी आपला कदीम नौकर, बंदा गुलाम आतां आहें असाच असेन. पण दहा लोकांचे रूबरू दिवसां जरी नाहीं तरी पण रात्रौ नांवाची अदलाबदल, कपड्यांची अदलाबदल, इतकेंच तर काय पण रात्रौ आपलीं बिछाना टाकलेलीं दालनेंसुद्धां बदलावयाचीं. बिछाने, मच्छरदाणी सर्व कांहीं रात्रीं तबदुली करावयाची. यांत माझ्या मनांत बिलकुल कपट नाहीं. हें एक माझें मागणें आहे.

उदयसिंग:-पण हें असें काय म्हणून ? यांत काय अर्थ आहे ? मला समजत नाहीं. असें केल्यानें जर तुला सुख वाटत असेल तर माझी कांहीं मना नाहीं. राजपुत्राची स्थिति एकवार स्वतः अनुभव घेऊन पहावी, त्यांत सुखाचा ठेवा किती भरला आहे तो पहावा, असें जर तुला वाटत असेल तर माझी तयारी आहे. पण आपण आपलीं शरीरें आणखी मनें कशीं बदलणार ?

संग्राम०:-ह्या गोष्टी जर आपल्या अधिकारांतल्या असत्या तर या जगांत केवढी घडामोड आपण घडवून आणली असती ! तें असो. मग काय ? माझें ह्मणणें आपल्याला मान्य आहेना ? ( पन्ना प्रवेश करिते. )

पन्ना:-संग्राम, तुला सांगितल्याप्रमाणें तूं त्यांना विचारलेंस का.

संग्राम०:-होय. पण त्यांचें ह्मणणें, अशी अदलाबदल करून

म्हणून करावयाची ? यांत तुमचा मतलब काय आहे ? आतां तूंच त्य ना विचार.

**पन्नाः**—आपल्या प्राणांचें संरक्षण कसें होईल अशी घोर चिंता आपल्या सर्व प्रजाजनांला प्राप्त झाली आहे. चितोड नगरींत देवस्थानांतन देवांना अभिषेक चालले आहेत. अनुष्ठानें बसलीं आहेत. दानधर्म चालले आहेत. कंस जसा कृष्णाला मारायला टपला होता तसा बनबीर रात्रंदिवस आपल्या पाळतीवर आहे. त्याला सर्वत्र आपण दिसत आहां. पाणी पिण्याचे प्याल्यांतसुद्धां तुमचा चेहरा त्याला दिसतो म्हणतात. माझें म्हणणें तुम्हीं संग्रामाचा पोषाख दिवस जरी नाहीं तरी रात्रौ घालीत जावा. तुमच्या मुसेजरीच्या सुरवारा, रेशमी कापडाचा तुमाना, तुमच्या किनखापी गाद्या, पडगाद्या, तिवाशा, पार बदलून टाकाव्या. दिवसां बाहेर गेलांत तर मस्तकाला शिरस्त्राण, अंगांत बखूत्यार, हातांत बऱ्हाणपुरी बर्ची घेतल्याशिवाय जाऊं नये. संग्रामाच्या बिछान्यावर झोंप घेत जावी. संग्रामानें आपला पोषाख घालावा, जरीचा समला सोडावा, व आपल्या पलंगावर झोंप घ्यावी. असें झाल्यानें रात्रींबेरात्रीं दगाफिसाद होण्याचा संभव कमी आहे. आपला घात होणार नाहीं. त्या माझ्या म्हणण्याला महाराजांनीं संमति दिलीच पाहिजे. ( गर्हिवरून ) महाराज, आतां तग निघत नाहीं, असें दिसूं लागलें तर ही युक्ति अमलांत.—

**उदयसिंगः**—आई, तूं आमची आई ना ? मग तुला दोन लेंकरांत भिन्नभाव काय म्हणून ? तुझी ममता या माझ्या संग्रामापेक्षां मजवर जास्त कां असावी ? या माझ्या पाठच्या सुकुमार आणखी उदार भावंडाला त्या मांगाच्या हवालीं करणार होय ? ( रडत ) आई, तूं इतक्या कठोर मनाची कशी ग झालीस ? अडाणी आणखी मूर्ख पुत्रावर बापाची ममता नसते म्हणतात पण आईचें कोमल अंतःकरण दयामृतानें ओथंबलेलें असल्यानें तिला तो सुद्धां प्रिय असतो. संग्राम अडाणी नाहीं किंवा मूर्खही नाहीं. मग तुला या तुझ्या पोटच्या गोळ्याबद्दल असा

दुजाभाव कां वाटूं लागला ? मी साफ कपडे बदलणार नाहीं. संग्रामाच्या केंसाला कोणीं धक्का लाविला तर आकाशपाताळ एक करीन. त्या हरामखोराच्या नरडीचा घोट घेईन. संग्राम ! संग्राम ! ( धांवत जाऊन गळ्यामिठी मारितो. ) तुझ्याकरितां मी काय नाहीं करणार ? जियाफतीच्या वेळीं जालीम जहरानें भरलेल्या अन्नाचें ताट माझ्यापुढचें भरकन् ओढून माझे प्राण वांचविण्याकरितां तूंचना कस्त करीत होतास ? याची मला कदर नसणें म्हणजे मी जनावरांपेक्षां जनावर आहें. जनावरेंसुद्धां कृतज्ञता प्रकट करितात ! मग मी अधमाधम नव्हे काय ? कोणत्याही गफलतीनें मी आपल्या बदला तुला दुस्मानाच्या तावडींत कधींही देणार नाहीं.

संग्राम०:–महाराज ! तुमचे प्राण वांचविण्याकरितां माझ्या आईनें मला सिंहाच्या जबड्यांत डोकें खुपसण्यास सांगितलें तरी मी आनंदानें तसें करीन. माझे प्राण बळी देऊन तुमचे बचावत असतील तर यापेक्षां परमेश्वरसाक्ष मला या जगांत दुसरें कर्तव्यच नाहीं. माझ्या सर्व आशा पूर्ण झाल्या. मला इंद्रपद प्राप्त झालें असें मी समजेन. राजनिष्ठेचा हा शुभ्र बावटा चितोड नगरीच्या भव्य तटावर कायमचा फडकत राहील. पण अशी हमी कोण घेणार ! ही कपडे बदलण्याची युक्ति मला कोणीं शिकविली नाहीं. परमेश्वरानें माझ्या दिलांत आज अशीच प्रेरणा केली आहे. आईला मीं सांगितलें, तिनें कबूल केलें. आपण मजबद्दल विनाकारण शोक कां करावा ? कोणीं मला मारायला कां काढलें आहे ?

पन्ना:–( एकीकडे ) दोन्हीं माझीं लेंकरें. एकावर माया जास्त कां असावी, असें मला उदयसिंग विचारितो. संग्राम मला नको का आहे ? हे माझे दोन डोळे आहेत. यांत अधिक प्यार कोणता, हें मी कसें सांगणार ? याच्या प्रश्नाला उत्तर काय द्यावें तें मला सुचत नाहीं. ( उघड ) महाराज, तुह्मी दोघे मला सारखेच. एक उजवा हात, एक डावा हात. तुह्मी दोघे माझे पंचप्राण आहांत. असें जरी आहे, तरी तुह्मी राजकुमार आहांत. लाखों रियासतींचे पालनवाले, सूर्यवंशवृक्षाचें शेंडेफळ, चितोड नगरीच्या दौलतीचे–

त्यांव, राजस्थानचा बालभानु आहांत! आमच्यासारखीं हजारों माणसें तुमच्या पासंगाला पुरणार नाहींत. राजपुत्र ह्मणजे प्रत्यक्ष विष्णूचा अवतार, आह्मी त्याची भक्तमंडळी. आह्मीं स्वामिकार्यी देह पतन होईपावेतों राजनिष्ठा दाखविणें, हें आमचें कर्तव्य आहे. ( उभयतां पुत्रांस जवळ घेऊन त्यांचें चुंबन घेते. व अलाबला घेते. ) परमेश्वराजवळ तुमचें आयुष्य निरंतर वाढावें अशी मी सदैव प्रार्थना करितें. हं, आटपा, आतां तुमची झोंपेची वेळ टळून गेली. बदला पोषाख, आणखी निजा जा. मला थोडें काम आहे. ते घरीं आले म्हणजे त्यांना मी सर्व हकीकत सांगून नंतर—

उदयसिंगः—आई, यापेक्षां खुलासेवार सांगेनास ? तुझा मतलब. पोषाखाची फेरबदल केल्यानें माझ्याबद्दला माझा संग्राम गफलतीनें त्यांच्या हातीं गेल्यास माझे प्राण वांचतील. संग्राम मारला जाईल. पण आई, इतका अट्टाहास करून आपला स्वतःचा पुत्र मजकरितां बळी देऊन ( रडत ) तूं आपली स्वामिभक्ति या जगांत प्रजेला वळण घालून देण्याकरितां दाखविणार ! पण मी म्हणतों, बनबीर कांहीं आंधळा नाहीं. शेंकडों लोकांनिशीं फौजचंद तो येथें आला तर त्याला ही भुरळ कशी पडणार ? ह्या तुझ्या युक्तीनें संग्राम विनाकारण कृतांताच्या जबड्यांत पडून, मागाहून माझीही आहुति—

पन्नाः—महाराज, इडापीडा टळो. असें अभद्र भाषण आपण आपल्या मुखावाटें काढूं नये. आपण नेहमीं सत्य स्मरून, सन्मार्गानें वागत जावें. यश देणार प्रभु समर्थ आहे. हं. आटपा जलदी. तुह्मांला कपडे काढण्याला मी मदत करितें.

संग्राम०:—महाराज, आपण विनाकारण धास्ती बाळगीत आहां. पोषाखांत तफावत केल्यानें मृत्यु हमखास टळतो. असें जर असतें तर आजतागाईत हजारों लोकांनीं ह्याच युक्तीचा उपयोग करून ते अजरामर होऊन बसले असते. आईची आणखी माझी, ही एक प्रकारची समजूत आहे, ह्यापेक्षां कांहीं नाहीं. आपण आमचे प्रभु. आपल्याशिवाय आमचें मागणें कोण पुरविणार आहे ! आईचे म्हणण्याला निदान आजच्या दिवस तरी मान द्या.

उदयसिंगः—मला ही तुमची युक्ति मुळींच नापसंत आहे. कांहीं विपरीत प्रसंग घडून आला तर जग मला काय म्हणेल ! संग्रामा, मला तूं नकोसा का झाला आहेस ! तुमच्याकरितां, केवळ तुमच्या हट्टाकरितां, ईश्वरसाक्ष आजच्याच दिवस मी तुमचें म्हणणें मान्य करितों. पण खात्री ठेवा, उद्यां मात्र मी तुमचें म्हणणें साफ मान्य करणार नाहीं. ( कपड्यांची अदलाबदल करितात. )

पन्ना:—महाराज, संग्राम आतां अगदीं तुमच्याप्रमाणें दिसतो. मी येथें येण्यापूर्वी जर तुह्मीं अशी अदलाबदल केली असती तर मला सुद्धां एकदम ओळखतां आला असता कीं नसता, सांगवत नाहीं. इतकें कशाला, सकाळच्या प्रहरीं नवगजीच्या कांचबंदी पटांगणांत तुह्मी दोघे उभे रहा. प्रथम संग्रामाला महाराज, म्हणून हांक मारण्याचें होईल. बरें. जा तुह्मी आतां निजा जा. ( उभयतां नमस्कार करितात, उभयतांना जवळ घेते, त्यांचें चुंबन घेते, हात धरून त्यांना शयनमंदिराकडे पोंचते करिते. ) राजकुमाराची वाणी अमृतापेक्षां गोड ! मन किती उदार ! वयाच्या मानानें पाहिलें तर संग्रामापेक्षां वर्षांभरानें जास्त असेल, पण बुद्धिमत्ता एखाद्या पोक्त माणसाप्रमाणें आहे. मला बाई मोठी धास्ती वाटत होती. म्हटलें, कबूल करितो कीं नाहीं. हो, त्याचें काय घ्या ? नाहीं मी ऐकत म्हटलें म्हणजे झालें. ( पडद्यांत डोकावते. ) माझ्या बाळांना गाढ झोंप लागली. देवा, तूं सप्तपाताळ आणखी एकवीस स्वर्ग भरून उरला आहेस, मुंगीपासून ब्रह्मदेवापावेतों कोणाच्या मनांत काय चाललें आहे हें तूं जाणत आहेस. तुला कृपासिंधु म्हणतात. भक्तजनांचा प्रतिपाळ करणें हें तुझें ब्रीद आहे. तूं अनाथांचा दाता आहेस. आह्मी कायावाचामनेंकरून तुला शरण आलों आहों. माझीं दोन्हीं बाळें खुशाल ठेव. तो मेला बनबीर डाव धरलेल्या कृष्ण सर्पाप्रमाणें राजपुत्राच्यामागें हात धुऊन लागला आहे, त्याला सद्बुद्धि दे. तुझ्या पायांपाशीं या दासीचें हें पदर पसरून मागणें आहे. ( भूमीवर मस्तक ठेवून देवाला नमस्कार करिते. ब्रह्मानंद प्रवेश करितो. )

ब्रह्मानंदः–( एकीकडे ) पन्ना भूमीवर मस्तक ठेवून परमेश्वराची प्रार्थना करण्यांत मग्न झाली आहे असें दिसतें. राजपुत्राचे प्राण वांचविण्याकरितां उभयतां नवराबायको जीवापाड कष्ट करीत आहेत. परमेश्वराच्या घरीं हें कांहींच मंजूर नसेल काय ? ( उघड ) पन्ना, माझें ऐक. जोहारांत पांडवांचें रक्षण ज्यानें केलें, पेटलेल्या वणव्यापासून गोकुलवासिजनांचें ज्यानें रक्षण केलें, अनेक भयंकर संकटांतून ज्यानें प्रेमळ भक्त प्रऱ्हादाचे प्राण वांचविले, तो प्रभु, या उदयसिंग अर्भकाचेही प्राण वांचवील. तूं काळजी करूं नको.

पन्नाः–( पायां पडते. ) महाराज, आपण एकटे कसे ! आपल्या दर्शनाला स्वारी गेली होती, आपल्याबरोबरच परत कशी नाहीं आली ? कांहीं तरी घात झाला आहे ! महाराज, आपण बोलत कां नाहीं ? या दीन दासीवर आपली इतकी अवकृपा कशानें झाली ? महाराज, आपण नेहमीं हंसतमुख असून आज आपलें मुख असें कोमेजून कां गेलें ? महाराज, आपण धैर्याचे सागर, विवेकाची प्रत्यक्ष मूर्ति, आणि वैराग्याचा आधार आहांत असें मी समजतें. कसाही दुःखाचा प्रसंग प्राप्त झाला तरी न डगमगणारे, असे आपण असून आपले डोळे पाण्यानें कां भरून आले आहेत !

ब्रह्मानंदः–पन्ना, प्रसंग अत्यंत कठीण प्राप्त झाला आहे. संकटाची परमावधि झाली आहे. अशा गडसंधीच्या प्रसंगीं तुझा पति मोकळा असता तर त्यानें या प्राप्त होणाऱ्या महत्संकटाला तोंड दिलें असतें.

पन्नाः–मोकळा असता म्हणजे ! त्यांना कोणीं अटक का केली आहे ? ते मोकळेच आहेत.

ब्रह्मानंदः–नाहीं, पन्ना नाहीं ! तूं चुकतेस अगदीं. या हतभाग्याच्या नशिबीं तुला मोठी दुःखकारक वार्ता सांगण्याचें आलें आहे.

पन्नाः–हाय हाय ! ! देवा, आतां मी काय ऐकणार !

ब्रह्मानंदः—शेंपन्नास रिसालदारांनीं माझ्या झोंपडीजवळ महाबलाला गराडा देऊन त्याला गिरफ्तू केलें. नीच बनबीराच्या हुकुमाप्रमाणें त्यांनीं त्याचा प्राणच घेतला असता, परंतु दैवयोगानें मी तेथें असल्यानें त्याचे प्राण वांचले. आतां त्याला किल्ल्याच्या भुयारांत कोंडून ठेविलें आहे. हा अपघात गुजरण्याच्या अगोदर खुद्द बनबीरानें त्याला गिरफदार करून मारेकऱ्यांकडून त्याचा घात करण्याचा प्रयत्न केला होता. बनबीर स्वतः त्याचा प्राण घेत होता, त्यावेळींही परमेश्वरानें त्याला वांचविलें आहे. संकटांवर संकटें, एकामागून एक लागोपाठ प्राणावर आल्यानें किल्ल्याच्या भुयारांत तो अगदीं जार होऊन पडला आहे.

पन्नाः—(अंग धरणीवर टाकते.) महाराज, माझें काळीज फाटून गेलें. त्या मांगांनीं त्यांचे हाल हाल केले असतील! ते शंभर रिसालदार, आणि हे एकटे! काय करणार? आतां मीं कोणाचे आधारावर राजकुमाराचे प्राण वांचवावेत? माझा आधारस्तंभ, माझें सर्वस्वी जीवित, हेंच जर बनबीरानें हिसकावून घेतलें, तर मीं काय करावें? सत्कर्माला ईश्वर साहाय्यभूत असतो, असें आपण वारंवार आह्मांला सांगतां, पण त्याचा तर उलट अनुभव येत चालला आहे. महाराज, मी आपल्या समागमें येतें. त्यांची माझी भेट करा. महाराज, त्यांचे प्राण आतां कसे वांचतील?

ब्रह्मानंदः—पन्ना, मी तुला मोठी धीराची बायको समजत होतों. पण तूं अगदीं कमधीराची आणखी उतावळी दिसतेस. महाबलाचे प्राण आपण काय वांचविणार? आणखी राजपुत्राचे तरी आपण कोण वांचाविणार? प्राण निर्माण करणारा, त्याची जोपासना करणारा, अनेक प्रकारच्या भयंकर संकटांतून त्याचें संरक्षण करणारा, तो सर्वसाक्षी परमेश्वर आहे. महाबल तुझा काय तो आधार. तो कैद झाल्यानें बनबीर आतां अधिक पुंडावा माजवील. तुझ्या वाड्याभोंवतीं फौजेचा गराडा देऊन राजपुत्राला कैद करण्याकरितां आतांचे आतां इकडे येईल. राजपुत्राचे प्राण वांचविण्याची युक्ति अगोदर काढ. हें संकट अगोदर टाळ. यालाच गडसंधीचा ठाव—निर्वाणीचा समय म्हणतात.

पन्नाः–अशा दारुण प्रसंगीं गुरुमहाराज, आपल्याशिवाय माझ्या अंगीं अचल धैर्य कोण उत्पन्न करणार आहे ! अर्जुनाला जसें श्रीकृष्ण परमात्म्यानें अनेक बिकट संकटांतून मुक्त केलें, तसें आपण मला मुक्त करा. आपला वरदहस्त माझ्या मस्तकावर धरा, म्हणजे या संकटरूपी अथाक समुद्रांतून मी तरून जाईन. ( तिचे मस्तकावर ब्रह्मानंदस्वामी हात ठेवितो. )–आह्मीं आपली सर्व शिबंदी आपल्या वाड्याच्या दरवाज्यावर रखवालीस ठेविली आहे. त्यांतील एकूणएक मनुष्य कापून टाकिल्याशिवाय बनवीराचा प्रवेश या स्थळीं होणार नाहीं. इतकेंही करून तो आंत आलाच तर या समयीं आपण त्याला आपल्या दारुण शापोक्तीनें गलित धैर्य करा, त्याला अंध करा, त्याला पंगू करा, दिशाभूल करा, काय वाटेल तें करा. पण राजपुत्राचे प्राण त्या मांगाचे हातून वांचवा.

ब्रह्मानंदः–राजपुत्राचे प्राण त्याच्या बापाच्यानें हरण करवणार नाहींत.

पन्नाः–अश्वत्थाम्यानें छापा घालून पांच पांडवांचीं पांच पोरें निद्रिस्थ असतां जशीं कापून काढलीं तशीं माझीं दोन बाळें कापलीं जाऊं नयेत. त्या कसायाचे हातून तुह्मी त्यांना सोडवा. या समयीं आपला सर्वप्रकारें मला आधार आहे. जेणेंकरून माझे हिरे हरपतील, दौलतीचे खांब खचतील असें होऊं नये. ( तोफांचे आवाज होतात. ) आला, आला ! यम आला ! कसाब आला ! परमेश्वरा ! या घोर प्रसंगीं राजपुत्राचे प्राण तूंच वांचीव. प्रत्यक्ष मीं आपल्या पोटच्या गोळ्यापेक्षां जर उदयसिंगावर अधिक प्रेम केलें असेल, तर त्याचे प्राण वांचीव. नाहींतर महाराज, मला एक युक्ति सुचली आहे. आपल्या हातांत मी तलवार आणून देतें. आपण आपल्या पवित्र हातानें माझा शिरच्छेद करा म्हणजे मला राजपुत्राचें प्रेत पाहण्याचा प्रसंगच येणार नाहीं. ( तलवार आणण्याकरितां जाते. )

ब्रह्मानंदः–( एकीकडे ) विवेकानें आणखी वैराग्याचे बळानें

संसारसागरांत पर्वतप्राय उंच उसळणाऱ्या लाटा–म्हणजे बिनतोड अडचणी–दुर्धर प्रसंग–क्षणभंगुर आहेत, स्वप्नवत् आहेत, सर्व मायामय म्हणजे खोटे आहेत असें माना. असें आह्मांला तत्वज्ञान–भगवद्गीता सांगते. आणखी जगदात्मा भगवान् श्रीकृष्ण यांचें म्हणणें अक्षरशः सत्य आहे. पण या मायामय जगांत हे असे भयोत्पादक प्रसंग ओढवतात. अशा नीच मनुष्यांची गांठ पडते कीं, पाषाण फुटतील पण त्यांना दया येणार नाहीं, विवेकाचा तागा लागणार नाहीं, आणखी वैराग्याचा ठाव पुसून जाईल. ( पन्ना दोन तलवारी घेऊन प्रवेश करते. ) वेडी नाहीं तर. तुला ठार करून स्त्रीहत्येचें महापातक मीं आपल्या डोक्यावर काय म्हणून घ्यावें ! मी तुला मारणार नाहीं. मी शस्त्राला स्पर्श करणार नाहीं. ज्या समयीं मीं संन्यास धारण केला, त्या वेळीं आजपासून हातांत हत्यार धरणार नाहीं अशी मीं शपथ घेतली आहे.

पन्नाः–चला तर माझ्याबरोबर. आपण उभयतां राजपुत्राच्या शयनमंदिराच्या दारांत जाऊन उभे राहूं. बनबीरानें आंत प्रवेश करतांच मी त्याचें गर्दन धडावेगळें करीन. तुह्मी प्रत्यक्ष फक्त माझ्या समोर उभे मात्र असा; म्हणजे मला वाघिणीची शक्ति येईल. माझे प्राण या शरीरांतून नष्ट होईपावेतों मी राजपुत्राच्या केंसाला धक्का लावून देणार नाहीं. दोन्ही कुमारांच्या शयनगृहाच्या मध्यभागीं आपण उभे राहूं. मग परमेश्वर काय करील तें खरें. मला वाटतें, आपण जे तोफांचे आवाज ऐकत आहों, ते फक्त आमच्या वाड्याच्या तटावर तोफा डागल्या जात आहेत त्यांचे आहेत. आमची सर्व शिबंदी गारद झाल्याचें चिन्ह दिसत आहे. बरोबरच आहे, त्यांना जर फौजबक्ष कोणी पुढारी नाहीं, तर त्यांचें धैर्य टिकणें कठीणच आहे. आतां प्रसंग फारच बिकट ओढवणार. पण महाराज, माझ्या अंगांत श्रीकालिकामातेनें संचार केला आहे असें मला वाटत आहे. मी या बनबीराला खात्रीनें ठार करीन असें मला वाटत आहे.

ब्रह्मानंदः–यांत काय संशय ! तूं वीरपत्नी आहेस. खेचीवाड

येथील तुझे पूर्वज महापराक्रमी होऊन गेले. चितूरच्या महाराण्या-करितां त्यांनीं कैकवेळां आपल्या प्राणांच्या आहुति दिल्या आहेत. चला आपण आतां प्रभु रामचंद्राचें नांव घेऊन कार्यभागास लागूं. त्या प्रभूला जर आपल्या वंशांत सर्वत्र अंधकार करणें इष्ट वाटत असेल, तर त्याच्या सत्तेपुढें आपण तरी काय करणार ! ( उभयतां जातात, बनवीर व त्याचे साथीदार लालसिंग वगैरे प्रवेश करितात. )

**बनबीरः**–महाबलाच्या सर्व शिबंदीचा नायनाट केला. वाड्याच्या संगीन कोटाच्या भिंती जमीनदोस्त केल्या. हनुमान् दरवाजा सुरुंग ठासून अस्मान उडविला. येथपावेतों फत्तेमंदी मिळाली. निमशाइ काम झालेंच म्हणावयाचें. आपलें किसमत सिकंदर आहे. नशिबाचा तारा अस्मानांत चमकतो आहे असें समजा. वाडा तर बेचिराख झाला म्हणावयाचा. पन्नाही कोठें नजरेस पडत नाहीं. मर्दानो, आतां गिरमिटें लावून राजपुत्राच्या शयनमंदिराच्या चुनेगची दिवारीला भगदाडें पाडून आंत घुसूं. त्याला गाढ झोंप लागली असल्यास आपलें काम सहजच झालें म्हणावयाचें.

**लालसिंगः**–पण महाराज, आपण राजपुत्राचें शयनमंदिर पक्केपणीं जाणतांना ? नाहींतर भलत्याच्या शयनगृहांत आपण घुसून निराळाच आकांत गुजरेल, याचा विचार करा. शिवाय ज्या अर्थी येथें कोणी अदमी नजर पडत नाहीं त्या अर्थी कांहीं तरी दगा असावा असा मला शक उत्पन्न झाला आहे.

**बनबीरः**–दगाफटका कुच जानते नई. आपल्या समशेरी आपली जवामर्दी रोषन करतील. राजपुत्राचें शयनमंदिर मी पक्केपणीं जाणतों. महाबल येथें असता तर दगाफिसाद होण्याचा संभव होता. आतां काय ? वाघाचीं विषारी नखें कापून काढलीं, दांत पाडले, आतां त्याच्या करीब जाण्याला हरकत कोणती ! या समयीं दोनी कुमार खतम करण्याचा माझा मनसुबा आहे.

**लालसिंगः**–पण सरकार, ती पन्ना वाघीण मोठी भयंकर पटाईत वाघाची जात आहे. तिच्या जबड्यांत सांपडणें धोक्याचें आहे.

आणखी ते दोन कुमार जर का जागे असले तर तेही मोठी हिंमत धरून प्राण वांचविण्याची कमाल करतील. या प्रसंगीं दोन्ही कुमारांचा नायनाट करण्याचा सरकाराचा मनसुबा आहे तो आम्हांला मंजूर आहे. पण जर का मघांप्रमाणें तें विक्रमाजिताचें सैतान राजकुमाराच्या शयनगृहाच्या दारांत आपल्याला दिसलें तर सर्व मनसुबे जागच्याजागीं थंड.

बनबीरः—भीतिप्रद बकवा लावून माझी हिंमत करपून टाकूं नकोस. चला या माझ्यामागें, प्रथम राजपुत्राच्या शयनमंदिराची दिवार गिरमिटानें फोडून गुलगलबा न करतां त्याला त्याच्या बिछान्यांतल्या बिछान्यांतच गारद करूं. हें कृत्य बिनबोभाट पार पडल्यावर संग्रामाचा समाचार घेऊं. आणखी त्याची शिकार जरी आपल्यास सांपडली नाहीं, तरी त्याबद्दल मला चटका लागणार नाहीं. अव्वल मी स्वतः उभयतांच्या शयनगृहाकडे जाऊन गुप्त रीतीनें तालाश करतों; नंतर तुम्हाला शीळ घातल्याबरोबर तुम्ही सर्व दौडत या. ( जातो. )

लालसिंगः—बनबीरमहाराजांपुढें मला बोलतां येत नाहीं. पण मी खात्रीनें सांगतों कीं, आज हें काम होणार नाहीं आणखी कधींच होणार नाहीं. कारण आजपावेतों यांनीं अनेक वेळां उदयसिंगाचा प्राण घेण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्यांना फत्ते मिळाली नाहीं. यावरून ईश्वराचा मनसुबा निराळाच आहे हें उघड दिसत नाहीं काय ! तें विक्रमाजिताचें भयंकर पिशाच्च.—

बनबीरः—( घाबऱ्या घाबऱ्या किंकाळत येऊन लालसिंगाचे अंगावर पडतो. सर्व साथीदार त्याला सांवरून धरितात. ) लालसिंगानें भा—भा—भा—कित केल्याप्रमाणें पी—पी—पि—शाच्चानें मला पछाडलें. तें मा—मा—मा—नगुटावर बसलें. मीं म्हटलें प्रथमतः आपण संग्रामसिंहाच्या शयनमंदिराचा तपास करावा. त्या मंदिराचे उंबरठ्याजवळ जातों तों दारावर दोन हात ठेवून अक्राळविक्राळ स्वरूपानें विक्रमाजिताचें पिशाच्च उभें. माझे पायच मोडले. गाळण झाली. येथपर्यंत जीव घेऊन कसा आलों माझें मला माहीत.

लालसिंगः—सरकाराला मीं अगोदरच मारुजा केला होता कीं, हें सैतान ऐन मौक्यावर घात करील. आतां आपण सर्व मिळून राजकुमाराचे शयनमंदिरावर चाल करूं. आपण प्रथम त्याच मंदिराचा तालाश करावयाचा होता. संग्रामाच्या मंदिराकडे जाण्याची आपल्यास गरजच नाहीं. आपण सर्व एकदम गेल्यानें तें पिशाच्च आपल्यासमोर उभेंसुद्धां राहणार नाहीं.

बनबीरः—या कामीं मला जर आज यश मिळालें, तर मीं पूर्वीं कबूल केल्याप्रमाणें तुम्हांला जहागिरी मनसबदारी आदा करीन. पण आज तुह्मी कच खाऊन माघार घेऊं नका. चला सर्व. ( सर्व जातात. ब्रह्मानंद व पन्ना प्रवेश करितात. )

ब्रह्मानंदः—काय करणार? मी तर ब्रेहत्यारी, शिवाय वृद्धापकाळामुळें गलित पत्राप्रमाणें शक्तिहीन. तूं जात्या सुकुमार स्त्री. हा लांडग्यांचा कळप आपल्याच्यानें माघारा फिरविला जाणार कसा? याला तोड काय करावी? उभयतां कुमार जर ह्या स्थळीं नसते तर वाडा पेटवून देऊन आगीचा डोंबाळा करून ह्या नीचांना येथेंच जाळून खाक केलें असतें. तो हरामखोर अव्वल संग्रामाचे शयनस्थलाकडे गेला. मला वाटलें कीं, आतां घात होणार. कारण तेथेंच राजपुत्र आहे. पण काय झालें परमेश्वर जाणे. तो एकदम घाबरला. मला वाटतें विक्रमाजिताचें पिशाच्च त्याच्या नजरेस पडलें असावें. यावरून एक अंदाज बांधतां येतो. विक्रमाजिताचें पिशाच्च राजकुमाराचा घात होऊं देणार नाहीं.

पन्नाः—इतका वेळ आपण छपून बसलों ही मोठी चूक केली. ते पहा—ते पहा मारेकरी. राजपुत्राच्या शयनमंदिरांत शिडया लावून गिरमिटानें भिंतीला भोंसके पाडून आंत घुसत आहेत. एक, दोन, तीन, किती तरी मारेकरी! आतां माझ्यानें दम धरवत नाहीं. माझे पंचप्राण माझ्या कुमारांच्या आत्म्यासभोंवतां घिरट्या घालीत आहेत. चला चला. ( जातात. )

दयाळसिंगः—भयंकर—अत्यंत भयंकर—अंगावर शहारे येणारें—

नेत्रांना चक्कर येणारें—कृत्य—आजन्मांत आज मीं पाहिलें. यावज्जन्म हा पाहिलेला हृदयभेदक देखावा या माझ्या मस्तकांतून नाहींसा होणार नाहीं. लालसिंग, सरदारसिंग, गुलाबसिंग, माझ्या कोणत्याही दोस्ताकडून गाढ निद्रेंत मश्गुल असलेल्या सुकुमार राजपुत्राच्या छातींत खंजीर खुपसण्याचें निंद्य कर्म होईना. बनबीर सरकार मला म्हणाले, तुझें नांवच दयाळसिंग, तुझ्या हातून कांहीं होणें नाहीं तूं चालता हो येथून. मीच तें कर्म करणार. असें म्हणून त्यांनीं एक हात आपल्या स्वतःचे छातीवर धरून दुसरा हात वर करून त्या कोमल बालकाच्या उरांत—( खून चढलेला बनबीर रक्तानें भरलेला खंजीर हातांत घेऊन प्रवेश करतो. )

बनबीरः—घोर कर्म—पण झटक्याबरोबर पार पडलें. मध्येंच एक भयंकर किंकाळी ऐकूं आली. पण ती पन्नेचीच असली पाहिजे. दोन हातांत तलवारी घेऊन माझ्या अंगावर धांवली. पण पुढें काय करणार ! तो दारुण प्रसंग तिच्या नेत्रांनीं पाहावेना. हातांतल्या तलवारी गळून पडल्या. वाचा बंद पडली. तिचा बेत राजपुत्राचे अंगावर धाडकन् अंग टाकण्याचा होता. तसें झालें असतें तर एका घायीं दोन तुकडे करण्यास ह्या बनबीरानें कांहीं कमी केलें नसतें. ( दोन मारेकरी पन्नेस धरून आणितात. ) घे माझा सूड घे. काय करणार तूं ! कुठें आहे तुझा कलिजा ! तुझा पंचप्राण उदयसिंग ! ज्याच्याकरितां तूं प्राण टाकीत होतीस तो तुला सोडून गेला. आतां पुनः या लोकीं तुला तो दिसणार नाहीं. ( कट्यार दाखवून ) हें पाहिलेंस का त्याचें रक्त ! ( पन्ना किंकाळी मारते, डोळे झांकून भूमीवर मस्तक टेंकून बसते. ) उघड, डोळे उघड. उदयसिंग अस्सल राजपुत्र आणखी मी बटकीचा कारटा—रांडेचा कारटा. हे तुझ्या नवऱ्याचे शब्द आहेत. त्याला आतां हा रक्तानें माखलेला खंजीर—बहुतेक तो मेलाच असेल—पण जर तो अद्याप जिवंत असेल तर नेऊन दाखवितों. ( मारेकऱ्यांस उद्देशून ) तुह्मी इला सोडूं नका. जेथें इच्या नवऱ्याला मृतप्राय फेंकून दिलें आहे त्या अंधारकोठडींत इला आणखी या थेरड्या संन्याशाला नेऊन पोंचवा. ( पडदा पडतो. )

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**–चितोड किल्ल्यांतील अंधारकोठडी.

( बिड्या घातलेला महाबलसिंह बेशुद्ध पडलेल्या स्थितींतून हळू हळू सावध होत आहे. )

**महाबल**:–ईश्वरानें मला हयाती कशाला दिली ! मर्यांच्या झटापटींत मी ठार कसा नाहीं पडलों ? याचें मला आश्चर्य वाटत आहे. धिक्कार असो अशा निमकहराम रजपूत वीरांना, कीं जे बनवीराला सामील होऊन राजपुत्रावर हत्यार उचलण्याला तयार झाले ! आजपावेतों ज्याचें अन्न खाल्लें त्या राणासंगाच्या पुत्रावर हत्यार उचलणाऱ्याचे हात, परमेश्वरानें वरचेवर कलम कसे केले नाहींत ? यावरून परमेश्वराची कृपा आतां नष्ट झाली हें खास. ( गहिंवरून ) उदयसिंगा, कोठें आहेस तूं ? अद्याप जिवंत असशील काय ? मला कांहींच खबर नाहीं. तुझे प्राण वांचविण्याकरितां, स्वप्राणांची आहुति देण्याला मी तयार होतों. प्रत्यक्ष माझी अर्धांगी, माझा एकुलताएक गुणवान् पुत्र, तुझ्या प्राणापेक्षां मला अधिक प्रिय नाहींत. ते जर तुझ्याकरितां बळी पडले असतील, आणखी तुझे प्राण वांचले असतील तर मला त्यांच्याबद्दल शोक होणार नाहीं. पण असें कोठून होणार ! तो हरामजादा बनवीर तुझ्याबदला त्यांना काय म्हणून ठार मारील ! मला प्रबळ मूर्च्छा येऊन मी बेसावध झालों असें पाहून त्यांनीं मला या अंधारकोठडींत झुगारून दिलें. राजपुत्राची खबर मला आतां कोण देणार ? माझ्या वाड्याला चौफेर फौजेचा गराडा देऊन बिचारा राजकुमार विनाकारण त्यांनीं आपल्या समशेरींनीं नको नको–तीं अक्षरें–या जिव्हेनें उच्चारतांना ती आतां गळून पडते कीं काय असें मला वाटतें. आज सूर्यवंश लयास जाणार किंवा

गेला असेल. प्रभु रामचंद्राच्या धवल कीर्तीला कालिमा लागली किंवा लागेल. काय करूं या वेळीं एखादें हत्यार माझ्याजवळ नाहीं, नाहीं तर स्वहस्तानें मीं आपला गळा सोडविला असता. उदयसिंगाचे अगोदर स्वर्ग गांठला असता. उदयसिंगाचे मागें एक घटकाभर मला या जगांत,–या नीच लोकांत राहण्याची इच्छा नाहीं. बायकामुलांचे ठिकाणीं माझी आसक्ति राहिली नाहीं. उदयसिंगाशिवाय मला हें जग अंधारमय भासत आहे. काय युक्ति योजूं ! एका क्षणांत हें शरीर गतप्राण होऊन जमिनीवर पडलें पाहिजे. बस्, आतां हीच युक्ति. श्वास कोंडून धरतों, मग काय होईल तें होवो. पण ही कोण ? बनवीराची पत्नी निहालकुवर. ( कुवर प्रवेश करते. )

**निहालः**–मला वाटतें हा खास ठार मेला आहे. अद्याप ज्या अर्थीं हा शुद्धीवर आलेला दिसत नाहीं, त्या अर्थीं आतां हा महाबलसिंह नसून हें त्याचें प्रेत पडलें आहे. परमेश्वरानें अनायासें कृपा केली. मोठी धुंद माजविणारा; जोरावारीनें आमचा पाडाव करणारा तोलदार उमराव महाबल माझ्या पायांजवळ गतप्राण होऊन गार पडला आहे. याला जर आतां मीं लाथ मारली तर हा माझें काय करणार ? पण नको. हा सैतान होऊन माझा एकदम हात धरील, नाहीं तर मला खाऊन टाकील. राजपुत्र उदयसिंग आणखी महाबलसिंह दोघांना बरोबरच कृतांताच्या जबड्यांत जातांना पाहून मला आनंदाच्या उकळ्या येत आहेत. माझ्या मनांत याचा नायनाट लावावयाचा होता आणखी महाराजांकडून शाबासकी मिळवावयाची होती. त्यांनीं राजपुत्र उदयसिंग ठार केला, तर मीं त्याचा पालनवाला नामजाद हटेला रजपूत–ज्यानें आजवर मोठा गजब केला होता, शोर माजवला होता, त्याला बेगुमान सफा केला. आतां येथें येऊन त्याचें प्रेत पाहतांच आनंदानें नाचूं लागतील. ( खंजीर बाहेर काढते. ) हा निमचा–ज्याला उदयसिंगाचें रक्त लागलें आहे तो त्यांनीं मजकडे मोठ्या हर्षानें पाठवून दिला. तोच याच्या छातींत भोंसकणार होतें. पण आतां याचें काम संपलें. राणीवशांत कोणास जाहीर न करतां मी ह्या मध्यरात्रीं एक-

टीच या कामाकरितां आलें. पण ( महाबल मोठ्यानें कण्हतो. ) हा अद्याप जिवंत आहे. हा कांहीं मेला नाहीं. आतां कस्त करून याचा प्राण घेतलाच पाहिजे. याला आमच्या लोकांनीं जिवंत कसें ठेविलें ? ( खंजीर उरावर धरून ) यानें डोळे मिटले आहेत. मी येथें आल्याची याला खबर नाहींच. हं आतां पाहतेस काय ? चांडाळा, मर आतां. ( खंजीर मारते, महाबल वरचेवर हात धरतो, उठून उभा राहतो. )

**महाबलः**—चांडाळणी, तूं आणखी तुझ्या नवऱ्यानें माझ्या लाडक्या उदयसिंगाचा खून केला, त्याबद्दल तुला आतां योग्य बक्षीस देतों. माझ्या अंगांत आतां पुन्हां क्रोधाग्नि धुमसूं लागला आहे. आणखी या वेळीं प्रत्यक्ष तुझा वाली तुझा खाविंद जरी तुझ्या सन्निध असता तरी त्यालासुद्धां याच खंजिरानें, उदयसिंगाच्या छातींत घुसलेल्या याच खंजिरानें शेंकडों जखमा करून, यमलोकीं पाठविलें असतें. आतां कृतांताच्या जबड्यांत सांपडली आहेस.

**निहालः**—सोड माझा हात. मोठा गाजी हिंमतवान म्हणवितोस आणखी बायकावर पेषकबूज चालवितोस. आजपावेतों मिळविलेल्या नामजादीला हरताळ फांसतोस ? धिक्कार असो तुला ! तुला लढण्याची घमेंड असेल, तर महाराजांना हांक मारतें. त्यांच्याबरोबर द्वंद्वयुद्ध कर. स्त्रीजातीवर हत्यार चालविणें म्हणजे, नामर्दपणाचें काम आहे.

**महाबलः**—स्त्रीजात—बायका—तूं कशाची बायको—प्रत्यक्ष डांकीण आहेस. माझ्या उदयसिंगाला खाऊन टाकलेंस ! त्याचीं आंतडीं बाहेर काढलींस. आतां तुझ्या नरडीचा घोट घेतों. चल इकडे ये. ( हिसका मारतो. ) उदयसिंगाला ठार करून बनबीराच्या शेजारीं राणी या नात्यानें विराजमान होण्याची तुझी वेळा निघून गेली. खुनास खून मी घेणार. परमेश्वरानें मला आयती शिकार पाठविली.

**निहालः**—पहा एका अबलेवर शस्त्रप्रहार करीत आहेस. यांत तुझ्या लौकिकाला काळिमा लागणार आहे!

**महाबल:**—राजनिष्ठा दाखविण्याचे ऐवजीं दीन अर्भकांवर तुझ्या नवऱ्यानें शस्त्रप्रहार केल्याबद्दल त्याची कीर्ति दिगंत होणार असेल नाहीं ! असू तें कांहीं नाहीं, मी तुला आतां जिवंत ठेवीत नाहीं. देवानें तेंच शस्त्र देऊन तुला इकडे पाठविलें आहे. यांत तरी त्याचा हेतु हाच.

**निहाल:**—हं आटप कर माझा खून, म्हणजे तुझ्या कपड्यावर, तुझ्या चेहेऱ्यावर माझ्या अंगांतलें रक्त आणखी उदयसिंगाचें रक्त शिंपडलें जाईल. स्त्रीहत्या केल्याचें निशाण तुझ्या छातीवर फडकूं लागेल. आणखी सगळे रजपूत महाबलसिंहानें एका अबलेचा खून केला असें म्हणूं लागतील.

**महाबल:**—तुझा गळा दाबून तुला अशीच्या अशीच गारद करतों. हत्याराला तुझें रक्तच लागूं देत नाहीं. तूं ठार पडलीस म्हणजे या हत्यारानें—उदयसिंगाचें पवित्र रक्त ज्याला लागलें आहे अशा या हत्यारानें मी आपला अंत करून घेतों. परमेश्वरानें मला हत्यार पाठवून दिलें. मी मेल्यावर मला सर्व जगानें जरी खुनी म्हटलें तरी त्याची मी तमा धरीत नाहीं. आतां आलेला मौका मी फुकट घालवीत नाहीं. ( तिचा गळा दाबतो. )

**निहाल:**—सोड माझा गळा, मीं स्वतः खून केला नाहीं. माझा विनाकारण बरजोरीनें प्राण कां घेतोस ? यांत काय पुरुषार्थ ? तुला ज्यांचा सूड घ्यायचा असेल, त्यांचा खुशाल घे. मी निरपराधी आहें. शूराचें लक्षण तुझ्या अंगीं असेल, तर मजवर हत्यार चालवूं नकोस. माझा गळा दाबूं नकोस. स्त्रीहत्येचें पातक, बाल-हत्येचें पातक, पदरांत बांधून स्वर्गाला कसा जाशील? तूं मर्दाना उमराव सत्य प्रतिज्ञ—नेकजात म्हणवितोस मग आपल्या सत्वाला पराङ्मुख कसा होतोस ! सिंहानें सिंहाबरोबर लढावें. जाळ्यांत सांपड-लेल्या हरिणीवर झडप घालून तिला ठार करण्यांत सिंहाचा पराक्रम कोणता ? मी स्त्री जात, अबला, त्यांतून दोन प्राणांच्या जिवांची आहुति घेऊन, आपल्या धवल कीर्तीला कालिमा कां लावून घेतोस ? सोड मला, मी तुला पोटच्या अर्भकासाठीं शरण आहें. त्यानें तुझें

काय केलें ? तूं मोठा सत्वशील अशी तुझी कीर्ति गाजत आहे. सत्वाची राखरांगोळी करूं नकोस. तुझ्या पायां पडतें. ( पायां पडते. ) तुझ्या हृदयाला दयेचे पाझर फुटूंदे. मला जीवदान दे.

महाबलः—जा तुला जिवंत सोडतों जा. चालती हो येथून. तूं गर्भवती आहेस, हें ऐकून माझ्या मनानें खस्त खाल्ली. तुला मारून माझा उदयसिंग थोडाच परत येणार आहे ? स्त्रीहत्येचें पातक बालहत्येचें पातक, मी आपले बोडक्यावर लादून घेऊन, सत्वभंग करून घेण्यापेक्षां, या कट्यारीनें स्वतःचा अंत करून घेतों. नाहीं तर तूं आपल्या हातानें, हा बिचवा या माझ्या शोकाग्नीनें करपलेल्या छातींत खुपसून या जिवाचा अंत करून टाक.

निहालः—याच हेतूनें मी येथें आलें होतें. पण आतां माझी बुद्धि फिरली. मी स्वतः तुझा खून करणार नाहीं. तुला वाटेल तसें तूं कर. ( जाते. )

महाबल०—परमेश्वरा, तुझ्या नामाचें रात्रंदिवस चिंतन करणाऱ्या ध्रुवाला तूं अढळपदावर बसवून चंद्र, सूर्य, पृथ्वी, तारे यांना त्याच्या सभोंवार फेऱ्या घालावयाला लाविलेंस प्रऱ्हादाला अग्नीनें जाळलें नाहीं, समुद्रानें उदरांत सांठविलें. नाहीं, किंवा काळकूट जहर त्याचे काळजास झोंबलें नाहीं. तूं आपल्या कोणत्याही भक्तास अघाताचा वारा लागूं देत नाहीस. अशी तुझी श्रीमद्भगवद्गीतेंत अर्जुनापाशीं प्रतिज्ञा आहे. मग आज उदयसिंग प्रत्यक्ष श्रीरामचंद्राचा अंश त्याचें कुळ तूं नामोहरम कसें केलेंस ? हा खंजीर निहालकुंवरच्या हातांत देऊन तूं तिला माझाही प्राण घेण्याकरितां धाडून दिलें होतेंस, पण मी कमनशिबाचा पडलों म्हणून तसा योग जुळून आला नाहीं. ( ब्रह्मानंद व पन्ना प्रवेश करितात. ) हे कोण आले ? गुरुमहाराज आणखी पन्ना. महाराज, तुम्ही येथें कसे आलांत ? तुम्ही चोरवाटेनें आलां असाल. तुम्ही दोघे येथें कदखान्यांत कशाला आलांत ? तुम्ही आलांत पण माझीं दोन लाडकीं बाळें कोठें सोडलींत ? बोला, तुमच्या तोंडांतून मला एकदां खरी हकीकत समजूं द्या. तुमचा पाठिंबा आम्हांस असतां असें कसें झालें ?

ब्रह्मानंदः—महाबलसिंहा, बनबीरानें आह्मां उभयतांस कैद करून या अंधारकोठडींत टाकून दिलें आहे. त्याची समजूत तूं खार्जीनें मेला असशील अशी झाली आहे. तथापि पक्की शहानिशा करून घेण्याकरितां तो स्वतः मारेकरी घेऊन तुला ठार करण्याकरितां आतां इतक्यांत इकडे येईल.

महाबलः—बस् तें कांहीं नाहीं. माझा उदयसिंग कोठें आहे? माझा संग्राम कोठें आहे? त्यांची खुषखबर तुमच्या तोंडांतून ऐकण्याकरितां माझा प्राण घाबरा झाला आहे. कोठें आहे माझा उदयसिंग?

पन्नाः—आतां कशाचा उदयसिंग, आणखी कशाचा संग्राम! त्या नीचानें गुपित घाला घालून त्यांचे हाल हाल करून प्राण घेतले, असें तो स्वतः मोठ्या डौलानें, आमच्याजवळ सांगत होता. आज रात्रीं एका प्रहराचेपूर्वी त्यांचीं मुखकमलें मीं आपल्या हातांनीं कुरवाळून अखेरचीं त्यांचीं चुंबनें घेतलीं. माझीं राजसबाळें—त्रिभुवनाच्या मोलाचे माझे नवरत्नांचे हार मला पुन्हां भेटतील काहो? आम्हांला गिरफ्तार करून आमच्या जिवाचे एकदां बळी घेतले, म्हणजे त्या अधमाला निष्कंटक राज्य चालविण्यास ठीक पडेल.

महाबलः—ज्या अर्थी आपल्या हातून ह्या जन्मीं स्वामिसेवा यथासांग पूर्ण घडली नाहीं, त्या अर्थी आतां, आपण आपलें जीवित स्वामींच्या मागें ठेवणें, अगदीं अयोग्य आहे. बिचाऱ्या सुकुमार अर्भकांनीं मरणसमयीं तीव्र यातना होत असतां, आपणां उभयतांचे नांवांनीं आक्रोश केला असेल, टाहो फोडला असेल! का त्या हरामजाद्यांनीं गाढ निद्रेंत असतांनाच, त्यांच्या पोटांत संगिनी खुपसल्या ईश्वर जाणे! ( पन्ना मूर्च्छित पडते. ) हाय, हाय! पन्ना निचेष्ट पडली! पुत्रशोकाचा अतिरेक झाला. काय करील बिचारी! तिच्या शोकाची खरी कल्पना ज्या कुलीन स्त्रीवर असा दुःखाचा डोंगर कोसळला असेल, तिलाच करतां येईल. स्वामीमहाराज, मला वाटतें इचें प्राणोत्क्रमण झालें असावें. असें झालें असल्यास

देवानें मजवर उपकारच केले. माझ्यामागें वैधव्यदशेंत आणखी बंदीखान्यांत दिवस काढण्यापेक्षां आतांच इला मरण आलें हें फारच उत्तम झालें. प्रिये पन्ने, तुझ्यासारखी गुणवान् पतिव्रता, राजनिष्ठ, स्वपुत्राला राजपुत्राकरितां बळी देणारी स्त्री, या भरतखंडांत जन्मास येऊन, तिनें त्याला भूषित केलें नाहीं असें कोण म्हणणार आहे?

**ब्रह्मानंदः**—महाबलसिंहा, पन्नेची योग्यता फारच मोठी आहे. हरिश्चंद्राची तारामती, नळाची दमयंती, श्रीरामचंद्राची सीतादेवी, यांच्या पंक्तीला तिला बसविण्यास काय हरकत आहे? श्रियाळाच्या चांगुणा सतीनें आपलें अर्भक भगवंताला अर्पण करून आपलें नांव, या जगांत अजरामर केलें. त्याप्रमाणेंच या पन्नारत्नानें आपला पुत्र राजपुत्राकरितां बळी देऊन आपली दिव्य राजनिष्ठा प्रकट केली. चिलियाबाळाचें जसें सार्थक झालें, तसेंच संग्रामाचें झालें.

**महाबलः**—पण महाराज, चिलियाबाळाला परमेश्वरानें तत्क्षणीं सजीव केलें, तसें माझ्या कुमारांना कोण सजीव करणार आहे? आतां श्रीगुरुचरणापाशीं माझी हीच विज्ञप्ति आहे कीं, मला इहलोक सोडून जाण्याची आतांचे आतां आज्ञा असावी. या जगांतील माझें कर्तव्य संपलें. उदयसिंगाचे मागें मी क्षणभर जीव ठेवणार नाहीं. माझ्या काळजाला शेंकडों विंचव झोंबल्याप्रमाणें वेदना होत आहेत. ह्या दुःखाच्या डोंगराच्या भारानें माझें हृदय विदीर्ण झालें. याच्या भारानें मस्तक शतचूर्ण झालें. श्रीरामवंशाचा आज वंशच्छेद झाला. उदयसिंग लाल हरपला. राजस्थानांतील सूर्य कायमचा मावळला. दौलतीचा खांब खचला. सर्वत्र शून्यमय झालें. हे माते चितोड नगरी, तुझ्या वंशवृक्षाचीं फळें म्हणजे तुझे पुत्रपौत्र, ते नष्ट होऊन अंतीं एकच फळ त्याला राहिलें होतें, पण तें सुद्धां काळाच्या दाढेखालीं चिरडून गेलें. याबद्दल तूं पराकाष्ठेची शोकाकुल झाली असशील. तुझ्या दुःखाचें सांत्वन करण्याकरितां, तुझ्या मांडीवर सुकुमार उदयसिंग बसविण्याकरितां हा महाबल आलाच. कुमारा संग्रामसिंहा, माझ्या कोमल बाळा उदयसिंगा, हा मी तुमच्या

भेटीकरितां आलोंच. उदयसिंगा–( छातींत खंजीर मारून घेणार तोंच वेषांतर केलेला उदयसिंग प्रवेश करून त्याचा हात धरतो. )

उदयसिंगः–बाबा, बाबा, मजकडे पहा. मी तुमच्यापुढें उभा आहें. काळसर्पाच्या जबड्यांतून मी बाहेर पडलों आहें. आतां माझे प्राण—

महाबलः–मला बाबा म्हणून हांक मारणारा या जगांत कोणी राहिला नाहीं. तूं कोण आहेस ! सोड माझ्या खंजिराचा हात. या वेळीं मला हरकत करूं नको. माझा उदयसिंग! माझा संग्राम !

उदयसिंगः–बाबा, मी संग्रामच आहें. उदयसिंगाचा बनबीरानें खून केला. पण संग्राम ईश्वरकृपेनें वेषांतर करून पार पडला. तो तुमच्यापुढें उभा आहे. डोळे उघडून माझ्या तोंडाकडे पहा.

महाबलः–तूं जर संग्राम असलास तर तुला पाहून जितका हर्ष होईल त्याच्या शतपट आनंद मला उदयसिंग पाहून होणार आहे. संग्राम मरून माझा निर्वंश झाला तरी हरकत नाहीं. पण उदयसिंग मारला जाऊन–रामराज्याचा कुलदीपक मालविण्यास मी तयार नाहीं.

उदयसिंगः–बाबा, मी संग्राम नसून उदयसिंगच आहें. पण मला तुह्मी आतां संग्राम म्हणून हांक मारा. माझा जिवलग पाठचा भाऊ संग्राम, माझ्याकरितां मुद्दाम होऊन बळी पडला. हें त्याचें ऋण मीं हजारों जन्म घेतले तरी फिटणार नाहीं. दिव्य राजनिष्ठा प्रकट करून तो सोन्याच्या विमानांत बसून स्वर्गाला गेला. तेहतीस कोट देव त्याला समारंभानें इंद्रलोकीं घेऊन गेले. बाबा, मला पोटाशीं धरा–बाबा, मला आतां तुमच्याशिवाय या जगांत आधार-- ( मुखवस्त्र दूर करतो. )

ब्रह्मानंदः–महाबलसिंहा, नेत्र उघडून या सुकुमार उदयसिंगाच्या मुखाचें निरीक्षण कर. तोच तो. चिलियाबाळ जसा परमेश्वरानें जिवंत केला, तसाच तुझा उदयसिंग राजकुमार परमेश्वरानें सजीव केला. आज तूं धन्य आहेस !

महाबलः—गुरुमहाराज, खरेंच कां उदयसिंग जिवंत आहे? अहाहा! परमेश्वरा, तुझी लीला अगाध आहे! आज जन्मांधाला नेत्र आले! अमृताचा वर्षाव झाला! सर्वत्र मोत्यांचा पाऊस पडला. ( उदयसिंगास पोटाशीं धरून चुंबन घेतो. ) बाळा उदयसिंगा, तुझे प्राण कसे वांचले? याचा मला मोठा नवलावा वाटतो आहे. श्रीरामचंद्रानें, सर्व मारेकऱ्यांना आणखी त्या बनबीराला अंध करून ज्या अर्थी तुला मजकडे जिवंत धाडून दिलें आहे त्या अर्थी प्रभूची पूर्ण कृपादृष्टि तुजवर आहे, हें सिद्ध झालें.

उदयसिंगः—पण बाबा, माझी आई कोठें आहे?

महाबलः—( बोटानें दाखवितो. ) ती पहा पुत्रशोकानें मृतप्राय होऊन जमिनीवर पडली आहे.

उदयसिंगः—(पन्नेच्या गळां पडून ) आई, आई, हा तुझा बालक उदयसिंग तुला साख्या हांका मारीत असून तूं त्याच्याशीं भाषण करीत नाहींस. यावरून तुला त्याचा राग आला आहे. बरोबरच आहे. संग्रामाला कसाबाच्या सुपूर्द करून मीं आपली जान बचाविली असा तुझा ग्रह होणें इष्ट आहे. आई, म्हणून का तूं माझ्याशीं बोलत नाहींस? आई, आतां माझ्या हातून तुझे उपकार ह्या लोकीं फिटणार तरी कसे? आई, तुझ्याशिवाय मी वांचेन असें का तुला वाटतें? गुरुमहाराज, आपण आपल्या अमृततुल्यवाणीनें माझ्या आईची समजूत करा. तिला सांगा उदयसिंग मेला, संग्राम जिवंत आहे. आई, बोल माझ्याशीं.

ब्रह्मानंदः—बाळा उदयसिंगा, दुःखाचा कडेलोट झाल्यानें विव्हल होऊन तिला प्रबळ मूर्च्छा आली असावी असा माझा तर्क आहे. ईश्वरकृपेनें ती लवकरच शुद्धीवर येईल. तिचा असा समज झाला आहे कीं, आपलीं दोन बाळें बनबीराचे हातीं सांपडून त्यांचा नायनाट झाला. त्यांत विशेषेंकरून आपल्याबद्दल तिच्या मनास, परमावधीचें दुःख झालें होतें. आपण जर या घटकेस येथें आलां नसतां तर महाबल आणखी पन्ना, हे आपल्यास

अगर मला पुन्हां दृष्टीस पडले नसते. ( पन्ना सावध होत आहे असें पाहून )

उदयसिंगः–आई, तूं सावध झालीस का ? हा तुझा संग्राम तुला हांक मारीत आहे त्याजकडे डोळे उघडून बघ.

पन्नाः–बाळा संग्रामा, तूं एकटाच कसा आलास ? माझ्या उदयसिंगाला कुठें सोडलेंस ?

उदयसिंगः–उदयसिंग बनवीराचे तलवारीला बळी पडला. मला आजपासून तुह्मी संग्राम म्हणून हांक मारा. पोषाखाची अदलाबदल केलीस इतकेंच नाहीं पण शयनगृहांची तबदुली केल्यानें हा प्रसंग आला. माझा भाऊ संग्राम गेला आणखी त्याच्यामागें मी कशाला जगलों ! जिकडे माझा संग्राम गेला तिकडे मी जातों. ( जाऊं लागतो त्यास ब्रह्मानंद धरून आणतो. )

पन्नाः–( उदयसिंगाला मिठी मारून ) माझ्या संग्रामाच्या देहाचें सार्थक झालें. त्यानें खरी राजनिष्ठा दाखविली. पोटच्या गोळ्याबद्दल मला परम दुःख होईल पण त्यानें तुमचे प्राण वांचविले हें मनांत आल्यावर माझ्या दुःखाला कांहीं तरी आळा बसेल. संग्रामाच्या प्राणापेक्षां तुमचे प्राण अधिक महत्वाचे आहेत. महाराज, तुमचा प्रवेश येथें कसा झाला ? तुम्हाला कोणीं ओळखलें कसें नाहीं ?

उदयसिंगः–मी वेषांतर करून शयनमंदिरांतून बाहेर पडलों, त्या वेळीं बनबीर मारेकऱ्यांसुद्धां बेफाम होऊन राजपुत्र मारला, उदयसिंग मारला–आतां संग्रामाची आपल्यास गरज नाहीं. चला आतां असें ओरडत होता. त्या नीचांनीं संग्रामाचा झोंपेंतच खून केला. संग्रामाचा पोषाख माझ्या अंगावर होता, आणखी माझा त्याच्या अंगावर असल्यानें रात्रौ त्यांना भुरळ पडून गफलतीनें त्यांनीं राजपुत्र हाच म्हणून त्याचा वध केला. हाय ! हाय ! मी हें काय सांगत बसलों आहें ! बाबा, मला आतां पुढें बोलवत नाहीं. चोररस्त्यानें मी कसा तरी येथें येऊन दाखल झालों. मला जालीमसिंगानें येथें आणून पोंचविलें.

**महाबल:**--गुरुमहाराज, आह्मी अज्ञान बालकें आहोंत. आह्मी अंध आहोंत. आतां या सङ्कटांतून आम्हांस वांचवा. आतां पुढें तरकीब काय ? आतां तो खुनी हरामजादा हजारों लोकांनिशीं येथें येईल. राजपुत्र इथान आहे असें पाहतांच आपल्या सर्वांस गराडा देऊन तो आपली सर्वांची कत्तल केल्याविना राहणार नाहीं. येथें एक क्षण राहिलों, कीं आपलीं सर्वांचीं शंभर वर्षें भरलींच म्हणून समजा.

**ब्रह्मानंद:**–ह्याच बाबतींत मी विचार करीत आहें. माझा मनसुबा आतां असा आहे कीं, आपण सर्वांनीं गोसाव्यांचीं सोंगें घेऊन देवळा येथील सिंगराव याजकडे आश्रय मागण्यास जावें. त्याला मीं आश्रय देण्याबद्दल पुष्कळ उपदेश करीन. माझी सल्ला त्याला नापसंत पडल्यास आणखी त्यानें इनकार दाखविल्यास आपण तसेंच डोंगरपूर येथील यशकर्ण याजकडे जाऊं. तेथें आपला पुरसपना झाला नाहीं, तर आपण रजपूत संस्थानिकांचा नाद सोडून देऊन कुमळमेरास जाऊं तेथील श्रावक सुभेदार असासह बमयफौज आपली तरफदारी खात्रीनें करील. त्याच्या मांडीवर उदयसिंगास नेऊन बसवूं. त्यानें इनकार केला तर हिमाचलावर जाऊं. तेथें तपश्चर्या करून श्रीशंकरास प्रसन्न करून घेऊन आपला इष्ट हेतु साध्य करूं. ह्या अंधारकोठडींतून किल्ल्याच्या बाहेर पडण्याच्या चोरवाटा जालीमसिंगानें उदयसिंगाला दाखविल्याच आहेत. चला आतां. श्रीरामाचें नांव घेऊन तुह्मी कामास आरंभ करा. जय रघुवीर.

**महाबल:**–हे माते चितोड नगरी, तुला आमचा शेवटचा प्रणाम आहे. तुझ्या चरणाचें पुनः आम्हांस लवकरच दर्शन दे. कन्या प्रथम सासरीं जाऊं लागली म्हणजे ज्याप्रमाणें दुःखानें हृदय दाटून येऊन वारंवार ती आपल्या मातेकडे मुरडून पाहते, तसें आम्हांस झालें आहे. पावलोपावलीं दीन मुद्रेनें आह्मी तुजकडे पाहत आहों. चला महाराज, बाळा उदयसिंगा, तुला आतां मी आपल्या खांद्यावर घेतों. कारण तुला चालण्याचे श्रम होतील. (त्यास खांद्यावर घेतो.) जन्मजन्मांतरीं मोठी पुण्याई केल्याशिवाय श्रीरामचंद्राच्या वंशांतील

वीरशिरोरत्नानें माझ्या स्कंदप्रदेशीं आरोहण केलें नाहीं. आज माझ्या कोटि कुळांचा उद्धार झाला असें मला वाटतें. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश २ रा.

स्थळ–अरवली डोंगरांतील गुहा.

( उकरड्या, शेणफड्या, सुपड्या, बेंबट्या वगैरे भिल्ल प्रवेश करितात. )

**सुपड्या:**–बनवीराचें राज्य लई खराब पघा. त्यान म्हून् इचेमन उदयसिंगमहाराजाचा खून केलाय, अन समद्यासनी फासावर चढवतुया. आन चितुडांतून लोकास्नी घराबाहेर हाकून देतुया. आकशी घेमार चाललिया. तेच्यापुन मंग आपल उकरडू महाराज अक्षी नामी हैती अस नव्हका शेणफडू दादा ?

**शेणफड्या:**–हे पघा सुपडू काका, बेंबट्या पाटील, उकरडू सरकारच्या तोंडाप बोलाव अस नाय. तेंच नांवच उकरडू सरकार–तुह्मी कांहीं करा. समद् आपल पोटांत घालायच. उकरडा जसा समद्या केराच मायपोट, तंस आमच धनी.

**बेंबट्या:**–ते हैति राज आन आपुन इचेमन भिल्लाची जात. पन आपली जात जसी इमानी है तसली जगामंदी कुनाचीबी नाय. यकदा आपुन आपला म्हटल कीं मग तेच्या पाइ परांन गेला तरीबी हरकत नाय. पन त्याच्यावर म्हून हात टाकायचा नाहीं. कस उकरडू सरकार !

**उकरड्या:**–तुह्मी संमद् माझे साथीदार आन् मी तुमचा नाईक. पन मी कधी तुमच्यासंग दगा केला है का ! तुह्मी इकत्यासनी लुटता पन कधी कुनाचा परान घ्या अस मी म्हनतुय का ! तुह्मीबी अक्षी नामी मनुक्ष हैती. कस म्हनाल तर, सुपडू दादा म्हनजे अक्षी सूपच पघा राव, अन् सुपाबिगर जस चालायच नाय, तस हैती. शेनफड काका म्हनजे गईचे शेनच. शेनाबिगर घरात

चालायच नाय. बेंचट्या पाटील म्हनजे आपल्या समद्याच्या पोटाची बेंबी हे. म्हंजे पोटाची अस्तुरी हे. पघा, अस्तुरी बिघडली कीं कारभारी बिघडला म्हून समजा. बेंबी बिघडली कीं पोट बिघडलय म्हूनशान समजा आन पोट बिघडल कीं बेंबी बिघडली म्हून समजा.

सुपडूः—काय न्याव करत्याती काय न्याव करत्याती, काय गिन्यान सांगत्याती ? हाय हाय ! अस वाटतया कीं उकरडू सरकारच्या पायाप हा परान् द्यावा. नायतर मरूनशान तेच्या पोटासनी याव. पन सरकार हे गिन्यान तुह्मी कुठं पैदा केल ? मंग आपली समद्याची नाव अक्षी अशीच हैती पघा. हाडक्या डोळशा मन्या वान्या झिपऱ्या सटव्या. पन हे लेकाचे अजुनशान का बरे आले नायत. आन आज जर का तेसनी शिकार गवसली नाय तर मी एक खैरा कोंबडा काळकाईला बळी देनार हय. बर का नाइकसाब.

उकरडूः—ते का म्हून इचेभन ? सिकारीच काम अक्षी खराब. यखाद्या येळला घावतीया पटकन. आन आठ आठ दिस घावतबी नाय. तेच काय. आन तुमची शिकार म्हंजे मानसाची शिकार. काय हरण लांडगा तरस वाघ रानडुकर थोडाच हे. पन काळकाइने आजपोत आपल्याला पोटाला कमी केल नाय. आजबी सिकार गवसल. ( पन्ना व हाडक्या, डोळशा, मन्या, वान्या वगैरे प्रवेश करतात. )

मन्याः—मल असी म्होर व्हय म्होर. अक्षी चम चम चम इचेभन जशी चांनी चमकतीया. राव असली सिकार मी आपल्या समद्या उमरींत पघितली नाय. गोरी गोरीपान जसा काय भितिला चुना सारवलाय. डोळे कस, जस काय भोकरागत. चालतिया कस हळु हळु हत्तीनच पघा बोलतीया जसी मैना. मी तर अगदी ठार झालुया. आन कारभारीन असावी तर अक्शी असीच. नाहितर इचेभन आमच्या. का यडकाई सांगु का रोडकाई बगळाई मंगळाई म्हसकाई ! थूः तिचेभन. जानाई जोखाई जशा अक्षी कैदासनी

हडळी मसनातून खायला आल्याती. आह्मीची तसच हैती म्हना खैसागत. आता इसनी उकरडू सरकाराला नजर करून इला म्यापल्या ताब्यांत घेतो. ( नाचूं लागतो. )

पन्ना:–मेल्या काळ तोंड्या, कुणालारे ताब्यांत घेतोस ? जीभ कापून टाकीन. ठाऊक नाहीं अजून ? डोंगरामध्यें पाण्याचा शोध करीत असतां मी जरा माणसें सोडून बाजूला गेलें, तों हे मेले काळेकभिन्न भिल्ल येऊन यांनीं मला धरून इकडे आणलें.

मऱ्या:–आलललल काय पन बोलतिया जसी काय कालका- ईच्या देवळातली घाट. ( उकरड्यास उद्देशून ) सरकार, शिकार मी गवसून आनलिया. इच्याजवळ पैना मांयदळा हय. आन इचे- भन आनखी इच तिघ साथीदार हैती. तेसनी आतां पकडूनशान नाइकसाबाच्या पायाप हजर करतुयां. पन सरकार, ह्या पहिल्या सिकारीबद्दल या मऱ्याला बक्षिस पाहिजे बक्षीस.

उकरडूः-लेका मऱ्या, हजार दोन हजार पाहिजे ते बक्षीस देन्याला हा उकरडू नामर्द हय व्हय ? माग म्होर पाहनार नव्हे सम- जलास ? ह्या आवासनी आमच्या घरीं घेऊनशान् जा, म्हंजे आमची कारभारीन इच्या पोटापान्याची सोय करील.

मऱ्या:–हजार दोन हजार नग मला सरकार. ह्या आवाच्यापाई हा मऱ्या मर्द अगदीं बेजार झालाय. आन् मला दहा हजारबी नगत. ( पन्नेच्या पायां पडतो. ) मला तच पाहिजे. ( पन्ना लाथ मारते. ) गुमान माझ्या मागुटन चल आपली माझ्या घरी. तुला मेंढीच दूध प्यायला देतो. आनू भाकरबी खायला देतो. ( तिचा हात धरायला जातो. ती तोंडांत मारते. ) अहाहा ! जसा काइ लोन्याचा गोळा. या मऱ्याच्या तोंडांत मारतेस व्हय ? घरी चल म्हंजे मुंडीतल याड काढून टाकतुया. ( गोसाव्यांच्या वेषानें ब्रह्मानंद, महाबल व उदयसिंग प्रवेश करितात. ) आजचा दीस लइ नामी हय पघा. सिकारीवर सिकारी घावल्याती. ( महाबलास उद्देशून ) कायरे गोसावड्यानु हात या आरवली डोंगरामंदी तुमच्या बाच पुरल हय व्हय ? कशापाई हथ आल्याती ?

**महाबलः**—आपण या डोंगरकठाडीच्या रस्त्यानें आपल्यास कुमळ मेर जवळ पडेल असें वाटून येऊन फसलों अगदीं. येथें आपण भिल्ल लोकांच्या तावडींत आयतेच सांपडलों. येथून सुटून जाण्याची मुष्कील आहे. ( पन्नेस उद्देशून ) तुला शोधतां शोधतां दमलों अगदीं. आम्हांस वाटलें कीं, तूं रानडुकराच्या मुसंडीला बळी पडलीस. आणखी पडली आहेस खास. पण भिऊं नको.

**पन्नाः**—पाहिलेंत का? हा कोण मेला मन्या का मसण्या सारखा मला वाईटसाईट बोलणीं बोलत आहे? तोंडांतून बाहेर काढू नयेत असलीं भाषणें मेला मला बोलतो.

**उदयसिंगः**—(तलवार पडताळून मन्याचे अंगावर धांवतो.) कायरे हरामखोर, तुझी जबान आतां सफा करतों. माझ्या आईला अपशब्द बोलतोस काय ! आह्मी कोण आहों तें तुला समजलें आहे काय ? ( मन्या थरथर कांपतो. )

**ब्रह्मानंदः**—छे, छे, महाराज. ( उदयसिंगास आंवरून धरून ) आपण यांच्यावर शस्त्र उगारण्याचें कारण नाहीं. हे अज्ञान भिल्ल लोक, यांना आपण कोण याची काय कल्पना असणार? (नाइकास उद्देशून ) नाईक, तुह्मी जरा इकडे या, मी तुमच्या कानांत कांहीं गोष्ट सांगतों. ( त्याच्या कानाशीं लागून ) हा राजपुत्र उदयसिंग आहे. राणासंग शिक्रीच्या लढाईनंतर भिल्ल लोकांच्या आश्रयानें या अरवली पहाडांत रहात असे हें तुम्हांला माहीत आहेच. तो तुम्हांला अगदीं पोटच्या पोराप्रमाणें वागवीत असे. त्याचा हा मुलगा उदयसिंग, बनबीराच्या तडाक्यांतून या बाईनें त्याला आपला मुलगा चान्याबद्दल बळी देऊन याचे प्राण वांचविले. ( सर्व भिल्ल उदयसिंगाच्या पायां पडतात. )

**उकरडूः**—काय म्हनतां उदयसिंग ! कायर खुपडू मघाशी काय म्हनालास ? तेसनी म्हनं बनबीरानं ठार केलं. संमद खोटं. याचं बा संगराना म्हंजे आमचं बाच पघा अक्षी अस होते. पन आतां हे संमद सरकार चालल्याती कुनिकडे ?

ब्रह्मानंदः-आम्हांला कुमळमेरास सुभेदार असासहाकडे जायचें आहे. राणासंगाला जर तुह्मी आपल्या बापाप्रमाणें समजतां तर हा उदयसिंग तुमचा भाऊच झाला. याला तुह्मीं सर्व प्रकारें मदत केली पाहिजे.

महाबलः-या तुमच्या कामगिरीबद्दल तुम्हांला लागेल तितकें धन देऊं, गिरासदाराचा म्हणजे वाटमाऱ्याचा धंदा करून आजपावेतों तुह्मीं जें द्रव्य मिळविलें असेल तें कांहींच नाहीं असें समजा. तुह्मीं सर्व भिल्लांनीं आमच्या समागमें या जंगलांतून येऊन आम्हांस कुमळमेरच्या सुभेदाराकडे पोहोंचतें करा.

उकरडूः-सरकार, आमच्यापुन मोठा अन्याव झाला तेची माफ असावी. उदयसिंग महाराजाच आह्मी गुलाम हैती सरकार. त्येच्याकरतां आह्मी परान देन्याला तयार हैती सरकार. तेसनी डोसक्यावर घेऊनशान सांगाल तकडे तुमच्या मागुनशान गुमान येऊ सरकार. ( मऱ्यास उद्देशून ) मऱ्या लेका धन्यासंग हरामखोरी कामाची नाहीं पघ. ह्या छोट्या सरकारासनी उचलून खांद्यावर घे. आनू बिगी बिगी चालाया लाग कसा. खुपडू, शेनफडू, बेंबट्या, हाडक्या' होळशा, वाऱ्या समद यांच्यासंग चलारे. रानासंग आपला राजा व्होता. आनू तेचा मुलगा जिता हय तव्हा त्योबी आपला राजाच हय. चला यांच्या संग. आई, पन्नेच्या पायां पड, तोंडांत मारून घे. ( तसें करतो. मऱ्या उदयसिंगास खांद्यावर घेतो. सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळः—कुमळमेर येथील सुभेदाराचा वाडा.

( असासह सुभेदार कित्येक सरदार लोकांनिशीं दरबारांत बसला आहे. एक जासूद प्रवेश करतो. )

जासूदः-सरकार, ईडर प्रांतांतून अरवली डोंगराच्या खोऱ्यांतून भिल्ल लोकांचा राजा मोठी भिल्लांची जमात बरोबर घेऊन

आपल्या कुमळमेरास मोठ्या झपाट्यानें येत आहे. तपास करण्याकरितां इकडून एक घोडेस्वारांचा रिसाला रवाना केला. आतां अशी बातमी आली आहे कीं, भिल्लांच्या राजाची कुमळमेरावर चाल करून येण्याची इच्छा नाहीं किंवा गांवगन्ना लुटालूट करून धुमाकूळ उडविण्याची त्याची इच्छा नाहीं. त्याचा मनसुबा फक्त सरकारच्या पायाचें दर्शन घेण्याचा आहे. असें करण्याबद्दल सरकारची परवानगी ते मागत आहेत. आतां लवकरच ते कुमळमेराच्या कोटाला येऊन भिडतील.

**सुभेदारः**–माझ्या सर्व अमदानींत भिल्ल लोकांचा राजा अरवली डोंगर सोडून कुमळमेराकडे वळल्याचें मी आजच ऐकतों. गिरासदारीचा पेशा चालवून ते आपला गुजारा करतात. आपल्याकडून दरसाल त्यांना कांहीं नक्त ऐवज पोहोंचता होत असतो. कदीमची ही बाब चालू असल्यानें या कामांत मीं कधीं हरकत केली नाहीं. मग या भिल्लांच्या राजाला आमच्या कुमळमेरास येण्याचें कारण काय ?

**जासूदः**–त्या भिल्ल लोकांचे बरोबर एक वृद्ध संन्यासी आहे म्हणतात, त्याच्या हुकुमांत ते सर्व चालतात.

**सुभेदारः**–हा मोठा चमत्कारच आहे म्हणायचा. संन्याशाचा भिल्लांशीं संबंध काय ?

**जासूदः**–आणखी त्यांच्याबरोबर एक सुंदर स्त्री आहे सरकार असें समजण्यांत आलें आहे.

**सुभेदारः**–संन्यासी आहे म्हणतोस, स्त्रीही आहे म्हणतोस, तेव्हां मला वाटतें कांहीं तरी मोठी भानगड आहे. आणखी कोण आहेत तें एकदम तरी समजूं दे.

**जासूदः**–आणखी एक मोठा ऐटदार सरदार, आणखी एक परम सुंदर केवळ राजपुत्र शोभेल, असा कुमार आहे म्हणतात.

**सुभेदारः**–हें मोठे कोडेंच आहे म्हणायचें! आणखी हें सर्व लटांबर आमच्या राजधानीकडे धांव घेत आहे म्हणतोस ? ( दुसरा जासूद प्रवेश करतो. )

जासूदः–सरकार, महाबलसिंह नांवाचे चितोडचे सरदार भिल्ल लोकांच्या मदतीनें अरवली डोंगराच्या पहाडांतून येथपर्यंत येऊन आपल्या मुलाखतीची इच्छा करीत आहेत.

सुभेदारः–जा त्यांना घेऊन या. महाबलसिंहाच्या मर्दुमकीची तारीफ राणा संग हयात असतां अनेक वेळां आमच्या कानावर आली आहे. त्याचप्रमाणें ते अत्यंत राजनिष्ठ असून त्यांनीं उदयसिंगाचा पक्ष धरल्यामुळें बनवीराची त्यांच्यावर फार खपा मर्जी झाली आहे असेंही माझे ऐकण्यांत आलें. चितोडाहून नुकत्याच आलेल्या सांडणीस्वारानें अशीही दुःखकारक बातमी आणली होती कीं, बनवीरानें उदयसिंगाचा खून केला. त्याचा पुरस्कार करणाऱ्या रजपुतांची कत्तल केली. इतकेंच नाहीं पण महाबलसिंहालासुद्धां कैदखान्यांत टाकून त्याचा वध केला, असें आह्मी ऐकत होतों. ( ब्रह्मानंद, महाबल, पन्ना, उदयसिंग प्रवेश करतात. सुभेदार त्यांना सामोरा जाऊन महाबलसिंहास हातीं धरून आणतो व उच्चस्थानीं बसण्याबद्दल आग्रह करतो. )

महाबल०ः–सुभेदारसाहेब, मी ज्यांच्या समागमें आलों आहें त्यांचा मानमरातब दर्जे अव्वलचा असून त्यांच्या पायाजवळ बसण्याची माझी योग्यता आहे. ( उदयसिंगाकडे वळून ) हे माझे अन्नदाते. यांच्या अन्नाचा हा पिंड आहे. यांच्या पायाचा मी बंदा गुलाम आहें. तेव्हां यांचा योग्य मान झाल्याशिवाय म्हणजे यांची मागणी काय आहे ती आपण कबूल केल्याशिवाय मी आपल्या घरीं अन्न घेणार नाहीं. ही बरोबर आलेली स्त्री कुमाराची उपमाता आहे. आणखी हे माझे गुरु स्वामी ब्रह्मानंद, ज्यांच्या तीव्र शुचित्वाची कीर्ति सर्व राजस्थानांत गाजत आहे हें आपल्यास जाहीर असेलच.

ब्रह्मानंदः–सुभेदार, तुझी पुण्याई फार थोर म्हणूनच या राजकुमाराचे पाय या तुझ्या घराला लागले आहेत. संगराण्याचा पुत्र उदयसिंग, ज्याचा बनवीरानें खून केला असें सर्वत्र जाहीर झालें आहे तोच हा कुमार उदयसिंग. सरदार महाबलसिंह आणखी त्याची महापतिव्रता स्त्री पन्ना या उभयतांनीं स्वपुत्र संग्रामसिंह, याला राज-

कुमाराचे शयनमंदिरांत राजकुमाराचा पोषाख चढवून निजविला होता. तो राजपुत्र उदयसिंगच आहे असें बनबीराला वाटून त्यानें त्याचा खून केला. हें घोर कृत्य झाल्याबरोबर आह्मी चौघांनीं चितोड किल्ल्याच्या गुप्तमार्गानें बाहेर पडून भिल्ल लोकांच्या जंगलांतून आश्रय मागण्यास्तव तुजकडे धांव मारली आहे. तुझ्याकडून योग्य मान होईल असें मीं यांना आश्वासन दिलें आहे. देवळा येथील सिंगराव, डोंगरपूरचा राऊळ यशकर्ण, यांनीं बनबीराला भिऊन जाऊन नामर्दपणाचीं उत्तरें दिलीं. तूं जरी रजपूत नाहींस, श्रावक आहेस, तरी हा भेदाभेद--

**सुभेदारः**–समजलों महाराज, कुमाराचे मुखाकडे पाहून माझ्या पोटांत आनंदातिरेकाच्या लाटा उठत आहेत. स्वामीमहाराज, आपण म्हणतां ही गोष्ट अक्षरशः सत्य आहे. माझ्या गरिबाच्या झोंपडीला आज खरोखरच श्रीरामचंद्राचे पाय लागले असें मी समजतों. ईश्वरकृपेनें मेवाडांतील सरदार म्हणजे सोनीगडचे ठाकूर, साळुंब्राचे ठाकूर, चोडांचे वकील, बागोरचा सिंग, कोठारा आणि बेडाला येथील चव्हाण, बिजोलीचा प्रमार वगैरे मंडळी अनायासें येथें आहेत. यांनीं मला मदत केली पाहिजे. दुसरी गोष्ट ही आहे कीं, मी डेप्राजातींतील श्रावक, आणखी आपण सर्व रजपूत–तेव्हां माझ्या हातून स्वामिसेवा घडून आल्यास या रजपुतांचा मजवर रोष होणार आहे. ( जासूद प्रवेश करतो. )

**जासूदः**–सरकार, आईसाहेबांची आपल्यास अशी आज्ञा आहे कीं, आपण भिऊं नये. आपला इमानीपणा राखणें असेल तर धोके आणखी संकटें मनांत आणून धैर्य खचूं देऊं नका. हा आपला धनी आहे. आपल्या संगराण्याचा पुत्र आहे. त्याचा प्रतिपाळ करा. ईश्वरकृपेनें सर्व गोष्टी उत्तम होऊन आपल्यास यशप्राप्ति होईल.

**महाबल०ः**–मातोश्रीची आज्ञा म्हणजे परमेश्वराचीच आज्ञा आहे असें समजा. शिवाय आपण मातृभक्त आहां असा आपला सर्वत्र लौकिक आहे. पूर्ण राजनिष्ठा प्रदर्शित करण्याची कसोटीची हीच वेळ आहे. शिवाय या समयीं मातोश्रीची आपल्यास अशीच

आज्ञा आहे. अनायासें सरदार मंडळी येथें दरबारांत आहेत. हा त्रिवेणी संगमच झाला आहे म्हणावयाचा. उदयसिंगाला आपला पुत्र म्हणून आपण आपल्या मांडीवर घ्यावें. त्याच्या मस्तकावर अभय हस्त ठेवावा. म्हणजे आह्मी जे कष्ट सोसून येथपावेतों आलों त्याचें सार्थक झालें.

सुभेदारः—फार उत्तम आहे. पुत्र म्हणून अंकावर घेण्याची मनापासून इच्छा. परंतु असें केल्यानें चितोडच्या गादीचा अपमान होणार आहे. महाराज उदयसिंग यांना कुमळमेरच्या गादीवर बसवून मी त्यांच्या पायाजवळ बसतों. माझी तलवार आणखी माझी फौज आपल्या दिमतीला देतों. ( उदयसिंगास उद्देशून ) महाराज, चलावें आपण, माझ्या आसनावर बसा. मी आपल्या पायाजवळ बसतों.

कोठारीचा चव्हाणः—आम्हां सर्व रजपूत सरदारांचें आपल्यास या कामीं पूर्ण पाठबळ आहे. हा अस्सल राजपुत्र आहे. संगराण्याचा पुत्र आहे. कांहीं मिथ्या गोष्ट नाहीं. अशी माझी खात्री असून सुभेदारसाहेबांची खातरजमा करण्याकरितां मी या राजकुमाराला आपल्या ताटांत घेऊन भोजन करतों म्हणजे झालें. असें झाल्यानें सर्व रजपूत सरदारांना जातीबद्दल संशय राहिला नाहीं.

सोनीगडचा ठाकूरः—सुभेदारसाहेबांची खात्री जास्त करण्याकरितां आणखी सर्व रजपूत सरदारांची जूट बनून बनबीराचा पाडाव करण्याकरितां मी आपली कन्या या राजपुत्राला देऊन यांना मी आपला जामात करतों. ही माझी विनंति सुभेदारसाहेबांनीं मान्य करावी. आपण कुंभो किल्ल्यांत मेवाडचे सर्व ठाकूर जमून तरुण उदयसिंगास चितोडचा राणा, असें ठरवून त्याला टिळा लावूं.

उदयसिंगः—सुभेदारसाहेब, सर्व ठाकूर सरदारहो, या गादीवर बसण्याची माझ्या आईची आणखी बाबांची योग्यता आहे. यांचे मजवर इतके उपकार आहेत कीं, मीं अनेक जन्म घेऊनसुद्धां त्यांच्या उपकारांचें परिमार्जन माझ्या हातून होणार नाहीं. बन

वीराच्या तीव्र महत्वाकांक्षेला मजकारितां स्वपुत्र बळी देऊन यांनीं माझे प्राण अनेक वेळां अनेक घोर प्रसगीं वांचविले आहेत. तेव्हां त्यांना या गादीवर बसवावें म्हणजे त्यांच्या चरणकमळाच्या आश्रयानें मी त्यांच्याजवळ बसेन.

सोनगिडचा ठाकूरः-राणा संग याचा हा कुमार आहे अशी तुमची सर्व सरदारांची खातरजमा झाली असेल. यानें या प्रसंगीं एकच भाषण केलें. पण त्यामध्यें मनाचा इतका थोरपणा दर्शविला गेला कीं, त्याच्या योगानें आपलें शुद्ध कुळ आणखी आपली कृतज्ञबुद्धि पूर्णपणें व्यक्त केली. कुमारा, तुझ्या मनाची थोरवी वर्णन करावी तितकी थोडी आहे.

पन्नाः-उदयसिंगमहाराज, आपणही जी कृतज्ञता भरदरबारांत प्रकट केलीत, हें आपल्या शीलास उचितच आहे. पण महाराज, तख्ताधिपति आपण असल्यानें आपणच गादीवर विराजमान झालें पाहिजे. आपण बसलां म्हणजे आम्ही बसल्याप्रमाणेंच आहों. चितोडच्या तख्तावर आपल्यास विराजमान झालेले आम्हीं प्रत्यक्ष पाहिलें म्हणजे आमच्या जन्माचें सार्थक झालें. ईश्वरापाशीं आमचें दुसरें कांहीं मागणें नाहीं.

उदयसिंगः-आई, बाबा, तुह्मीं कांहीं म्हटलेंत तरी मी हें तुमचें म्हणणें मान्य करणार नाहीं. माझी लेंकराची आपल्यास आग्रहाची अशी विनंति आहे कीं, आपण उभयतांनींच गादीवर बसावें. ईशकृपेनें आपल्यास यशप्राप्ति होऊन चितोडच्या सिंहासनावर मीं आरोहण केलें तरी आपलें मी लेंकरूं आहें, आणखी आपण माझे जन्मदाते आईबाप म्हणून आपल्या शेजारींच मी बसेन. बाबांनीं मला आपल्या अंकावर घेऊन चितोडचें राज्य चालवावें.

ब्रह्मानंदः-महाबळसिंहा, पन्ने, महाराज उदयसिंग बोलत आहेत त्याप्रमाणें खरोखरच तुह्मी त्यांच्या सन्निध बसण्यास पात्र आहांत. आपली योग्यता इतकी आहे कीं, आपण खरोखरच राजपुत्राला जवळ घेऊन चितोडचें राज्य चालवावें. ( उभयतांस गादीवर बसवितो. कुमार उभयतांचेमध्यें बसतो. )

सुभेदार:-मी महाराजांचा मांडलिक आहें. महाराजांवर मी चितोडास छत्रचामरें धरीन. मोर्चेल वारीन. माझी फौज नाना जातींचें लष्कर तिरंदाज बरखंदाज सैलीवाले हटले उमदे लोक अशी आहे. हत्तीवरच्या तोफा, घोड्यावरच्या छोटेखानी तोफा, बरचीवाले, आडहत्यारी पट्टेकरी, आणखी इटेकरी, बाणेकरी, चक्रधारी, कमानमारी एकंदर सुमारें लाखाची गणती लागेल. लढवय्ये दोनशें हत्ती, मुचलक खजिना आणखी बाणांच्या कैऱ्यांचे उंट दोन हजार, दारूगोळ्याचे छकडे तीन हजार सर्व मी आपल्या तैनातीला हजर करतों. हे सर्व चितोडच्या गादीचे मांडलिक ठाकूर, आपआपल्या फौजेनिशीं आपला दुमाला करतील. कसूर होणार नाहीं अशी मी हमी घेतों. दुष्ट जरासिंहाला जसें भीमानें फाडून टाकलें, तसें महाबलसिंह बनबीराला फाडून टाकतील. चितोडच्या राजवाड्यांत आपण सर्व मिळून उदयसिंगमहाराजांना तख्तनशीन करूं. सर्व फौजेचें आधिपत्य आह्मी महाबलसिंहास देतों. येथें कांहीं दिवस मुक्काम करून आपण विश्रांति घ्यावी. बादलबरसात आपण चितोडवर मोहीम करून श्रीरामचंद्राचे कृपेनें फत्ते मिळवूं. महाराज उदयसिंग यांना आणखी नेकजाद स्वामिभक्त सरदार महाबलसिंह यांस भरगच्ची वस्त्रें, मोत्यांचे तुरे, कलग्या, जडावाचीं कडीं, पदकें, नवरत्नांकित पाचूचे हार, अरबी घोडे पांच पांच व शुभ्र हस्ती एक एक आहेरादाखल नजर करतों त्याचा स्वीकार करावा. मातोश्रीकडून आपल्या कुटुंबाची योग्य मान्यता करण्याबद्दल मातोश्रीस विनंति करतों.

महाबल:-सुभेदार, ठाकूर सरदारहो, या तुमच्या गौरवानें महाराज उदयसिंगास फार संतोष झाला आहे. या तुह्मीं दर्शविलेल्या राजनिष्ठेचा मोबदला लढाईची फत्तेमंदी होऊन चितोडचा किल्ला सही केल्यावर योग्य तऱ्हेनें आपणा सर्वांस खात्रीनें मिळेल. माझी मदत कांहींच नाहीं. तुम्हां सर्वांच्या साह्यानेंच चितोडचें सिंहासन महाराज उदयसिंग यांना प्राप्त झालें असेंच मी समजतों. आपण कुमळमेरास जयप्राप्तीस्तव देवांचें आराधन करावें. कोटि चंडीयाग

करावा. अकरा कोटि पार्थिव मृत्तिकेचीं लिंगें करावीं. कार्तवीर्याचा जप करावा. अनुष्ठानें बसवावीं. धर्मकृत्यास लाखों रुपये खर्च करावा. एकंदर खर्चाच्या ऐवजाचा भरणा, शिबंदीच्या सर्व खर्चा-सुद्धां दामदुप्पट आह्मी पेस्तर करूं. तीन मासांनंतर अनुष्ठानें सिद्ध झालीं म्हणजे त्यांची पूर्णाहुति करून दानदक्षणा, लक्षभोजनें यथा-युक्त घालून नंतर मजल दरमजल चितोडनगरीकडे कूच करूं.

---

## प्रवेश ४ था.

स्थळः–चितोड किल्ल्याबाहेरचें पटांगण.

( निहालकुवर व बनबीर प्रवेश करितात. )

**बनबीरः**–कुमळमेरास उदयसिंग हयात आहे. ही खबर मला समजतांच माझ्या छातींत धस्स झालें. माझी कंबर खचली. कंसाप्रमाणें माझी पांचावर धारण बसली. पोषाखाची अदलाबदल करून पन्नेनें संग्रामाला बळी देऊन त्याचे प्राण वांचविले. माझा कट्टा दुस्मान छातीवर पाय देऊन समरांगणांत सामन्याला उभा आहे. तोफांचे जळजळीत लालभडक कुलुपी गोळे किल्ल्याचे तटा-वर धडाधड येऊन आदळत आहेत. गणेशदरवाजा, हनुमान-दरवाजा, हत्तींदरवाजा वगैरे दरवाजे हत्तीकडून मोहरे मारून फोड-ण्याची कोशीस करीत आहेत. शेंकडों उंट या मोहऱ्यांच्या पायीं चुराडा होऊन ठार होत आहेत. सुरुंग लावून बुरूज उडवून देऊन चितोडच्या किल्ल्याला भगदाड पाडण्याचा गनिमांचा कावा सिद्धीस जाणार नाहीं. ( कांहीं रजपूत शिपाई प्रवेश करितात. ) तुह्मी तटावरून तोफांचा मारा सारखा सुरू ठेवा म्हणजे दुष्मनांची दाणा-दाण होऊन सैरावैरा पळून जातील. त्यांचे हत्ती, घोडे पाडाव करा. तीन महिने झाले किल्ला सही करीत आहेत पण आजचा प्रसंग फार कठीण आहे. महाबलसिंहाची किल्ला सही करण्याची आजची

प्रतिज्ञा मिथ्या ठरविणें सर्वस्वी तुमच्या मर्दुमकीवर अवलंबून आहे. आजपावेतों त्यांचे आपले किल्ल्याचे बाहेर अनेक सामने झाले, पण प्रत्येक प्रसंगीं आपल्यास हार खावी लागली आहे याबद्दल आपल्या फौजेला शरम वाटली पाहिजे. आज किल्ल्याचा आश्रय आपल्याला नसता तर शत्रूंनीं आपली कत्तल उडवून आपल्याला धूळ चारली असती. शत्रूंलाही पण कळून चुकलें कीं, हा बनबीर कांहीं सामान्य लढवय्या नाहीं. कुमळमेरचा सुभेदार असासह यानें जरी पोक्त सरंजाम—हत्ती, घोडे, गारभांडी, घोड्याचे मोठाले रिसाले आणखी पायदळांचीं दास्तानें उदयसिंगाला मदतीकरितां दिलीं आहेत तरी एक मुस्तकीम ठिकाणा चितोडचा किल्ला माझे ताब्यांत असल्यानें शत्रूंचें मी कांहीं चालू देणार नाहीं. जा तुह्मी आपली शिकस्त करा. कमजास्त झाल्यास मला खबर पोंचवा.

निहाल:—हनुमानदरवाजा फोडून किंवा सुरुंगानें बुरूज जमीनदोस्त करून गनीम आंत घुसला, तरी तुह्मी दम टाकूं नका. किल्ल्याचे बारद्वारीवर त्यांचा प्रवेश आम्ही होऊं देणार नाहीं. बारद्वारीवर जाण्याचा जो अरुंद रस्ता आहे, त्याच्यावर मोठमोठाले लोखंडी तवे पसरा, त्या तव्यांवर रसरशीत निखारे पसरून शत्रूंचा रस्ता बंद पाडा. पण हा उपाय अखेरचा आहे. तूर्त बुरुजांवरून तोफांची फैर, मोठमोठ्या फत्तरांचा मारा सारखा चालू ठेवा. कडकडीत तापलेल्या तेलाच्या मोठमोठाल्या कढया त्यांच्या अंगावर ओता. कुलुपी गोळ्यांचा भडिमार सारखा चालू ठेवा. बाणांचा पाऊस पाडा. जिकडे तिकडे आग लागेल असें करा. जा. पळा. ( रजपूत शिपाई जातात. )

बनबीर:—मला दोन प्रकारची फिकीर—एकतर फत्तेमंदी कशी होईल. तहाहयात मला कायमची गादी कशी मिळेल. आणखी दुसरी——

निहाल:—दुसरी कसली !

बनबीर:—दुसरी कसली ! या जिवाची. दुराग्रह सोड. सज्जबरोबर समरभूमीवर येण्याचें धाडस करूं नको म्हणून अनेक प्रकारें

तुझी समजूत पाडण्याचा मीं प्रयत्न केला पण व्यर्थ. हा काळपावेतों भली निभावली, पण आतां प्रसंग कठीण येऊन पोंचला. आतां काय होईल तें होवो. तूं शत्रूंच्या हातीं सांपडलीस तर तुझें कसें होईल! याची मला सारखी हुर हुर लागून राहिली आहे. या समयीं तूं किल्ल्याचे बारद्वारीवर चढून राणीवशांत मुकाट्यानें बैस. माझें ऐक. मी विजय संपादन करून आलों म्हणजे मला पंचारती घेऊन ओंवाळण्याला ये. आतां शेवटीं तरी हट्ट सोड. एवढी तरी माझी गोष्ट ऐक.

**निहाल:**-कधीं ऐकणार नाहीं. जेथें आपण तेथें मी. आपण जवळ असतां माझ्या अंगाला स्पर्श करण्याची कोणाची छाती आहे। आपल्याला शत्रूंनीं गिरफ्तार केलें तर मी आपल्याबरोबर आपला नेकजाद नौकर म्हणून येईन. आपल्याला बंदींत टाकलें तर मी बंदींत पडेन. पण मी म्हणून हे पाय सोडून जाणार नाहीं.

**बनबीर:**–कोण दृढ निश्चय हा! हा तुझा निर्वाणीचा निश्चय पाहिला म्हणजे मला तूं जिवाचे पलीकडे प्यार वाटतेस. तीन महिने शत्रूंनीं चौगर्दी किल्ला वेढल्यानें आज किल्ल्यांत जरी अन्नाचा दुकाळ पडला आहे तरी त्याचें मला कांहीं वाटत नाहीं. पण तुझ्या केंसाला धक्का पोंचला, कीं माझे पंचप्राण व्याकुळ होतील. ( दयाळसिंग प्रवेश करतो. )

**दयाळसिंग:**–महाराज, या जागीं आपण एक क्षणभरसुद्धां राहूं नका. शत्रूंनीं हत्तीदरवाजा हत्तीच्या धडका देऊन फोडला. सुरुंगानें तटाला भगदाडें पाडलीं. आपल्या जोमदार फौजेची फळी फोडून त्यांचे कडवे रजपूत 'जयहर जयहर' करीत किल्ल्यांत घुसले. बारद्वारीच्या दारावर शिड्या लावून आंत मुसंडीसरसे घुसत आहेत. लोखंडाच्या पत्र्यावर पसरलेल्या निखाऱ्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. किल्ल्याचे हनुमान दरवाज्यावर लौकरच उदयसिंगाचा बावटा चढेल असा वख्त येऊन पोहोंचला आहे. आपल्या फौजेचे

धैर्य सुटत चाललें आहे. आपले कित्येक सरदार शत्रूला जाऊन सामील झाले. आपल्या फौजेंत शत्रूंनीं फंदफितूर मांडून बहुतेक आपल्या तटावरच्या तोफा पाडाव केल्या. आपण उभयतां माझ्या मागोमाग या म्हणजे आपल्यास चोरवाटेनें बारद्वारावर पोंचवितों सरकार.

बनबीरः–हाय हाय, कोण आणीबाणीचा प्रसंग ! आज चढेन कीं पडेन. माझे लोक शत्रूंला फितूर झाले अं ! राजा झालों होतों. पण तें पद आजच्या निकालावर एक तर कायमचें मजकडे राहील नाहींतर रंक होऊन दारोदार भीक मागेन, अथवा प्राणासही मुकेन. कांहीं होवो. आपला निश्चय ठाम ठरला. मारतां मारतां मरेन.

निहालः–आपल्या लोकांची हिंमत खचली. आपल्या फौजेंत शत्रूंनीं फिसाद मांडला. अशी जरी स्थिति आहे तरी आपण उभयतांनीं राहिलेल्या जिवाला जीव देणाऱ्या लोकांनिशीं एक वेळ अचाट धैर्य धरून महाबलाला तोंड दिलेंच पाहिजे. चला आह्मी येतों तुझ्याबरोबर. ( जातात. पडदा वर जातो. उदयसिंग, महाचल व पन्ना आपल्या लोकांनिशीं शिड्या लावून किल्ल्याचे बारद्वारीवर चढत आहेत असा देखावा दिसतो. )

उदयसिंगः–( शिडीवर चढत असतां ) माझ्या शूर शिपायांनों, माझ्या जिवाला जीव देणाऱ्या दोस्तांनो, असेच नेटानें आणखी कांहीं वेळ रणकंदन चालू ठेवा. आह्मी शिड्यांवरून आंत घुसतों. आज हा वाडवडिलापासून चालत आलेला विमल कीर्तीचा ध्वज–चितोडच्या महापराक्रमी महाराण्यांच्या नांवाचा चालत आलेला बावटा–किल्ल्याच्या तटावर अक्षय फडकत राहिलाच पाहिजे. या कामीं माझे प्राण खर्ची पडले तरी हरकत नाहीं. बनबीरानें अनन्वित कर्मै करून राज्य संपादन केलें. माझ्या लाडक्या प्रजेला नानाप्रकारच्या यातना दिल्या. मोठमोठ्या कुलीन रजपूत सरदार घराण्यांचा नायनाट केला. अनेकांवर आग पाखडून त्यांचे प्राण घेतले. कितीएकांना राज-

स्थानांतून हद्दपार केलें. ( गहिंवरून ) माझ्या पाठच्या भावाचा—ज्याची दिव्य राजनिष्ठा, खरी स्वामिभक्ति यावच्चंद्रदिवाकरौ या राजस्थानांतच काय पण संपूर्ण भरतखंडांत, या अलम दुनयेंतसुद्धां दुमदुमून राहील—अशा माझ्या संग्रामाचा झोंपेंत खंजीर खुपसून खून केला. या अघोर कर्माबद्दल बनबीराला मी शिक्षा करीन.

पन्नाः—( शिडीवर चढत असतां ) बाळा उदयसिंगा, तुझी परमपूज्य महासाध्वी माता, जिनें जोहारांत जाळून घेतले, तुझें महापराक्रमी वडील महाराणासंग यांच्या चरणांचें स्मरण कर, प्रभु रामचंद्राच्या नांवानें निशाण किल्ल्याचे बारद्वारीवर फडकत राहील असा दिग्विजय आज रोजीं संपादन कर. कुमळमेरचे सुभेदार सर्व ठाकूर सरदार यांनीं तुझ्या मदतीला आपआपल्या पराक्रमी फौजा दिल्या आहेत. माझ्या संग्रामाचा झोंपेंत ज्यानें खून केला त्या मांगाचें डोकें मला आणून दाखीव म्हणजे माझा आत्मा शांत होईल. त्याची ती अवदसा निहालकुंवर जिच्या तो अगदीं मुठींत आहे, जिच्या चिथावणीनें त्यानें हा दारुण प्रसंग आणला त्या रांडेला माझ्यासमोर मुसक्या बांधून आण, म्हणजे मी आपल्या हातानें तिचा निकाल लावीन.

महाबलः—( शिडीवर चढत असतां ) पण नको. बनबीराचें—त्या नराधमाचें मुंडकें माझ्यासमोर आणूं नको. त्याला जिवंत धरून आण म्हणजे सिंह जसा आपल्या प्रखर नखांनीं उन्मत्त हत्तीचें गंडस्थळ फोडतो त्याप्रमाणें मी त्याचें मस्तक शस्त्रप्रहारानें फोडून छिन्नविच्छिन्न करीन. सूर्यास्ताच्या आंत अर्जुनानें जसा जयद्रथाचा वध करून आपली प्रतिज्ञा खरी केली, तसा राजपुत्राकरितां सूर्यास्ताच्या आंत बनबीराचा वध करून मी आपली प्रतिज्ञा खरी करतों. घायाळ होऊन रणांत हुंबत पडलेल्या अभिमन्यूला जयद्रथानें लत्ताप्रहार केला, तसाच या नीचानें माझ्या संग्रामाचा—माझ्या बाळाच्या कोमल छातींत झोंपेंत खंजीर खुपसला ! नीचा बनबीरा, त्याला जागें केलें असतेंस तर त्यानेंच उलट कदाचित् तुझा शिरच्छेद केला असता. आतां चोराप्रमाणें किल्ल्याचे बारद्वारांतल्या दालनांत

छपून कां बसलां आहेस ? बाहेर पड-बाहेर पड. सूर्यास्ताची वाट पहातोस होय ? पण तुझा अस्त झाल्याशिवाय सूर्य आज अस्ताचलास जाणारच नाहीं. कारण सूर्यवंशाचा तूं अस्त करण्याचा प्रयत्न केलास याबद्दल सूर्यनारायण तुजवर लौकरच आपल्या प्रखर तेजाचा लोळ पाठवून तुला जाळून खाक करणार आहे. ( शिपाई प्रवेश करतो. )

शिपाई:-बनबीर सरकारची सर्व प्रकारें नाउमेद झाल्यामुळें ते नाहींसे झाले होते. पण आह्मीं त्यांचा सुगावा लाविला. बारद्वारीच्या पिछाडीस मोठमोठालीं भुयारें भुसारमाल ठेवण्याकरितां केलेलीं आहेत, त्यांपैकीं एकामध्यें म्हणजे उडीद, मठ वगैरे ठेवण्याच्या भुयारांत आम्हांला बनबीर सरकार सांपडले. गळ्याला गळफांस लावून प्राण निघून जावा म्हणून हातपाय झाडीत होते, तोंच त्यांना आह्मीं पकडलें. निहालकुवरला अगोदरच गिरफतार केलें होतें. दोघांना बारद्वारीवर सक्त पाहऱ्यांत अडकावून ठेविलें आहे. आह्मांला सर्व प्रकारें जालीमसिंगानें मदत केली. महाराजांचा हुकूम होईल तशी तामिली बजावतों.

उदयसिंग:-त्या नीचांना बारद्वारीचे सज्ज्यावरून आमच्या बाजूला जोरानें लोटून द्या म्हणजे त्यांचा चेंदामेंदा होऊन ते बदमाश खतम होतील. पण नको. अशा सहज रीतीनें त्यांना खतम करणें म्हणजे जिवाचा इतका आटापिटा करून व्यर्थ झाल्याप्रमाणें होणार आहे. त्यांचे हाल हाल केले पाहिजेत. ( किल्ल्याचे बारद्वारावर निशाण लागलें जातें. )

पन्ना:-शाबास, उदयसिंगमहाराज शाबास. महाराणासंग यांचे पोटीं येऊन सार्थक केलेंत. धनुर्धारी प्रभु रामचंद्र याच्याच वंशातले तुह्मी अस्सल राजपुत्र आहांत हें तुह्मीं जगाच्या निदर्शनाला आणलेंत. चितोडच्या तख्तावर तुह्मी विराजमान झालांत, हें पाहून माझा आत्मा शांत झाला. माझी स्वामिभक्ति कळसाला पोंचली. आतां मी आपल्या सुकुमारबाळाला पोटाशीं धरून त्याची आलाबला घेतें. धन्य आजचा दिवस !

**महाबलः**–चौघडे लावा. तोफांची सलामी द्या. विजयदुंदुभि वाजवा. जन्मास आल्याचें सार्थक झालें. समुद्रमंथन करून अखेर ज्याप्रमाणें अमृत निघालें त्याप्रमाणें घनघोर संग्राम होऊन अखेर उदयसिंग तख्तनशीन झाले. आणा, राजमुकुट आणा म्हणजे मी आपल्या हातानें उदयसिंगमहाराजांच्या मस्तकावर ठेवतों. आज आनंदानें मी दिवाना तर नाहींना होणार ? असा आनंद कधीं कोणाला झाला असेल काय ? पन्ना, ईश्वरानें तुझी इच्छा पूर्ण केली. स्वपुत्राला बळी देऊन राजपुत्र वांचविलास या तुझ्या दिव्य राजनिष्ठेबद्दल परमेश्वरानें तुला योग्य बक्षीस दिलें. साक्षात् श्रीरामचंद्र प्रभूनें तुझ्याकरितां उदयसिंगाच्या रूपानें अवतारच घेतला ! आनंदी आनंद झाला ! ( जालीमसिंग व कांहीं शिपाई बनवीराला व निहाल-कुवरला बारद्वारीच्या सज्ज्यावरून खालीं धरून आणितात.) हरामखोरा बनवीरा–उदयसिंग राजकुमार म्हणजे प्रत्यक्ष श्रीविष्णूचा अवतार त्याचा तूं जालीम जहरानें खून करण्याचा प्रयत्न केलास. वाघाच्या जबड्यांत त्याला बळी देण्याचा प्रयत्न केलास, पण त्यांचें तकदीर शिकंदर. अखेर मारेकऱ्याचें नीच काम पत्करून त्यांच्या छातींत खंजीर खुपसण्याचा प्रयत्न केलास पण संग्रामानें आपला देह स्वामिकार्यी अर्पण करून त्यांला वांचविलें. कायावाचामनेंकरून राजाची सेवा करण्याची सोडून देऊन तूं ज्या अर्थी त्यांच्या जिवा-वर उठलास त्या अर्थी तुला आतां मरणापेक्षां दारुण शिक्षा पाहिजे होती. ह्या माझ्या प्रखर शस्त्रानें तुझें मस्तक––

**जालीमसिंगः**–बनवीर सरकार, जालीम जहरानें भरलेलें अन्न मला आपण खावयास लाविलें, त्याच्या बदला ही मीं आपली अल्प सेवा केली आहे. तिचा आपण स्वीकार करावा. हाच फैसला ! मी नांवाचा जालीमसिंग आहे जालीमसिंग !

**बनबीरः**–माझ्यानें बोलवत नाहीं. मीं सर्व प्रकारें घोर पातकें केलीं याबद्दल आतां मला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. पण काय उपयोग ! राजपुत्राचे चरणावर मस्तक अर्पण करण्याला मी तयार आहें, मीं आपला मुकुट ब्रह्मानंदस्वामींचे चरणीं अर्पण केला आहे.

**निहालः**–माझ्या स्वामीचें मस्तक महाराज उदयसिंग यांच्या

चरणीं अर्पण होण्यांचे अगोदर माझें मस्तक त्यांच्या चरणावर जाऊन पडूंद्या. स्वामीच्या अगोदर एवढी जोड मला द्या, म्हणजे मला वैधव्य प्राप्त झालें नाहीं असें मी समजेन. त्यांच्याकडे कांहीं दोष नाहीं. सर्व अपराध माझा आहे.

ब्रह्मानंदः–उदयसिंगा, महाबळसिंहा, पन्ने, श्रीरामचंद्राच्या कृपेनें तुमची इच्छा पूर्ण झाली. महाराणा संग्रामाचा औरसपुत्र उदयसिंग तख्तनशीन झाला हें पाहून सर्व प्रजाजनांला, नागरिकांला, ठाकूर सरदारांना अत्यानंद झाला आहे. आतां हा, उदयसिंगाच्या दिगंत कीर्ति गाजविणाऱ्या महान् महान् पूर्वजांनीं मस्तकीं धारण केलेला मुकुट मी याच्या मस्तकावर ठेवतों. (तसें करतो.)

उदयसिंगः–गुरुमहाराज, हा मुकुट मी आपल्या आईच्या आणखी बाबांच्या मस्तकावर आपल्या आज्ञेनें ठेवतों. हा मुकुट त्यांचा आहे. ज्यांनीं प्रत्यक्ष आपला पोटचा गोळा मजकरितां बळी दिला, माझे प्राण वांचविले त्यांना ही सलतनत अर्पण करून मी त्यांच्या ऋणांतून अंशतः मुक्त होतों. आई, बाबा, या तुमच्या उदयसिंगाला एवढी जोड द्यावी.

पन्नाः–बाळा उदयसिंगा, या तुझ्या विनययुक्त भाषणानें आह्मी संतोषित झालों. मुकुट धारण करण्याला सर्व प्रकारें तूंच पात्र आहेस. हा मी आपल्या हातांनीं तुझ्या मस्तकावर ठेवतें.

महाबळः–उदयसिंगमहाराज, आपण सूर्यवंशांतील शेवटचें फळ. श्रीरामचंद्राच्या वंशांत आपली उत्पत्ति. आपल्या पायांचे आह्मी दास. आपणच तो धारण केला पाहिजे. आपल्या चरणाचे रजःकण आह्मीं आपल्या कपाळीं लावावे. आपल्या चरणकमळीं देह अर्पण करावा हेंच आमचें कर्तव्य. (मुकुट उदयसिंगाच्या मस्तकावर ठेवतो.)

ब्रह्मानंदः–माझ्या बंधुजनांनो, महाराजनिष्ठ पन्नादेवी, आणखी तिचा पति सरदार महाबळसिंह यांच्या सत्वशील वर्तनापासून आपण आपल्यास बोध घेतला पाहिजे. लहान मुलाला सर्व प्रकारें जसे आपले आईबाप प्राणापलीकडे प्रिय असतात, तसा आपला राजा

आपल्याला जिवापलीकडे प्रिय असला पाहिजे. राजा आपला देव प्रत्यक्ष भगवान् महाविष्णु असें समजा. लहानपणीं आपल्या मुलांना राजनिष्ठ होण्याबद्दल तुम्ही आपल्या स्वतःचे वर्तनानें कित्ता घालून द्या. आपल्या राजाचें वैभव, तेंच आपलें वैभव. आपल्या राजाचें कल्याण तेंच आपलें कल्याण. आपल्या राजाची दिव्य कीर्ति तीच आपली कीर्ति. आणि आपल्या राजाचें अभीष्टचिंतन हेंच आपलें कर्तव्य, असें समजा. हा माझा म्हाताऱ्याचा उपदेश ध्यानांत ठेवा. यापासून तुमचें सदैव कल्याण होईल. आज अशा आनंदाच्या प्रसंगीं बनवीराचा शिरच्छेद करावा अथवा त्याला जीवदान द्यावें ह्यांपैकीं कोणता विचार अधिक श्रेष्ठ याचा मीं विचार केला. उदयसिंगमहाराज, महाबल आणखी पन्ना यांची कीर्ति बनवीराला प्राणदान केल्यानें जशी उज्ज्वल दिसेल, तशी प्राण हरण करून दिसणार नाहीं. झालेल्या सर्व पापाचरणाबद्दल त्याला क्षमा करून फक्त राजस्थानांतून हद्दपार करावें अशी माझी इच्छा आहे.

उदयसिंग-महाबल-पन्नाः-गुरुमहाराजांची आज्ञा आम्हांला शिरसामान्य आहे. ( पडदा पडतो. )

समाप्त

११६

IRBK-0100116